रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, २१ जानेवारी २०२४



# 'रामायणा'नंतरचे महाभारत



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


आधुनिक केसरी

**मर्यादा पुरूषोत्तम' म्हंटल की, अयोध्येचा राजा प्रभूरामचंद्रांचा नाव पुढे येते. विश्वात आजपर्यंत असा आदर्श राजा' झालेला नाही. पुढेही होणार नाही.ज्या राजाने राजधर्माचे पालन केले, धर्माच्या सर्व मर्यादा पाळल्या. जनतेलाही धर्म शिकविला. ते एकवचनी, एकबाणी, उदार आणि सदैव स्थितप्रज्ञ होते. राम राज्याला 'रामराज्याची' उपमा दिली जाते. भारताला या प्रभूरामांचे मंदिर उभारणीसाठी ४९९ वर्षे प्रतीक्षा करावी लागली. अखेर रामभक्तांच्या मंदिर उभारणीच्या संघर्षाला यश मिळाले. दि.२२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्यात पुन्हा प्रभूरामचंद्र विराजन होत आहेत. या दिवसापासून भारतीय इतिहासात सोनेरी पर्वाला सुरुवात होत आहे. अयोध्यानगरीत होणाऱ्या भव्य व दिव्य सोहळ्याकडे भारताचे नव्हे, तर जगाचे लक्ष लागले आहे.**

भारतीयांनी रामायणाची कथा सांगण्याची गरज नाही. ती सर्वांना माहित आहे. पण प्रभूराचंद्रावरुन भारतात काय घडले? या लेखात मांडण्याचा प्रपंच केला आहे. हिंदु शास्त्रानुसार सत्ययुग त्रेतायुग, व्दापरयुग,कलियुग मानले हे चार युग मानले जातात.प्रभूरामांचा जन्म त्रेतायुगात झाला. हा कालखंड १२ लाख ६६ वर्षाचा होता. सद्या कलियुग चालू असून या युगाच्या समाप्तीनंतर पृथ्वी नष्ट होईल, तेंव्हा जीवच अस्तित्वात राहणार नाही. पण घाबरू नका!कलियुग समाप्त होण्यास अजून ४ लाख २६ हजार ८७९ वर्षे शिल्लक आहेत. याची युगाची विष्णु पूराणात माहिती आहे.त्या युगात माणसाचे आयुष्यमान हजारो वर्षे होते, ते कालांतराने कमी होत जाईल व ते वीस वर्ष राहील, असे सांगितले गेले आहे.प्रभू रामांचा जन्म चैत्र शुक्ल पक्षाच्या नवमीचा दुपारी१२ वाजून ५ मिनिटाला झाला.तो काळ ७ हजार १३६ वर्षे पूर्वीचा आहे.आधुनिक संशोधना- नुसार रामांचा जन्म इ.स.पूर्व ५११४ वर्षापूर्वी झाला. प्रभूरामचंद्र हे विष्णुंचे सातवे अवतार आहेत. संपूर्ण रामायण कसे घडले ? हे लेखात मांडणे अशक्य आहे. पण अयोध्याचे राजा दशरथांच्या कुटुंबात हे "रामायण'घडले आहे. कैकीयीने पूत्र भरताला सिंहासनावर बसविण्याचा हट्ट धरला व रामाला वनवासात पाठविले. रामायणात कैकेयी, दासी मंथरा आणि रावणाची बहिण शूर्पणखा यांच्या भोवती आहे. कैकेयीने तर पती दशरथराजांना 'तुमचा मृत्यू झाला तरी चालेल आपण सूर्यवंशी आहात, दिलेले वचन पाळा! अशी ती म्हणाली. राजा दशरथाने राम, राम म्हणत प्राण सोडले. राम हे दशरथाचे पूत्र विष्णुचे अवतार, त्यांच्या चरित्र व आदर्शाचे वर्णन रामायण या पवित्र ग्रंथात आहे.यात भरताने प्रिय बंधू रामांच्या पादुका राजसिंहासनावर ठेऊन राज्य केले. प्रभूरामांचा १४ वर्षे वनवासातून अयोध्येला परतल्यानंतर दसऱ्याला राज्यभिषेक झाला. यावर वाल्मिकी ऋषींनी रामायण हे एक महाकाव्य रचले.या ग्रथांत २४ हजार श्लोक आहेत.संत गोस्वामी तुलसीदासांनी १६ व्या शतकात 'रामचरित्रमानस' हा ग्रंथ लिहिला आहे.रामायण संकृत हिंदी, तेलगू, तामीळ पारशी, तसेच विविध भाषेत असून २८ रामायणे आहेत. चीन, तुक्रीस्थान, थायलँड व बहुल मुस्लिम राष्ट्रात रामायणाचे आजही महत्व आहे. रामांचे वैशष्ट्ये, म्हणजे ते आदर्श पूत्र, बंधू, पती, मित्र, राजा आणि शत्रू होते. रावणासारखा शूर, विव्दान व श्रीमंत राजा झालेला नाही.तो शिवभक्त होते. त्यांनी शीव तांडव स्त्रोस्त्र लिहिले आहे. रावणाचा जन्म उत्तर प्रदेशात बिसरख या गावी झाला. तेथे रावणांचे मंदिर असून तेथे पूजा केली जाते. हे मंदिर वर्षेभर बंद असते.ते दसऱ्याच्या दिवशी उघडले जाते. भारतात मंदसौर (मध्यप्रदेश) बिसरख (उत्तरप्रदेश ) रावणगाव (मध्यप्रदेश) कांगडा (हिमाचलप्रदेश) मंड्या व कोलार (कर्नाटक) जोधपूर (राजस्थान) ही सहा गावात आजही रावणाची पूजा केली जाते.

प्रभूरामांनी ११ हजार रामराज्य होते. यावर भिन्न मते आहेत. रामराज्य नैतिक गुणांन्नी संपन्न अश्या राष्ट्राची निर्मिती करणे.ज्यात राज्यात शासन आणि प्रजा यांचे पालक आणि मुलांप्रमाणे नाते असते.रामराज्य म्हणजे न्यायाचे राज्य होते. तेथे न्याय देतांना श्रीमंत व गरीब तसेच वंश, लिंग, जात उच्च, नीच असा भेदभाव न करता न्याय दिला जात असे. तसेच प्रत्येकाला समान न्याय, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक आदी क्षेत्रात समानता, स्वातंत्र्यता, न्यायाची वागणूक मिळत होती. यात प्रत्येकाला ऐच्छिक मूभा असे. पण जो कोणी अपराधी असेल त्याला शिक्षा दिला जात असे. ही रामराज्याची आदर्श संकल्पना होती रामांनी असेच राज्य केले. म्हणून स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधींनी भारतात रामराज्य व्हावे, अशी इच्छा होती. भारतात बारा राजांनी रामराज्य स्थापन केले आहे. अयोध्याची स्थापना मनूने केली. ते आठ तीर्थक्षेत्रापैकी एक महत्वाचे आहे. या नगरीत पुरातन श्रीरामाचे मंदिर होते. नंतर भारतावर इस्लामिक राजांनी अतिक्रमण करून अनेक मंदिरे उध्वस्त केली.त्यात दिल्लीच्या बादशहा बाबराने १५२८ मध्ये अयोध्यातील मंदिर उध्वस्त केले व तेथे मंदिर पाडून मस्जिद बांधली. बाबर हा राजा होता त्याचेनाव मस्जिदीला कसे?प्रथम १८३८ मध्ये ब्रिटीश अधिकारी माँन्टगोमेटी मार्टीन यांनी मस्जिदीचे सर्वेक्षण केले. तेव्हा तेथे मंदिराचे खांब दिसून आढळले. तेव्हा मंदिर व मस्जिदीचा वाद तीव्र झाला. यात न्यायायालयाने १९४९ मध्ये विवादित ढाचा म्हणून घोषित केला. त्या जागेला कुलूप ठोकले गेले .त्या ठिकाणी मुस्लिम समाज येथे नमाज पढत नव्हते. याप्रमाणे काशी व मथूरा या मंदिरात जागेवर अतिक्रमण करून बाजूला मस्जिदी उभारल्या गेल्या आहेत. या तिन्हीही हिंदूची पवित्रस्थळे आहेत.स्वातंत्र्यानंतर भारतीय मुस्लिम बांधवांनी मनाचा मोठेपणा दाखवून याठिकाचा हक्क सोडावा, अशी मागणी केली गेली होती. पण मुस्लिम नेत्यांनी नाकारली. मग त्यातून विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व विविध हिंदु संघटनानी राम मंदिराचा एकत्रपणे लढा उभारला. नंतर भाजपाने हा हिंदूच्या अस्थेचा प्रश्न म्हणून राजकीय घोषणापत्रावर घेतला.या प्रश्नाला राजकीय वळण लागले.२५ सप्टेंबर १९९० रोजी भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथ ते अयोध्या अशी रथयात्रा काढण्यात आली.ती ३० ऑक्टो.ला १९९२ पर्यंत पोंहचणार होती.पण दि. २ ऑक्टोबरला रथयात्रा बिहारच्या समस्तीपूरला अडविली गेली.तत्कालिन पंतप्रधान व्हि.पी .सिंग यांच्या सूचनेनुसार बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांना अडवाणी यांना अटक केली. याचा राजकीय परिणाम भाजपाने केंद्रात व्ही. पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला.याच सिंगांनी 'कमंडल विरुध्द मंडल'चा डाव खेळला.उत्तरप्रदेश समाजवादी पक्षाचे नेता व तत्कालिन मुख्यमंत्री मुलायमसिंह यादव यांनी अयोध्येत प्रचंड पोलिस तैनात केले होते.त्यांनी तर अयोध्यात पक्षी पंख सुध्दा मारू शकणार नाही,असा दावा केला होता.तरीही लाखो कारसेवक अयोध्यानगरीत घुसले.तेंव्हा पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तेंव्हा निः शस्त्र रामभक्तावर गोळ्या झाडल्या.यात ६० जण मृत पावले.मृताचा आकडा मोठा होता. कारण नगरीत रामभक्तांची प्रेते पडलेली होती.यात जखमी रामभक्त उपचाराअभावी तडफडत होते,तर कांहीनी तेथेच प्राण सोडले. जखमी रामभक्त पाणी मागत होते,पण ते दिले जात नव्हते,शरयू नदीत प्रेते दिसत होती.अयोध्यानगरी रक्ताने माखली गेली.पण निर्दयी माजी मुख्यमंत्री मुलायमसिंहाना दया आली नाही,त्यांनी खेद अथवा दुःखही व्यक्त केले नाही.उलट अजून गोळ्या घातल्या,असत्या,असे विधान केले. तरी मंदिराचा लढा थांबलेला नव्हता,तो रस्त्यावर आणि न्यायालयात चालू होता. ६ डिसेंबरला १९९२ रोजी अयोध्यात दोन लाख रामभक्त एकत्र आले.रामभक्त आक्रमक झाले व त्यांनी विवादित ढाचा उध्वस्त केला.तेंव्हा भाजपा नेत्यांनी आमचा ढाचा उध्वस्त करण्याचा आमचा मुळीच उद्देश नव्हता,असा खुलासा केला होता.या घटनेमुळे काँग्रेस सरकारने उत्त रप्रदेश,हिमाचल,राजस्थान,मध्यप्रदेश ही भाजपा ची चार सरकारे बरखास्त केली.या घटनेबाबत लिबराहन आयोग नेमला गेला. नेते अडवाणी यांचेसह ३२ जणांच्या विरोधात खटला चालविला गेला. तो न्यायालयात २८ वर्षे चालला. २०२० मध्ये सर्वांची निर्दोष मुक्तता झाली.बाबरीचा ढाचा पाडल्याचे पडसाद भारतात व जगातही उमटले. याचा बदला म्हणून मुंबईत १२ मार्च १९९९३ बाँम्ब स्फोट घडविले गेले. त्यात २५७ जण मृत्यू पावले तर सातशे जण गंभीर जखमी झाले.यानंतर भाजपाने हिंदुत्वाच्या विषयाला अधिक बळ दिले. भाजपाने १९९६ मध्ये सर्वात अधिक जागा जिंकल्या व केंद्रात सरकार आले.पण ते फक्त १३दिवस टिकले.देशात पुन्हा निवडणूका झाल्या आणि भापपाचे नेते अटलबिहारी वाजपेयी दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. त्यावेळी राम मंदिर आंदोलनात भाषणात कवी विष्णुचंद्र गुप्त यांनी "सौंगध खाते राम की, "मंदिर वही बनायेंगे' हे वाक्य म्हंटले होते.त्यावर गीत तयार झाले,ते राम मंदिर आंदोलनाला प्रेरणा देणारे ठरले.त्यावेळी गायक तरुण सागर यांचे 'मंदिर वही बनायेंगे' हे गीत अतिशय चांगलेच गाजले.या गाण्यावर तर काँग्रेस सरकारने बंदी घातली होती प्रभूराम हे एक काल्पनिक आहेत, असे प्रतिज्ञापत्र काँग्रेस सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केले होते. पण दि.९ नोव्हेबर २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाने राम मंदिराच्या बाजूने निकाल दिला.देशात आजही रामांचे वंशज आहेत, जयपूर घराण्याची कूश वंशावळी असून भवानीसिंह हे कुश वंशाचे ३०७ वे वंशक आहेत.या वंशावळीत राजा दशरथ व श्रीराम राजाचा उल्लेख आहे. नकली गांधी परिवाराला हिंदू संस्कृती भगवान रामांविषयी ज्ञान नाही. हा परिवार निवडणुकीच्यावेळी हिंदूना ज्ञान देत असतो. प्रियंका वाड्रांनी निवडणूक प्रचारात म्हणाल्या, राम १३ वर्षे जंगलात होते. त्यांना रामांना किती वर्षे वनवास झाला, हेच माहित नाही. जनतेचे रामावर प्रेम होते,म्हणून इतके वर्षे त्यांची त्यांची प्रतीक्षा केली. म्हणजे गांधी परिवाराची रामांच्या प्रेमाशी केली गेली.काँग्रेसने राम मंदिर उभारणीत अनेक अडथळे आणले.पक्षाने दुसरा उद्योग केलेला नाही. पण आज काँग्रेस सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राम मंदिर उभारले गेले,असे म्हणत आहेत.पण भाजपाचा राम मंदिरासाठी राजकीय संघर्ष करत असताना तेंव्हा'मंदिर बनायेंगे लेकीन तारीख नही बतायगें,असे म्हणून भाजपा हिणवत होते. कारण मंदिराचा प्रश्न सुटणार नाही, असे काँग्रेसला वाटत होते. भाजपाने मंदिर उभारणीसाठी लढा दिला व बळ दिले. राम मंदिर आंदोलनात शेकडो रामभक्तांनी बलिदान दिले.कोठारी बधूंना डोक्यात गोळ्या घालून ठार मारले गेले.मंदिर उभारणीसाठी अनेक हिंदू संत महात्मांचे,हिंदू संघटना नेत्यांनी त्याग केला.भाजपाने तर मंदिराचा विषय पक्षाच्या घोषणापत्रात उघडपणे घेतला तर काँग्रेसने हिंदू विरोधी छूपा अजेंडा चालविला. काँग्रसचे पी. व्ही.नरसिंसराव व सपाचे नेता मुलायमसिंह यांनी तर मस्जिद बांधण्याची भूमिका घेतली होती.आज


काँगेस व इंडी आघाडी हिंदू व भाजपाच्या विरोधात विषाची पेरणी करत आहे.सनातन धर्म नष्ट करण्याची भाषा करत आहे.हे धर्मनिरपेक्ष लक्षण आहे काय? या नेत्यांच्या तोंडात इतर कट्टर धर्मांविरुध्द चकार शब्द निघणार नाही.विरोधी पक्षाची धर्मनिरपेक्षता ही बेगडी असून ती हिंदू विरोधी आहे.राम मंदिर सोहळ्यावर आक्षेप घेणाऱ्यात हिंदुही आहेत. हिंदू धर्मात चारही पीठांच्या शंकराचार्यांना श्रेष्ठ मान आहे. राम मंदिर पूर्ण झालेले नाही.त्यामुळे प्रभूरामांची प्राणप्रतिष्ठा करणे, हे धर्म शस्त्राच्या विरुध्द आहे. मंदिर शुभारंभाची घाई का? यावरुन कारणावरुन त्यांनी नाराजी व्यक्त केली व आम्ही जाणार नाही, असा पवित्रा घेतला! यातील दोन शंकराचार्यांनी या सोहळ्यास संमती दिली, हे स्पष्ट झाले. काँग्रेसला शंकराचार्यांचा पुळका कसा काय आला?पक्षाने यावरुन नीच राजकारण केले. पण दि.१२ नोव्हेंबर २००४ रोजी ऐन दिवाळीत कांची कामकोटि- पीठाचे शंकराचार्य स्वामी जयेंद्र सरस्वती यांना खून व इतर खोट्या आरोपाखाली तामीळनाडू पोलिसांनी अटक केली होती.याचा विसर झाला वाटत! हे काँगेस नेत्यांने हिंदू धर्माचा अवमान करण्यासाठी जाणूनबुजून हे कृत्य घडविले,याचा उल्लेख माजी राष्ट्रपती प्रणब मुखर्जी च्या "आत्मकथा' पुस्तकात आहे. हिंदू धर्मात सहिष्णुता असल्याने हे सर्व सहन केले जात आहे.एकीकडे बाबरी मस्जिदीचे पक्षकार इकबाल अन्सारी यांनी राम मंदिर सोहळ्याचे स्वागत करतात, दुसरीकडे राम मंदिर उभारणी हा कार्यक्रम भाजपा, आर. एस. एस. आणि विश्व हिंदू परिषद यांचा आहे, असे म्हणत,काँग्रेस रामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेते. तेव्हा याला 'विनाशकाले विपरीत बुध्दि' म्हणावे लागेल.



अयोध्यात राम मंदिर उभारणी देशातील हिंदू समाज एकवटेला दिसत असून याचे श्रेय भाजपाला मिळाले तर २०२४ मध्ये केंद्रात काँग्रेसची सत्ता मिळणार नाही,या कारणामुळे काँग्रेस पक्ष चिंताग्रस्त बनलेला आहे.त्यामुळे काँग्रेस नेते राम मंदिर उभारणी व सोहळ्यावर अनेक प्रश्न निर्माण करीत आहेत. या राम मंदिर सोहळ्याचे निमंत्रण गांधी परिवार व काँग्रेस नेत्यांना दिले गेले. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरू यांनी २ मार्च १९५१ मध्ये तत्कालिन राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांना सोमनाथ मंदिराच्या पुरर्निर्माण कार्यक्रमाला रोखण्यासाठी प्रयत्न झाला. त्यासाठी नेहरूंनी त्यांना पत्र पाठविले होते. पण माजी राष्ट्रपती प्रसादांनी पंडित नेहरूंचा सल्ला ऐकला नाही. ते कार्यक्रमाला गेले.तेच गांधी परिवार व काँग्रेस पक्षते तेच आज अनुकरण करत आहे.काँग्रेस पक्ष अयोध्याला न जाण्यामागे मुस्लिम 'व्होटबँक' हा हातातून जाईल,याचीच भीती आहे. यातून काँग्रेसचा हिंदु विरोधी छूपा चेहरा समोर आला.काँग्रेसच्या 'मु मै राम बगल मै छूरी'या नीतीने देशात अनेक हत्याकांड घडविले आहेत. जगात हिंदूधर्मासाठी रक्तपात केल्याचा इतिहास नाही.काँग्रेस व इंडी आघाडीचे नेते सनातन धर्मावरुन देशाचे दक्षिण व उत्तर विभाजन करत आहेत.तर चित्रपट कलाकार हिंदू धर्माच्या विरोधात अप्रचार करत आहे. नयतारा यांच्या 'अन्नपूर्णानी" या छोट्या पडद्यावरील चित्रपटात प्रसिध्द कलाकार "संपत राज'ने यांनी वाल्मिकी रामायणातील श्लोक अर्धवट वाचला गेला यात राम हे मांसाहारी होते,असा चुकीचा अर्थ काढला गेला आहे.तो चित्रपट 'नेटफ्लिक्स'वरून हटविला गेला.महाराष्ट्रातील नेत्यांने हेच शेण खाल्लेले आहे.देशात चित्रपटातून केवळ हिंदू देव -देवतांना व्यंग म्हणून दाखविण्याची फॅशन सुरु झाली आहे.अश्या चित्रपटावर बंदी घातली पाहिजे. आजचे पत्रकार तर केवळ 'रामावर कोण काय बोलतो आहे ? यावरच भर देतात ?एक साहित्यिकाने 'रामा'वर काय बोलले? यापेक्षा महाराष्ट्रात आधुनिक वाल्मिकी झाले.ते सांगा! ते म्हणजे महाकवी 'गदिमा' आहेत,त्यांनी १९५० मध्ये "देव पावला' चित्रपटात ' लिहिलेले गीत माणिक वर्मा यांनी गायिलेले मनाला भावून जाते. 'गदिमा'ने १९५५ मध्ये रामायणावर महाकाव्य लिहिले. तो ५६ गाण्यांचा संग्रह आहे.हे गीत सुधीर फडकेंनी संगीतबध्द केले. आज हे गीत रायायण ऐकतांना माणूस मंत्रमुग्ध होतो. आज नवीन पिढी विसरत चालेली आहे,तेव्हा "जुने ते सोन असत' हे सांगण्याची खरी गरज आहे.

प्रभूरामचंद्र भारतीय दैवत आहेतच! पण संपूर्ण मानव जातीसाठी ते प्रेरणादायक आहेत. लोकांचा ते श्वास व प्राण आहे. ते जीवनाला योग्य दिशा देत असतात. राम मंदिर उभारण्याची गरज काय? असा प्रश्न नेते विचारतात! तेंव्हा गाढवाला गुळाची चव कशी कळणार? रुग्णालयात माणसाच्या शरिरावर उपचार होतात.पण चांगले आदर्श विचार आणि आचाराचा डोस हा श्रध्दास्थानातून मिळत असतो.भारतात राम मंदिरा- वरून वाद व्हावा,याचे बहुसंख्य हिंदूंना खंत वाटते. अयोध्यातील राम मंदिराचे वैशिष्ये असे की,भारतीय कारागिरांनी हे मंदिर उभारले आहे.सुमारे ६५ अभियंते हे काम करत आहेत, तर मुख्य आठ अभियंत्यापैकी पाच महाराष्ट्रातील आहेत. सुमारे ४५०० कामगार काम करत आहेत. मंदिराचे मुख्य काम पूर्ण झाले असून बाजूचे काम चालू आहे.या मंदिराची लांबी पूर्व पश्चिम ३८० फूट व रुंदी २५० फूट व उंची १६१ फूट आहे. हे मंदिर तीन मजली व तीन कळसाचे आहे. या मंदिराला ३९२ खांब असून त्यावर देव -देवतांच्या मूर्ती कोरल्या आहेत. मंदिराला ४४ दरवाजे आहेत. मुख्यव्दार सोन्याचे आहे. मुख्य गाभाऱ्यात प्रभूरामांची बालमूर्ती असणार आहे.या मंदिराच्या पहिल्या मजल्यावर रामांचा दरबार व पाच सभामंडप आहे.रामांच्या दर्शनासाठी भाविकांची काळजी घेण्यात आली आहे.सुमारे २५ हजार भक्तासाठी राहणे इतर सुविधा असणार आहे.दिव्यांग व वृध्दांसाठी लिफ्टची सोय आहे.अनेक ऋषींच्या मूर्ती व रामायणातील प्रसंग मूर्ती स्वरुपात देखावा तयार केला आहे.या मंदिर उभारणीसाठी देशातील ५ लाख गावातून वीटा आणल्या गेल्या.तसेच राजस्थान मार्बल, महाराष्ट्रातून लाकूड, कर्नाटक- मधून मूर्तीसाठी माती, गुजरातमधून धर्मध्वज तर नेपाळमधून शालीग्राम दगड भारतात आणला गेला. यात कर्नाटक राज्यातील म्हैसूरचे मूर्तीकार अरुण योगीराज यांनी तयार केलैली श्रीरामांची मूर्ती स्थापन केली जाणार आहे. या मंदिरासाठी ३ हजार २०० रू. कोटीची देणगी मिळाली, अशी माहिती आहे. काशीचे गणेशजी शास्त्री यांनी मुर्हूत काढला. मुहूर्ताचा व देशातील निवडणुकीचे काही देणे -घेण नाही, असे स्पष्ट सांगितले आहे.

ज्योतिषशास्त्रानुसार भगवान श्री प्रभूरामांचा जन्म त्रेतायुगात अभिजीत मुहुर्तावर झालेला आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी अभिजीत मुहूर्त आहे. याच दिवशी सिध्दी, अमृत, रवी,अनेक शुभ योग येत आहेत. ती वेळ दुपारी १२.२९.८ ते १२.३०.३२ अशी आहे.प्रभू रामचंद्राची प्रतिष्ठापणा काशीचे पंडित लक्ष्मीकांत दीक्षीत यांच्या नेतृत्वाखाली १२१ पुरोहित उपस्थितीत होणार आहे.या सोहळ्याला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री योगी,राज्यपाल श्रीमती आनंदीबेन पटेल,सरसंघचालक मोहन भागवत, महंत नृत्य गोपालदास हे सहभागी होणार आहेत. पण काँग्रेस पक्षाला यांची उपस्थिती बोचत आहे.या सोहळ्यानिमित्ताने अयोध्या- नगरी सजलेली आहे.अयोध्येचा राजा प्रभूरामचंद्रजी विराजमान होत आहे,हा भारतीयांसाठी आनंदाचा, उत्सवाचा आणि अभिमानाचा दिवस म्हणून या दिवशी देशभरात दिवाळी साजरी केली जात आहे. भारतातील अयोध्याचे राम मंदिर हे विश्वाला हिंदू -मुस्लिम एकता आणि बंधूतत्वाचा संदेश देणारे असणार आहे. अहो! मुस्लिम राष्ट्रात, म्हणजे इंडोनिशिया हा नव्वद टक्के मुस्लिम लोकसख्या असून तेथील पाच वेळा नमाज पढने मुस्लिम बांधव रामाला 'सलाम" करतात! तेथे पंधरा दिवस रामलिलाचा कार्यक्रम होतो. ते रामाला आपले पूर्वज मानतात.! आता तर संयुक्त अरब अमिरात राष्ट्राची राजधानी अबूधाबी ठिकाणी अयोध्येप्रमाणे हिंदू मंदिर उभारले जात आहे. तेव्हा थोडी तरी लाज वाटू द्या! भारतीय संस्कृती व हिंदू धर्माचा अभिमान बाळगा!




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# ते चाळीस दिवस...

ही घटना आपल्यासमोर अनेक प्रश्न उभे करते. आपल्याकडील मुले समजा अशा विपरीत परिस्थितीत अपघाताने सापडलीच तर ती कितपत तग धरू शकतील ? आपण मुलांना शालेय शिक्षण देत असताना अशी काही कौशल्यं शिकवतो का ? पूर, भूकंप, आगीच्या घटना, रोगाच्या साथी,दुष्काळ आणि अन्य काही नैसर्गिक आपत्तीपांसून बचाव करायचे आपण त्यांना शिकवतो का ? आपण त्यांना फक्त पुस्तकी किडे बनवत नाही का ? घोकंपट्टी करून परीक्षेत उतरवलेले ज्ञान अशा परिस्थितीत कितपत उपयोगी ठरू शकेल ? आपण मुलांमध्ये पोहणे, झाडावर चढता येणे, सायकल चालवता येणे, आपल्या वाहनाची दुरुस्ती करता येणे, जंगलातील वनस्पती आणि फळांची माहिती असणे, पाण्याचा शोध कसा घ्यायचा यासारख्या गोष्टींची कौशल्ये विकसित करतो का असा प्रश्न आहे. दरवर्षी वेगवेगळ्या सहलीमध्ये अनेक विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू अशा प्रकारच्या बातम्या आपण वाचतो. घनदाट अरण्ये, वाळवंट इ. ठिकाणी हरवण्याच्या घटना घडू शकतात. असे प्रसंग सांगून येत नाहीत. अशा प्रसंगी साहस, प्रसंगावधान, जीवन जगण्याची दुर्दम्य इच्छा, आलेल्या प्रसंगाला तोंड देण्यासाठीची सकारात्मक आणि कणखर मानसिकतेची आवश्यकता असते. कोलंबियात घडलेल्या अशा घटना आम्हाला विचार करण्यास प्रवृत्त करतात. प्रश्न असा आहे की आपण त्यापासून काही शिकणार का ?





# आनंदी पहाट

## व्यक्तिमत्त्वाचे अस्तित्व समजून घ्यावे

आधुनिक केसरी

आपल्या जन्मापासूनच आपलं स्वतंत्र अस्तित्व निर्माण झालेलं असतं. आपलं स्वतःचं आयुष्य प्रत्येकजण आपापल्या पिंडानुसार व्यतीत करत असतो. आपल्या आवडी-निवडी, विचार-आचार, उठणं-बसणं, चालणं-बोलणं, हसणं-रुसणं हे सर्व काही इतरांपेक्षा नेहमीच भिन्न असतं. हे सर्व भिन्न असण्याचं सर्वात महत्वाचं कारण म्हणजे निसर्गानं आपल्याला दिलेला भिन्नतेचा अधिकार. प्रत्येकाचा पिंड निराळा असतो, जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती. आपलं स्वातंत्र्य अबाधित राहण्यामागे आपल्या अधिकाराची जाणीवच कार्यरत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या वक्तृत्वामुळे, नेतृत्वामुळे आणि कर्तुत्वामुळे प्रत्येकाची ओळख होत असते. काही जणांची ओळख त्यांच्या दातृत्वामुळे, मातृत्वामुळे किंवा पितृत्वामुळे होत असते. यांपैकी आपलं व्यक्तिमत्व कोणत्याही कारणांमुळे स्वतंत्र अस्तित्व बनवत असलं तरीही त्या व्यक्तिमत्वाची नाळ कशा-ना-कशाशीतरी म्हणजेच नैसर्गिकरीत्या प्राप्त झालेल्या आपापल्या अधिकारांशी जोडलेली असते. व्यक्ती म्हणून कितीही स्वतंत्र अस्तित्व असलं तरीही शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक पातळीवर कोणतीही व्यक्ती एकट्याने जीवन आनंदी करू शकतेच असं नाही. प्रत्येकाला कोणाची का होईना पण साथ, सोबत, संगत हवी असतेच. शरीरानं जसं फार काळ कोणी एकटं राहू शकत नाही, तसंच मनानं देखील एकलेपण अधिक काळ सुखावह ठरत नाही. एकलेपणाची अनुभूती घेणारं आपलं मनच मग प्राप्त असलेल्या अधिकाराच्या जाणीवेनं कृतीशील होऊ लागतं. आपली सुख-दुःख, भाव-भावना, विचार-आचार, ह्या बाबींची देवाणघेवाण करायला वावच नसतो, असं नाही. परंतू संवादाच्या माध्यमातून सुखाच्या यशोशिखरांवर पोहोचण्यासाठी आपापसातील संवादालाच बगल दिली जाते. परस्परांमधील नातेसंबंध, आपलेपणाची भावना, जिव्हाळा, प्रेमाचा ओलावा कसा आणि कोण टिकवणार? हाच कळीचा मुद्दा आहे. कुटुंबातील परस्परांवर प्रेम करण्याचा अधिकार देखील न समजण्याची उणिव दिवसेंदिवस वाढत चालल्याचं दिसून येतं.

# भाकरी...

आधुनिक केसरी

"आधी हाताला चटके तवा मिळते भाकरी." शंभर टक्के खरय .भाकरी भाजताना हाताला खूप चटके बसतात. कधीकधी हात भाजतात सुद्धा. पण हे भाकरी करणाऱ्यालाच माहीत असते. सगळ्या जेवणात खमंग, रुचकर, चवदार काय असेल तर ती भाकरी. बाजरीची असेल तर ती चवदार पण आणि पौष्टिक सुद्धा आहे. ही भाकरी मिळवण्यासाठी मात्र पूर्ण आयुष्य जातं .पैसा असेल तरच भाकरी मिळते." भाकरीचा चंद्र शोधण्यातच आयुष्य बरबाद झालं". अगदी बरोबर. चंद्रासारखी गोल गरगरीत मोहक भाकरी पण ती मिळवण्यासाठी आयुष्य कारणी लागतं. पंचमहाभूतांपासून तयार झालेली ही भाकरी मिळवणं पाहिजे तेवढं सोपं नाही. भाकरी थापताना काही सुगरण बायका खरंच अगदी चंद्रासारखी गोल गरगरीत थापतात. तर काही जणी नकाशे बनवतात. खूप सुंदर भाकरी करता येणे ही सुद्धा एक कलाच आहे. ती फुगली पाहिजे. जळाली नाही पाहिजे. चांगली खमंग भाजली पाहिजे. भाकरी ऐवजी भाकरी करणारी फुगायला नको. नाहीतर भाकरी जळालीच म्हणून समजा. आजारी व्यक्तीसाठी सुद्धा भाकरी पौष्टिक आहे. कोणी उपाशी असेल तर चतकोर भाकरी जरी मिळाली तर तेवढी खाऊन पाणी पिऊन तो तृप्त होतो. एका भाकरीत कुत्रा गाय अतिथी यजमान यांचा समावेश असतोच. आजकाल बरेच मुलं म्हणतात मला फक्त भाकरी थापू बायको नको .पण कोणी सांगितलं की भाकरी थापू मुलगी ही फक्त गृहिणीच असते? तिचा मोठा हॉटेलचा, मेसचा व्यवसाय ही असू शकतो .काही आचारी फक्त भाजी करतात मग पोळ्या भाकरी करायच्या कोणी? अशावेळी ती भाकरी थापून हे करू शकते. तेव्हा कोणीही लहान मोठे नाहीत .सगळेच लोक आपापल्या जागेवर योग्य आहेत. आपल्या घरात पण आई ,बहीण, पत्नी या भाकरी थापतात.पोळ्या करतात. म्हणूनच आपण वेळेवर गरमागरम जेऊ शकतो. पोळ्या भाकरी करणारी ही अन्नदाता भव असते.. तीच खरी या भाकरीची मालकीण असते .सगळ्यांना गरमागरम भाकरी देऊन स्वतः चंद्रासारखी गोड फुलते...

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग.३३




# निरूपण

आधुनिक केसरी

पुढें बैसोन पांच जण ।वांटे केले तत्समान ।
बापलेंकांचें भांडण ।तोडिलें तेहीं ॥२३॥
बापास वेगळें घातलें ।कोंपट बांधोन दिधलें ।
मन कांतेचें लागलें ।स्वार्थबुद्धी ॥२४॥
कांता तरुण पुरुष वृद्ध ।दोघांस पडिला संमंध ।
खेद सांडून आनंद ।मानिला तेहीं ॥२५॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

शत्रु मित्र नहिं जगत में,
सब को एक समान ।
भजन विवेक विचार में, सब से रहें
अमान ।।१४।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल
नवम अध्याय) ०४/०९/१४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विरक्त संत भक्ती आणि विवेक
निमग्न होऊन स्वतंत्र आणि
निर्भयपणे जगात वावरत असतात.
जगात त्यांचा कोणी शत्रू किंवा कोणी
मित्र असत नाही. ते सर्व प्राणिमात्रांस
एकसमान दृष्टिने पाहतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

पण त्याचे दोन वर्गात वर्गीकरण करता येईल.
१ )स्वस्वरूपाचा अनुभव असणा-या माणसं
२ ) स्वस्वरूपाचा अनुभव नसणारी माणसं.
पहिल्या वर्गाच्या अनुभव अतींद्रिय अदृष्य परमात्मस्वरूपाचा तर दुसरा वर्ग हा अनुभव इंद्रिय गोचर दृष्य नाशवंत वस्तूंचा आहे. स्वस्वरूपाचा अनुभव असणारे ज्ञानी असे म्हणतो. की ते "स्वस्वरूप ओळखून वागत नाहीत ते अज्ञानी होत." तसं पहायला गेलं तर दोघांचे अनुभव वेगवेगळे आहेत. पातळी,कक्षा,साधने वेगवेगळे आहेत. ज्ञानी माणसाला ज्ञानपूर्वकाली अज्ञानाचा अनूभव असतो.म्हणून त्यास ज्ञानोत्तरकाली अज्ञानी माणसाच्या दृष्टीकोन नाची कल्पना असते. पण अज्ञानी माणसाला मात्र ज्ञानी माणसांचा दृष्टीकोन समजत नाही. ज्ञानी पुरूष आत्माशी तदाकार असतो. तर अज्ञानी देहाशी एकरूप होतात. ज्ञानीपुरूष अज्ञानाची भाषा समजू शकतो पण अज्ञानी ज्ञानाची भाषा समजू शकत नाही. यासाठी ज्ञानवंत होण्यासाठी संत सहवासात रहावे.

# गहिनीनाथ


आधुनिक केसरी

व इकडील सविस्तर मजकूर सांगितला. मग तो ब्राह्मण मोठया आनंदाने मुलास आणि गहिनीनाथास घेऊन निघाला, तो मजल दरमजल करीत करीत गर्भाद्रिपर्वती येऊन पोहोचल्यावर त्याने गहिनीनाथास मच्छिंद्रनाथाच्या पायांवर घातले. त्या वेळेस त्याचे वय सात वर्षाचे होते. मच्छिंद्रनाथ मुलाचे मुके घेऊं लागला. त्या नंतर हा गहिनीनाथ करभजन नारायणाचा अवतार असल्याचे त्याने सर्वांस निवेदन केले. त्या वेळीं शंकरानें मच्छिंद्रनाथास सांगितलें कीं, आम्हास पुढें अवतार घ्यावयाचा आहे, त्या वेळीं मी निवृत्ति या नांवानें प्रसिद्धीस येईन व हा गहिनीनाथास अनुग्रह करील; यास्तव यास अनुग्रह देऊन सकल विद्यांमध्यें प्रवीण करावें. हें ऐकून मच्छिंद्रनाथानें गोरक्षनाथाकडून गहिनीनाथास लागलाच अनुग्रह देवविला. तसेंच संपूर्ण देवांच्या समक्ष त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेविला हा समराधनेचा समारंभ एक महिनाभर सतत चालला होता. मग गोरक्षानें कुबेरास सांगितलें कीं, तूं हा सुवर्णाचा पर्वत घेऊन जा.

# नामस्मरण, शरणागती आणि भगवत्प्राप्ती

आधुनिक केसरी

भगवत्प्राप्तीला शरणागतीशिवाय मार्ग नाही, आणि शरणागतीला नामस्मरणासारखा उत्तम उपाय नाही. शरणागती म्हणजे, ‘मी कर्ता’ हा अभिमान नाहीसा होऊन, ‘सर्व कर्तृत्व परमेश्वराचे आहे’ ही दृढ भावना होणे. नामाशिवाय इतर साधनांत ‘कृती’ आहे; म्हणजे ‘मी कर्ता’ या अहंकाराला वाव आहे. स्मरण हा मनाचा धर्म असल्याने त्यात कृतीचा प्रश्नच येत नाही, म्हणून त्यात अहंकाराला वाव नाही; शिवाय, स्मरण किंवा विस्मरण या दोन्ही गोष्टी आपल्या हातात नाहीत; म्हणून नामाचे स्मरण झाले तरी त्यात स्वतःचे कर्तृत्व नसते, त्यामुळे ‘मी कर्ता’ ही जाणीव टिकू शकत नाही. ‘मी नामस्मरण करतो’ हा शब्दप्रयोगसुद्धा बरोबर नाही, कारण नामाचे स्मरण ‘होत असते,’ ते ‘करू’ म्हणून जमत नाही. म्हणून शरणागतीला नामस्मरणासारखे दुसरे साधन नाही. शरणागतीचा दुसरा अर्थ म्हणजे कायिक, वाचिक आणि मानसिक क्रिया थांबविणे. क्रिया न करणे हे कृती करण्यापेक्षा केव्हाही जास्त सोपे आहे; म्हणजेच शरणागती



ही सहज-साध्य वाटली पाहिजे. पण अनुभव तसा येत नाही. जी गोष्ट अत्यंत सोपी वाटते ती करायला पुष्कळदा कठीण जाते असा अनुभव येतो. एखाद्याला मोटार वेगात चालव म्हटले तर तो ते सहज करील, पण अती हळू चालव म्हटले तर ते फार कठीण जाते. म्हणून काहीही कृती न करणे हे कृती करण्यापेक्षा फार कठीण असते. गीतेत भगवंतांनी अर्जुनाला ‘तू नुसता मला शरण ये’ असे सांगितले आहे. देहबुद्धी गेल्याशिवाय शरणागती येत नाही. देहबुद्धी, वासना, अहंकार ही सर्व एकच आहेत. जगातल्या वैभवाची आसक्ती आणि परमात्मप्राप्ती या दोन्ही गोष्टी एकत्र असूच शकत नाहीत. म्हणूनच उद्धवाला श्रीकृष्णांनी एकांतात जाऊन हरिचिंतन करायला सांगितले आणि असे केल्यानेच माझी तुला खरी प्राप्ती होईल असे म्हणाले. याचा अर्थ हाच की, जगाकडे पाठ फिरविल्याशिवाय भगवंत मिळत नाही. भगवंताच्या प्राप्तीचे नियम आणि व्यवहारातल्या वस्तू प्राप्त करून घेण्याचे नियम यांमध्ये फरक आहे. मनामध्ये वासना उत्पन्न झाली असता ती तृप्त करून घेण्यासाठी देहाची आणि वस्तूंची हालचाल करणे, हा व्यवहार होय. सूक्ष्म वासना देहाच्या साह्याने जड बनणे हे व्यवहाराचे खरे स्वरूप आहे. परंतु भगवंताचे याच्या उलट आहे. भगवंत हा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे, त्याची प्राप्ती करून घेणे म्हणजे जडामधून सूक्ष्माकडे जाणे होय. तेव्हा त्याचे साधन हेही जडामधून सूक्ष्माकडे पोहोचविणारे असले पाहिजे. जड देहाशी संबंधित आणि सूक्ष्माशी निकट चिकटलेले असे साधन असेल तर ते नामच होय. ३७. अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही.

रविवार, २१ जानेवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १५६

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 21 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-156 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-05




वाढला गारवा जरी, पोटासाठी मी जागतो... मी शेत राखतो... मी शेत राखतो. छायाचित्र : प्रा. श्याम हेडाऊ

# मनोज जरांगे पाटील मुंबईकडे रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** मराठा आरक्षणासाठी 26 जानेवारीला आंदोलन करण्यासाठी मराठा समर्थक घेऊन मनोज जरांगे पाटील आंतरवाली सराटीमधून निघाले आहेत. मुंबईतील मैदानात आमरण उपोषणाला सुरुवात करणार असलेल्या जरांगेंनी शेवटची खेळी करत आंतरवालीमधूनच उपोषणाला सुरुवात केली आहे. सरकारने बघ्याची भूमिका घेतल्यामुळे मुंबईत यावे लागत आहे, अशी टीकाही मनोज जरांगे यांनी केली. आंतरवाली सराटीमधून निघण्यापूर्वी मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी सरकारवर हल्ला करताना त्यांचे डोळे पाणावले. आंतरवाली सराटीमधील पत्रकार परिषदेत मनोज जरांगे यांना अश्रू अनावर झाले. पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, 'तुम्ही आरक्षण दिले असते तर मुंबईला जाण्याची गरज भासली नसती. मी समाजात असो अथवा नसो माझ्या छातीत गोळ्या जरी घातल्या तरी आता घेणार नाही. मी तुमच्यात असो-नसो आरक्षण घेतल्याशिवाय माघार घेवू नका. अशी भावनिक साद ही त्यांनी समाजाला घातली. आतापर्यंत काय-काय घडले आहे हे सगळ्यांना माहीत असून मुंबईच्या आंदोलनात एकत्र ताकद दाखवा असे आवाहनही त्यांनी केले. मी असेल नसेल एकजूट फुटू देऊ नका आणि एकी तशीच ठेवा, असेही ते यावेळी म्हणाले. 'आम्ही आमचेही टप्पे पाडलेले असून माझ्या सोबत किती लोक दिसतील माहीत नाही. पण मुंबई जवळ गेल्यावर हा आकडा कोट्यावधी आंदोलकांचा होणार असा इशाराही त्यांनी सरकारला दिला. ही आता शेवटची लढाई आहे कुणीही घरी थांबू नका, असे आवाहन त्यांनी समाजाला केलं आहे. या उपोषणामुळे माझं शरीर मला साथ देत नाही. मी तुमच्यात असो-नसो आरक्षणाचा माझा विचार मरु देऊ नका. आंदोलन सुरूच ठेवा. आरक्षणासाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांची आठवण माझ्या डोळ्यासमोर आली म्हणून माझ्या डोळ्यात पाणी आले, असे ते यावेळी म्हणाले. आता बघ्याची भूमिका आम्ही घेणार नाही.

## ...श्रीराम परत एकदा राजाराम झाले

आधुनिक केसरी

*बावीस जानेवारीला राम येणार अयोध्याला*
*पारावार नाही आता जनतेच्या आनंदाला,*
*बोलत आहे आता प्रत्येक आनंदाश्रू डोळ्यातला*
*खूप वाट पाहावी लागली या स्वर्ण उत्सवाला.*

*जेव्हा राम आले होते चौदा वर्षानंतर*
*अयोध्यावासीयांनी दिवाळी साजरी*
*केली, चमकत होते प्रत्येक घर,*
*आता तर श्रीराम आले पाचशे वर्षानंतर*
*आता तर भारत सारा सजनार, झगमगणार.*

*साडेसात कोटींचा तिथे दिवा लागणार*
*एकशे आठ फुटांची तिथे अगरबत्ती जळणार,*
*अयोध्येमध्ये आता फक्त चमत्कार होणार*
*कारण जगातील सर्वात मोठा घंटा तिथे वाजणार.*

*वीस लक्ष दिव्यांच्या प्रकाशात*
*श्रीरामाचे स्वरूप पाहणार*
*राम सीता लक्ष्मण आता सोबत दिसणार,*
*ताजमहल पेक्षाही सुंदर दिसत आहे राम मंदिर*
*आता श्रीराम परत एकदा राजाराम होणार.*

*मोदी योगी होते म्हणून शक्य हे झाले*
*जे स्वप्न आपण पाहिले, ते पूर्ण त्यांनी केले,*
*ताडपत्रिमधले राम स्वर्ण मंदिरात आले*
*त्यांच्यामुळेच तर श्रीराम परत*
*एकदा राजाराम झाले.*




**वेदिका प्रकाश दांदडे**
**वर्ग :- ८ वा**
**सनराईज इंग्लिश स्कूल, रिसोड,**
**मो. 9881333157**


# अयोध्यानगरी सजली-रामनामाने दुमदुमली

## जगभरातील रामभक्त दाखल : सुरक्षा व्यवस्था कडक

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या : सोमवारी होणाऱ्या रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची सर्व तयारी अयोध्येत पूर्ण झाली आहे. या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अयोध्येतील सुरक्षा व्यवस्थादेखील कडक करण्यात आली आहे. तसेच आता राम मंदिराच्या उद्घाटनाच्या दिवशी अयोध्येत राहणाऱ्या लोकांनाही शहरात प्रवेश घेताना त्यांचे ओळखपत्र दाखवावे लागणार आहे. एवढेच नाही तर मंदिराच्या सुरक्षेसाठी तीन स्तरावरील सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.**



अयोध्येतील या भव्य दिव्य सोहळ्याचे आमंत्रण अनेक दिग्गजांना देण्यात आलंय. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेचे देखील त्याप्रमाणे नियोजन करण्यात आलें. यावेळी अनेक व्हीयायपी आणि व्हीव्हीआयपी पाहुणे उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आलीये. त्याच पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश पोलिसांसह केंद्रीय यंत्रणांकडूनही सुरक्षेत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची काळजी घेतली जाते. त्यामुळे आता नागरिकांना देखील त्यांचे ओळखपत्र दाखवावे लागणार आहे. शनिवारपासून अयोध्येची सीमा सील करण्यात आली असून बाहेरील लोकांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. वाहतुकीच्या दृष्टीने शुक्रवारी रात्रीपासून वाहतूक वळवण्यात आली आहे. अमेठी, सुलतानपूर, गोंडा, लखनौ, बस्ती येथून अयोध्येच्या दिशेने येणाऱ्या गाड्या वेगवेगळ्या मार्गाने त्यांच्या इच्छित स्थळी पाठवण्याची तयारी सुरू आहे. मंदिराच्या सुरक्षेसाठी केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) आणि पीएसी तैनात करण्यात आले आहे. शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश पोलिसांनी अतिरिक्त सैनिक तैनात केलेत. याशिवाय एआय, सीसीटीव्ही आणि ड्रोनच्या माध्यमातून शहरावर नजर ठेवली जाईल. 22 जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते हा प्राणप्रतिष्ठापनेचा सोहळा पार पडणार आहे.पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी असेलेले स्पेशल प्रोटेक्शन ग्रुप देखील अयोध्येतील सुरक्षा व्यवस्था पाहत आहेत. तसेच उत्तर प्रदेश पोलीस आणि पीएसीचे 1400 अधिकारी मंदिर परिसराच्या बाहेर रेड झोनमध्ये तैनात असतील.

अवघ्या काही तासांवर अयोध्येतील राम मंदिराचा सोहळा येऊन ठेपला आहे. त्यासाठी संपूर्ण अयोध्येसह संपूर्ण देशात उत्साहाचे आणि आनंदाचं वातावरण पाहायला मिळतंय. तसेच या सोहळ्यासाठी अनेक दिग्गज निमंत्रित आहेत. या सोहळ्याला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले.

प्रभू रामाच्या प्राण प्रतिष्ठेसाठी 10 टन अक्षता वाडा येथून अयोध्येकडे रवाना झाल्या आहेत .वाडा कोलमच्या अक्षता अयोध्येत लाखो भाविकांच्या हातात जाणार असल्याने वाडा कोलमचा हा मोठा सन्मान असल्याचे वाड्यातील वाडा कोलम उत्पादक शेतकऱ्यांकडून सांगितले जात आहे . भगवान रामाचा प्रसाद म्हणून विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते देशभरामध्ये जवळपास 62 कोटी लोकांपर्यंत वाडा कोलमच्या अक्षता पोहोचवणार आहेत . वाडा तालुक्यातील एका शेतकरी पुत्राने स्थापन केलेल्या बीज उत्पादक कंपनीकडून राम मंदिर लोकार्पण सोहळा आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी 10 टन तांदूळ दान करण्यात आला असून हा तांदूळ श्री राम जन्मभूमी न्यासाकडे पाठविण्यात आला आहे .

राम मंदिराच्या लोकार्पणाचा सोहळा अतिशय भव्यदिव्य साजरा करण्याचा प्रयत्न केला जातोय . या कार्यक्रमासाठी जगभरातील रामभक्त अयोध्येत दाखल होत आहेत . विशेष म्हणजे विदेशातील आलेल्या रामभक्तांनी अयोध्येत सर्वांना आकर्षित केल्याचं बघायला मिळत आहे .संपूर्ण राम मंदिर फुलांनी सजवलं आहे . लाखो भक्त अयोध्येत दाखल होत आहेत . भाविकांकडून जय श्रीरामचा जयघोष अयोध्येत केला जातोय . विदेशातूनही भक्त आले आहेत . अमेरिका आणि वेगवेगळ्या देशाचे नागरीक या ठिकाणी आले आहेत . एस्कॉनची पदयात्रा ही दिल्लीवरुन निघाली होती आणि ती आज अयोध्येत दाखल झाली आहे . हे भक्त भजन-कीर्तनात तल्लीन झाले आहेत . राम मंदिर कॉरिडोअरच्या परिसरात एस्कॉनची पदयात्रा दाखल झाली तेव्हा मोठा जल्लोष करण्यात आला . अमेरिकेहून आलेले रामभक्त श्रीकृष्ण चैतन्य स्वामी हे भाविकांसोबत रामलल्लांच्या भजनात तल्लीन झाले .

# अयोध्येतील रामललाच्या अभिषेकदिनी घरी अशाप्रकारे करा पूजा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** 22 जानेवारी 2024 हा रामभक्तांसाठी ऐतिहासिक दिवस असणार आहे. ज्या दिवसाची सर्व राम भक्त वर्षानुवर्षे वाट पाहत होते तो दिवस अखेर येणार आहे. जेव्हा वैदिक परंपरेनुसार रामललाचा अभिषेक अयोध्येतील भव्य राम मंदिरात होणार आहे. हा सोहळा अनुभवण्यासाठी प्रत्त्येकालाच अयोध्येला जाणे शक्य नाही. जर तुम्ही अयोध्येला जाऊ शकत नसाल, तर रामललाच्या अभिषेक दिनी त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी तुम्ही घरी कोणत्या पद्धतीने त्यांची पूजा करू शकता आणि पूजा करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. 22 जानेवारी, रामललाच्या अभिषेक दिनी आपल्या घरातील देवघराची पूर्णपणे स्वच्छता करा. देवघरात कोणत्याही प्रकारची धूळ नसावी. त्यानंतर देवघरात ठेवलेल्या सर्व देवांचा पाणी व पंचांमृताने अभिषेक करा. प्रभू रामाच्या मूर्तीला किंवा फोटोला अभिषेक करा. स्वच्छ कपड्याने पूसावे. उत्तर आणि पूर्व दिशेमधील भाग ईशान्य कोपरा मानला जातो. घरातील देवघर या दिशेलाच असावे. त्यामुळे घराच्या ईशान्य कोपऱ्याच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. असे केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा येते.



**अशा प्रकारे करा प्रभूरामाची पूजा**

- देवघराची स्वच्छता केल्यानंतर घरातील सर्व सदस्यांनी आंघोळ करून स्वच्छ कपडे परिधान करावेत . आता एका चौरंगावर लाल कापड पसरवा आणि राम दरबार किंवा भगवान श्री रामाची मूर्ती किंवा फोटो स्थापित करा .
- प्रभू रामाचा आशीर्वाद मिळवण्यासाठी श्रीरामांसमोर हनुमानजींची पूजा करा आणि त्यांना लाल वस्त्र अर्पण करा, कारण असे मानले जाते की हनुमानजींच्या पूजेशिवाय भगवान श्रीरामाचा आशीर्वादही मिळत नाही .
- प्रथम भगवान रामाच्या मूर्तीला पाण्याने अभिषेक करा आणि नंतर पंचामृताने स्नान करा . त्यानंतर पून्हा स्वच्छ पाण्याने स्नान घाला .
- आता प्रभू रामाला धूप, दिवा, फुले आणि तिलक अर्पण करा आणि प्रभू रामाच्या नैवेद्यात मिठाई आणि सुका मेवा ठेवा . रामजन्म स्तुतीने प्रभू रामाची पूजा सुरू करा .
- प्रभू रामाची पूजा करताना तुम्ही रामरक्षा स्तोत्राचा पाठही करू शकता . राम स्तोत्र पठण केल्याने प्रभू रामाचा आशीर्वाद नेहमी साधकावर राहतो . प्रभू रामाच्या आरतीने पूजेची सांगता करा .

# श्रीराम : सनातन संस्कृतीचा विश्वात्मक ठेवा



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**प्रत्येक गोष्टीची अनुभूती घेता येते असे नाही. काही बाबी तर्काने समजून घ्यायच्या असतात. विशेषतः जनमानसात प्रचलित असलेल्या दैवतकथांच्या बाबतीत तर आपणांस त्याशिवाय पर्याय असत नाही. श्रीरामाच्या लोकोत्तर अवतारित्वाबद्दल तर असेच म्हणावे लागेल. अगदी युरोप आणि आशियायी देशातील रामाच्या पदचिन्हाचा मागोवा घेताना तर्काशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही. राम, कृष्ण आणि इतर भारतीय उपास्य देवतांच्या प्रति असलेली भारतीय आणि जागतिक सदभावना याच आधारे समजून घेता येईल. महर्षी यास्कांच्या निरुक्तात एक छोटीच पण अर्थपूर्ण कथा येते. पूर्वीच्या काळी ऋषी नसल्याने सर्व मनुष्य देवाकडे गेले आणि म्हणाले की, को न ऋषिर्भविष्यती?**



## क्षितिजापल्याड

तेव्हा देवांनी त्यांना तेभ्य एतं तर्कमृषि प्रायच्छन; असा उपदेशकेला. म्हणजे यापुढे तर्कऋषी हेच सर्वांचे मार्गदर्शक असतील असे सांगितले. याच तर्काच्या आधारे आपणास श्रीराम आणि भारतीय संस्कृतीच्या बाबतीतील पदर उलगडावे लागणार आहेत. रामाच्या पूर्वी आणि नंतर सुद्धा भारतवर्षात अनेक राजे महाराजे होऊन गेले, पण रामनामाची मुद्रा भारतीय जनमानसावर ज्या रीतीने उमटली तशी आणि तेवढ्या प्रमाणात इतरांची नाही. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संघर्षात आणि विपरीत परिस्थितीतहीसंतुलन कसे राखायचे याचा जणू वस्तुपाठच श्रीरामाने अखिल मानवजातीला घालून दिला. रामनाम ही अभिमान, काम, क्रोध, मत्सर यावरची मात्रा आहे. राम म्हणता कामक्रोधाचे दहन | होय अभिमान देशधडी || आजच्या काळात हे जे विकार आहेत ते सर्वबाजूनी आपणास ग्रासून टाकत आहेत. वैयक्तिक धनसंपदेलाच आपण सफलता मानून जगण्यात मश्गूल आहोत. संपन्नता आणि सफलता या दोन्ही बाबी भिन्न आहेत. एखादा मनुष्य संपन्न नसेलही पण सफल असतो. सामाजिक जीवनात श्रीकृष्णाच्या जीवनमूल्यांपेक्षा रामचरित्रातील मूल्ये प्रभावी ठरतात त्याचे कारण राम सरळमार्गी आहे. पण कृष्ण छद्मी आहे. प्रत्येकाला हा छद्मीपणा जमेलच असे नाही. राजकीय कावेबजपणा, धुर्तता याचा लवलेशही रामाजवळ नसल्याने सामान्यांच्या हृदयस्थानी राम आहे. दोन माणसे भेटल्यानंतर आपसूकच मुखातून रामराम शब्द बाहेर पडतात. कारण ही सहजता रामनामात आहे. म्हणून संत कबीर म्हणतात, एक राम दशरथ का बेटा | एक राम घटघट मे बैठा || असा हा प्रत्येकाच्या हृदयस्थ राम विजनवासात न ठेवता मनमंदिरी प्रतिस्थापित व्हावा ही काळाची गरज आहे. अयोध्येत स्वगृही राम आसनस्थ होतील, उत्सव साजरे होतील, सोबतीला राजकारण दुथडी भरून वाहेल पण खरी गरज आहे राम आचरणात येण्याची. कारण भारतीय संस्कृतीचा गुणसमूच्चय म्हणजे श्रीराम. राम म्हणजे लोकसंस्कृतीतील आदर्श मुलगा, पती, भाऊ, पिता सर्व काही. हजारो वर्षापासून मानवी मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या दैवतकथांचा नायक म्हणजे राम होय. तौलनिक भाषाशास्त्राचा उदय झाल्यानंतर महत्त्वाचे तीन शोध लागले. पाश्चात्य भाषा पंडितांनी भारतीय, इराणी, ग्रीक, रोमन, केल्ट, जर्मन, स्कंडीनेव्हीयन व स्लाव्ह यांचा एकच वंश असून त्यास आर्यवंश म्हणतात हा एक शोध. दुसरा संस्कृत, रोमन, ग्रीक, अवेस्ता या भाषा कोणत्यातरी एका भाषेपासून निर्माण झालेल्या आहेत, जी भाषा आज उपलब्ध नाही. कारण या सर्व भाषेतील शब्दोच्चार आणि व्याकरणाच्या नियमातील काही प्रमाणात असलेली समानता. तिसरा महत्त्वाचा शोध म्हणजे या भाषा समूहामधील दैवतकथांबद्दल आणि संस्कृतीतील असलेली समानता. म्हणूनच अगदी युरोपपासून ते आग्नेय आशियातील शेवटच्या टोकापर्यंत काही समान सांस्कृतिक मूल्ये नवीन संशोधनात उजागर होत आहेत. या सर्वांमध्ये राम आणि इतर देवता समान आहेत. स्थळकाळपरत्वे त्यात बदल होणे साहजिक आहे. पण मुख्य धागा मात्र एकच आहे. आज आपण आपल्या उपास्य देवतेच्या बाबतीत आग्रही असतो नव्हे एकमेकांच्या विरोधात उभे राहतो. पण तुलसीदास



म्हणतात त्याप्रमाणे 'रामनाम मनी दीप धरू जीह देहरी द्वार | तुलसी भीतर बाहेरहूँ जौ चाहसी उजिआर' असे आपण वागत नाही. असे अंतर्बाह्य प्रकाशमान व्हायचे तर आपल्यातील वाईट गोष्टींचा त्याग सर्वप्रथम केला पाहिजे. आजच्या काळात बहुतांश समाजाला दोन रोगांनी पछाडले आहे. एक परनारी आणि परपिडा याबाबत असलेले औत्सुक्य. ही उत्सुकता आपल्या पाशवी मनाचे द्योतक ठरते आहे याची जाणीव देखील आपणास होऊ नये, एवढ्या खालच्या पातळीला आपण आज येऊन ठेपलो की काय अशी अवस्था. राम हा प्रदर्शनाचा नव्हे तर आपल्यातील दर्शनाचा भाग बनेल तेव्हा कोठे आपण सुधारलो असे म्हणता येईल. अन्यथा मंदिर होईल, अर्थचक्राला गती येईल, राजकारण केले जाईल, पण मनुष्यता विकसित होणार नाही. मंदिर निर्माणासोबतच मानवी मूल्ये आणि राष्ट्रनिर्माण झाल्यास रामावताराची फलसिद्धी झाली असे म्हणता येईल. या निमित्ताने शौर्य वाढावे आणि क्रौर्य कमी व्हावे, मुत्सद्देगिरी वाढावी आणि लबाडी कमी व्हावी, साधुत्व वाढावे आणि दूर्बलता कमी व्हावी, हुजरेगिरी कमी होऊन सत्यनिष्ठा वाढावी तरच श्रीरामाचा आपण काही आदर्श घेतला, असे होईल. राम राज्य राम प्रजा लोकपाळ | एकचि सकळ दुजे नाही; असे तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे सर्वांना सोबत घेऊन चालण्याची प्रेरणा त्यापासून मिळाली पाहिजे. पारंपरिक धार्मिक दृष्टिकोन बदलून राम हा आपल्या सांस्कृतिक विकास प्रक्रियेतील सर्वोत्तम मनुष्यत्वाचे फळ आहे ही दृष्टी आली पाहिजे. वैयक्तिक हेवेदावे आणि मतभेद बाजूला सारून सामाजिक समरसता कशी वाढेल याची काळजी प्रत्येकाला घ्यावी लागेल. आधुनिक काळात महात्मा गांधींनी या दृष्टीने बरेच कार्य करून आपल्या समोर एक वस्तुपाठ निर्माण करून ठेवला आहे. त्यांच्या ईश्वर अल्ला तेरो नाम | सबको सन्मती दो भगवानया प्रसिध्द भजनातून आपणास काहीएक प्रेरणा मिळण्यास हरकत नसावी. शेवटी आपुलाले तुम्ही करा रे स्वहित | वाचे स्मरा नित्य राम राम ||

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# सर्व विश्वचि व्हावे सुखी



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड


आधुनिक केसरी

**अनेक मनुष्याची सध्याची अवस्था फार वाईट झाली आहे. कोणीच कोणाला चांगलं म्हणण्यास तयार नाही, तसेच आपल्यापेक्षा कोणी मोठा होऊ नये ,असे अनेक जणांना वाटत आहे. त्यामुळे दुसऱ्याला सुखी पाहणे आताच्या अनेक लोकांना खरोखरच चांगले वाटत नाही, असे दिसत आहे. मनाचा मोठेपणा कमी झाला आहे , जो तो श्रीमंतीच्या पाठीमागे लागलेला दिसत आहे, इतरांना वेळ सुद्धा दिला जात नाही, आभासी जगात जीवन सध्या अनेक लहान-मोठे लोक जगत आहेत, अनेक सख्ख्या भावाचे विचार जुळत नाहीत ,त्यामुळे आई- वडील यांची घालमेल बघायला मिळत आहे, त्यामुळे वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे ,हे आज आपल्या भारतीय संस्कृतीला लाजवणारी गोष्ट आहे.भक्तांचे प्रबोधन करण्यासाठी पुत्रदा एकादशीच्या निमित्ताने आज निरूपणासाठी घेतलेला वरील अभंग आहे.**

बाराव्या शतकातील संत ज्ञानेश्वर माऊलींनी हे वचन म्हटले आहे. त्याचा प्रत्यय आज 21 व्या शतकात येत आहे. दळणवळण आणि संपर्क अशा अनेक आधुनिक साधनांनी हे जग अतिशय जवळ आले असले तरी मनाने फार दूर गेले आहेत, आज प्रसारमाध्यमे आणि संदेशवहन फार जवळचीच वाटत आहेत. वैश्विक खेड्यांची संकल्पना आज प्रत्यक्षात उतरत आहे.गावापासून जग जवळ येत आहे. एक एक माणूस एकमेकांना मोबाईल वरून जोडला जात आहे. माणसे मनाने दूर जात आहेत ;ती जवळ आल्या नंतर एकमेकांसोबत बोलत नाहीत. त्यामुळे अवघी मानवता दुःखी होत आहे. परंतु सर्व विश्वची व्हावे सुखी संताचा हा मौलिक विचार सर्वांच्या समोर यावा म्हणून हा अभंग निवडला आहे. त्यासाठी केलेला हा शब्द प्रपंच......

मानवाच्या मनातील माणुसकीचा झरा नेहमी जिवंत असेल तरच विश्वकल्याण साधने शक्य आहे. म्हणून अवघे विश्वची माझे घर असे म्हणता येईल विश्वकल्याण, माणुसकी समाज कल्याण, समाज प्रबोधन संतांच्या साहित्यात आहेत. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत तुकाराम, संत महात्मा बसवेश्वर ,संत चक्रधर स्वामी यांनी त्यांच्या साहित्यातून विश्वकल्याणा साठी परमेश्वराकडे देवाकडे, गुरुकडे हात जोडून साकडे घातले आहे. संत नामदेवांनी ही परमेश्वराकडे मागणी केली आहे. अहंकाराचा वारा न लागू राजसा । माझ्या विष्णू दासा भाविकांशी।। हे परमेश्वरा मला नेहमी नम्रपणा दे मला कधीही गर्व येऊ देऊ नकोस. विनम्रता केव्हाही जगाला आपलेसे करते. संत एकनाथ महाराजांनी सर्वांभूती भगवदभावो। हा चि निजभक्तीचा ठावो।।असे म्हटल्यामुळे प्राणीमात्रात मैत्री होते. मैत्री म्हणजे देणे किंवा घेणे नव्हे. दुसऱ्याला आधार देणे होय. त्यांच्या दुःखात आधार देणे. आपला आणि दुसरा यात फरक आहे. हे समजून घ्यावे.

संत ज्ञानेश्वर यासाठी भुता परस्परे पडो। मैत्र जीवाचे असे ते म्हणतात. व भक्तांना सर्वा विषयी मनात आपुलकी निर्माण करतात . व चांगल्या मार्गाने जाण्यासाठी त्यांच्या मनात चांगल्या विचारांची पेरणी करतात जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविते परोपकारी।। ही संतांची भूमिका जग जवळ आणण्याचे सामर्थ्य निर्माण करते .कारण त्यांना लोक हे वाया जात आहेत .अंधश्रद्धेला बळी पडत आहेत. दांभिकपणा वाढला आहे. चमत्कारावर विश्वास ठेवणारे जास्त लोक आहेत. व्रत्तवैकल्ये करून अंधश्रद्धेच्या खाईत लोटले जात आहेत. तेव्हा संत म्हणतात बुडतां हे जण न देखावे डोळां। येतो कळवळा म्हणूनिया ।। यासाठी लोकांनी सदसद विवेक बुद्धीने कार्य व वर्तन करावे, आणि चांगल्या लोकांची संगत धरावी. वाईट वागू व बोलू नये म्हणून संत तुकाराम महाराज देवाजवळ मागणे मागतात. संत संग देई सदा म्हणून मला चांगल्या लोकांची संगती दे वाईट लोकांचा मला सहवास नको ,दुराचारी ,व्यसनी लोकांपासून मला दूर ठेव ,चांडाळ चौकटीमध्ये मला जाऊ देऊ नकोस, त्यासाठी मला संतांची संगत हवी आहे असे ते म्हणतात सुसंगती सदा घडो। सुजन वाक्य कानी पडो।।म्हणून परस्पर सहकार्यातूनच मानवी जीवनाचे कल्याण होते. असे एक एक करता करता ही पृथ्वी सर्व आपल्या घरासारखी वाटू लागते म्हणून एक एका सहाय्य करूं। अवघे धरू सुपंथ। * असे म्हणून जगाच्या कल्याणासाठी प्रार्थना करतात. एकमेकांना मदत केली तरच दोन्ही व्यक्तीच्या जीवनात उत्कर्ष होतो. पुढील काळात वेळ कशी येईल हे कोणालाच सांगता येत नाही म्हणून संत रामदास महाराजांनी ही विश्वकल्याणासाठी कल्याण करी देवराया, जनहेत विंवरी। तळमळ तळमळ होतचि आहे*हे जन हाती धरी।असे म्हणून परमेश्वरा जवळ मागणे मागतात म्हणून सर्व भक्तांनी चांगले सत्कृत्ये करावीत. सर्व संतांनी भक्तासाठी परमेश्वराकडे मागणे मागितले आहे. त्याचा विचार भक्तांनी करावा.सर्व विश्वचि व्हावे सुखी असे वाटत असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी. वेळ वाया घालवणे. व्यसन करणे . खोटे बोलणे . इतरांना फसवणे कालहरण अपहरण करणे ,व्यर्थ गप्पा मारत बसणे हे संतांना मान्य नाही. म्हणून आजच्या समाजातील लोकांनी संत वचनाप्रमाणे वागल्यास हे संपूर्ण जग सुखी व्हायला वेळ लागणार नाही.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मोठी स्वप्ने आणि फलश्रुतीसाठी संकल्प



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**मोठे स्वप्न पहा, तुझे स्वप्न जितके मोठे असेल तितका माझा संकल्प मोठा असेल असा प्रगाड विश्वास प्रकट करून मोदी यांनी गांधी नगर शिखर परिषदेत नव्याने हमी दिली. त्यांच्या विकास सिद्धांचा हा एक नवा पैलू होय. पंतप्रधान नरेद्र मोदी हे स्वातंत्र्याच्या अमृत मोहत्सवी वर्षात अनेक नवीन चमत्कार घडवित आहेत. गुजरातचा मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी 4 वेळा काम पाहिले. त्यांनी गुजरातचे रूपांतर एका मॉडेल स्टेट मध्ये केले. दर वर्षी व्हायब्रंट गुजरात या नावाने परिषदेचे आयोजन केले जाते या वर्षी व्हायब्रंट गुजरातची 10 वी शिखर परिषद गांधीनगरच्या महात्मा भवनात संपन्न झाली. या शिखर परिषदेला या वर्षी 10 वे वर्ष होते या शिखर परिषदेचे नाव व्हायब्रंट गुजरात ग्लोबल समिट असे होते. 10 वर्षाच्या कामगिरीमध्ये एका नंतर एक यश शिखरे या परिषदेने गाठीली. या वर्षीच्या संमेलनामध्ये जगामध्ये प्रमुख 30 देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

तर विविध प्रकारच्या अंतरराष्ट्रीय विकास संघटनांचे प्रतिनिधी सुद्धा उपस्थित होते. भारतातची अर्थ व्यवस्था जगामध्ये 5 व्या क्रमांकाची बनली आहे आणि ती आता जगामध्ये तीसरे स्थान पटकविणार आहे परंतु हे आव्हान सोपे नाही त्यासाठी प्रत्येक भारतीयाला दररोज 16 तास काम करावे लागेल आणि चीनी लोकाप्रमाणे उद्योगी होऊन आपल्या उत्पादन व सेवामध्ये भर टाकावी लागणारी आहे.

**विदेशी गुंतवणूक महत्वाची :** भारताची अर्थव्यवस्था जर भक्कम व्हावयाची असेल तर देशात विदेशी गुंतवणूक म्हत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी मोठ्या दूरदृष्टीने व्हायब्रंट गुजरात या परिषदेचे आयोजन केले होते. त्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या परिषदेमध्ये अभियांत्रिकी क्षेत्रातील विकास, सेमी कंटक्टरची निर्मिती, ई-गतिमानता, हरित हायड्रोजन आणि नवीकरर्णीय ऊर्जा या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे प्रगतीचे करार करण्यात आले. या संमेलनामध्ये 41299 प्रकल्पावर सुमारे 2633 लाख कोटी रूपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. याचा अर्थ असा की, विदेशी गुंतवणूक खेचण्यात मागील 9 वर्षापेक्षा ही 10 वी शिखर परिषद अधिक यशस्वी ठरली आहे. विकासाच्या उदयोनमुख क्षेत्रामध्ये संरचनात्मक विकासासाठी गुंतवणूक फार आश्यक असते. अशी गुंतवणूक आकर्षित करण्यात या परिषदेला चांगले यश लाभले आहे. तीन दिवशीय गुंतवणूक शिखर परिषद कमालीची यशस्वी ठरली आहे. या परिषदेचे विचार मंथन भारताच्या विकासाला नवी गती देणारे ठरले आाहे. आपल्या भावी आर्थिक प्रगतिसाठी भांडवल, पायाभूत सुविधा तसेच प्रगत तंत्रज्ञान या तीन बाबी आवश्यक असतात या तीनही बाबतीत या शिखर परिषदेने नवा उच्चांक बिंदू गाठला आहे.

**परिषेदेतील सक्रीय सहभाग :** या शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी जगाच्या विविध देशातील नेते, मंत्री, अधिकारी (CEO) यांनी सक्रीय सहभाग नोंदविला त्यांनी गुजरात मध्ये विविध क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या घोषणा केल्या. गांधी नगर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बीन झायेद अल नाहायान यांनी आपल्या संक्षिप्त भाषणात पंतप्रधान नरेद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली सरकारच्या कामगिरीबद्दल कौतुक केल. पंतप्रधान मोदी यांनी पाहूण्याचे उत्साहाने स्वागत केले. या परिषदेमध्ये भारतातील शिर्ष उद्योजक मुकेश अंबानी, गौतम अडाणी तसेच काही प्रमुख कंपन्या पैकी मारूती सुझूकी, टाटा सन यांचे अधिकारी तसेच खाजगी कंपन्याप्रमाणे विविध देशाचे प्रमुख उपस्थित होते. यामध्ये संयुक्त अरब अमिरात मोझांबिक, तिमोर-लेस्ते, झेख प्रजासत्ताक, जपान, नेपाळ , ऐस्टोनिया, मोरोक्को आणि व्हिएतनाम यासारख्या प्रमुख देशांचे प्रतिष्ठीत नेते या शिखर परिषदेला उपस्थित होते. जागतिक गुंतवणूक दारांना आकर्षित करण्यासाठी त्यांना जोरदार मार्गदर्शन करतांना मोदी यांनी असे संक्षीप्त उदघाटन पर प्रतीपादन केले की विविध क्षेत्रामध्ये परस्पर संमतीसाठी नवीन संधी उपब्ध होत आहेत. मोदी यांच्या नेतृत्वाखाली गरूड झेप घेणारी भारत ही सशक्त अर्थ व्यवस्था बनली आहे. जगातील अनेक देश भारताकडे आता आशेने व विश्वासने पाहत आहेत. व चीन पेक्षा ही अधिक भारतामध्ये पुरवठा साखळी भक्कम करण्यासाठी विविधता जोपासण्यासाठी जगातील देश भारताकडे पहात आहेत. जग भारताकडे प्रतिभावात तरूणांचे व्यक्ती स्थान, ऊर्जा स्त्रोत म्हणून पाहत आहेत.

अर्थकारणाला गती देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचे संजीवनी सामर्थ्य भक्कम करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार उपाययोजना करत आहेत. त्यामुळे भारत आर्थिक क्रांतीच्या उबरठ्यावर उभा आहे. जागतीक पातळीवर विकासाची इंजीन गतीने पुढे नेण्यासाठी भारताला विश्वासू मित्र स्थैर्याचा आधार स्तंभ म्हणून पाहिले जात आहे. स्थैर्य आणि गतिमानता हा भारताच्या आर्थिक विकासाचा आधार स्तंभ होय. त्यामुळे गुंतवणूकीला चालना देणारे लवचीक धोरण उदयास येत आहे. आज भारत जागतिक पातळीवर भक्कम पणे उभा आहे. 10 वर्षापूर्वी भारत 11व्या स्थानावर होता आता तो 5 व्या क्रमांकावर आला आहे. या शिखर परिषदेमध्ये झालेले सामंजस्य करार नवीन वळण देणारे ठरले आहे. या प्रकारच्या विदेशी गुंतवणूकीमुळे संरचनात्मक विकासाला चालना प्राप्त होते. गतिमान अर्थकारण आणि संक्षम मनुष्य बळ हे सुत्र घेऊन या शिखर परिषदेमध्ये पायाभूत संरचनेसाठी विविध देशातील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यात आले. ज्यामुळे मध्यभारतातील विविध उद्योग धद्यांना चालणा मिळेल आणि रोजगार निर्मितीला हात भार लागू शकेल. गेल्या दशकातील नरेद्र मोदी यांच्या ठोस प्रयत्नामुळे झालेल्या रचनात्मक कार्याचे हे फलित होय. 10 वर्षापूर्वी भारतात 74 विमान तळे होती आता ती दुप्पट म्हणजे 149 वर गेली आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे जाळे दुप्पट झाले आहे. मेट्रो ट्रेनचे नेटवर्क तीप्पट झाले आहे आणि रेल्वे गाड्यांची संख्या 5 पट वाढली आहे. हे विकासाचे नवे मापदंड आहेत, नवे मैलाचे दगड आहेत. या परिषदेमध्ये तीनही सेमी कंडक्टर क्षेत्रातील गुंतवणूक केंद्र स्थानी राहिली आहे.

विशाल सेमी कंडक्टर फॅब्रीकेशन प्लॉटची निर्मिती करण्यासाठी भारतातील पहिल्या जीगा कारखान्याचे बांधकाम लवकरच साणंद येथे सुरू करण्यात येणार आहे. सेमी कंडक्टर प्रमाणेच इतर अनेक उद्योगपतीने त्यांच्या गुंतवणूक क्षेत्रातील हमी दिली. साणंदपासून आता ढोलेरा विशेष आर्थिक क्षेत्रापर्यंत गुजरात मध्ये त्याचा विस्तार होत आहे. तसेच टाटा सन चे चेरमन एम. चंद्रशेखर यांनी ढोलेरा विशेष सेमी कंडक्टर जोडणी प्लान्ट स्थापन करण्याची



घोषणा केली त्यासाठी वाटाघाटी पूर्ण करण्यात आल्या. नव्या वर्षात हा प्रकल्प मार्गी लागणार आहे त्यांनी असा पुनरूचार केला की, विमान निर्मिती प्रकल्प वडोदरा ते ढोलेरा या क्षेत्रात स्थापन केला जाईल त्याचे काम वेगाने चालू आहे. 30 आक्टोबर 2022 रोजी पंतप्रधानानी टाटा एअर बस संकाय (कंन्सोडियमच्या) विमान निर्मिती प्रकल्पाची पायाभरणी केली होती. त्यामुळे भारतीय हवाईदल दलासाठी विमाने तयार करण्यात येतील. एम. चद्रशेखर यांच्या मते 20 लिथीएम आर्यन बॅटरी तयार करण्यासाठी साणंद येथे नव्या प्रकल्पाची आखणी व उभारणी करण्यात येईल. आता या प्रकल्पाला नवी गती लाभत आहे. व्हायब्रंट गुजरातचे खरे यश म्हणजे प्रकल्पाची आखणी व उभारणी करण्यातील शास्त्रशुद्ध तयारी हे होय. तेथे नवे प्रकल्प उभारावेत त्यातून रोजगार निर्मिती व्हावी ही यामागील प्रमुख अपेक्षा होती. व्हायब्रंट शिखर परिषदेचे भविष्य काळातील खरे यश हे त्यामागील प्रमाणिक प्रयत्नावर अवलंबून असणार आहे. **मोठी स्वन्पे आणि संकल्प :** या परिषदेच्या संक्षिप्त उदघाटन पर प्रसंगी पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी केलेले भाषण गुंतवणूक दारांच्या ह्दयाला भिडणारे होते. त्यांनी आपल्या भाषणात तरूण उद्योजगाला एक मंत्र दिला आहे. "मोठी स्वप्ने पहा, तुझे स्वप्ने जिके मोठे तितका माझा संकल्प मोठा हे सूत्र घेऊन मोदी यांनी विकासाचा नव संकल्प मांडला. याचा अर्थ असा की, जनतेची स्वप्ने जिकी मोठी असतात तितका मोठा संकल्प निश्चय मोदी करतात. स्वप्ने पाहण्याच्या अनेक संधी आहेत आणि ती स्वप्ने पूर्ण करण्याची क्षमता देखील आहे असा उपसिद्धांत मांडला त्यामुळे भारतामध्ये लोक मोदी है तो मुमकीन है, मोदी म्हणजे असे विश्वासने मान्य करतात. रूडाल्फ नॅडलर यांनी म्हटल्याप्रमाणे "स्वप्ने पाहणे आणि ती कृतीत आणणे हे कठोर परिश्रमामुळे शक्य होते. ही स्वप्ने खरोखरच नव्या शिखरापर्यंत पोहचण्याठी पथदर्शक ठरतात.'' परंतु अशी स्वप्ने पाहतांना आपले पाय जमीनीवर ठेवून भक्कम कृती आराखडा तयार करून त्या आधारे वाटचाल करावी लागते. माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांचा असा मंत्र आहे की, "पाऊस पडताच सारे पक्षी बचावासाठी कुठे तरी आसरा शोधतात पण गरूड हा असा पक्षी आहे की तो ढगाच्या वरून उंच-उंच झेप घेत असतो.'' उद्योजकांनी या गरूडाप्रमाणे नवी झेप घ्यावी असा मोंदी यांचा संदेश आहे. जगातील प्रत्येक रेटिंग एजन्सी असा दावा करत आहेत की, येत्या काही भारत जागतील सर्वात मोठी 3 री अर्थव्यवस्था होईल.

**समारोप :** मोठी स्वप्ने पाहणे व ती कृती आणणे हा भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे. भारतामध्ये गेल्या दहा वर्षात प्रथमच जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ होत आहे. आणि शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना विशेष आर्थिक सहाय्य योजना दृष्टीपथात आली आहे त्यांचे उत्पन्न दुप्पट होणार आहे. ज्यावेळी जग अनिश्चिततेने भरलेले आहे त्यावेळी भारत हा आशेचा किरण म्हणून उदयास आला आहे. भारताचे विकास प्राधान्य क्रम अतिशय स्पष्ट आहे शाश्वत उद्योग, पायाभूत सुविधा आणि दर्जेदार उत्पादन या बाबी भारताच्या दृष्टीने प्राधान्य क्रम आहेत. भारताचे सामर्थ्य नव्या युगातील नवप्रज्ञाशोध, प्रगत स्तर कौशल्य, स्वयंभू तंत्रज्ञान, कृतीम बुद्धिमत्ता, सौर आणि हरीत हायड्रोजन, अक्षेय ऊर्जा, सेमी कंडक्टरची निर्मिती हे आहेत. नव कल्पनासाठी पोषक परिसंस्था भारताने तयार केल्या आहेत. व्हायब्रंट शिखर परिषदेने गुजरात मध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि विदेशी गुंतवणूक वाढविण्यावर भर दिला आहे. संगणकाला लागणारे सेमी कंडक्टर तसेच मोटार वाढीला चालणा दिली जात आहे छोट्या व मध्यम उद्योगातून रोजगार निर्मिती होते, नवे उद्योजक घडतात व नवीन रोजगाराची निर्मिती होते हे लक्षात घेऊन या वर्षीच्या व्हायब्रंट गुरजात परिषदेत विदेशी गुंतवणूक करण्यात धवल यश संपादन केले आहे अशी शिखर परिषद उत्तर व दक्षिण भारतातील सर्व राज्यामध्ये पुढील पाच वर्षीच्या काळात यशस्वी पणे भरविण्याचा पंतप्रधान मोदी यांचा प्रयत्न असणार आहे. त्यामुळे नव्या प्रकल्पाची आखणी करतांना विशेष प्रयत्नाची गरज आहे. ही गुजरात शिखर परिषद अशा प्रकारे घटक राज्यातील गुंतवणूकीला नवे वळण देणारे ठरले आहे. मोदी यांनी प्रयत्नांची पराकाष्टा केल्यामुळे लोकांचे जीवन बदलून गेले आहे. डिजिटल क्रांतीमुळे ते शक्य झाले प्रगत तंत्रज्ञानामुळे महिला, दलित व जन जातींचे सक्षमी करण शक्य झाले सुमारे 25 कोटी लोक निती अयोगाच्या अहवालानुसार गरिबीतून बाहेर पडले. मध्यम वर्गीयांचे उत्पन्न वाढत आहे. महिला व कामगारांचा उत्पादनातील सहभाग वाढत आहे. हे सर्व पाहता सामान्य जनता प्रगतिच्या नव्या प्रवासात सहभागी होत आहे. एक जग एक कुटूंब आणि एक भविष्य हे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळत आहे. वेगाने बदलणाऱ्या जगात विश्व मित्र म्हणून भारत पुढे आला आहे. हे समान ध्येय ठेवून वाटचाल करतांना सर्वांच्या कल्याणासाठी भारताची वचन बद्धता आहे. जग भारताकडे स्थिर ध्रुव म्हणून पाहत आहे विश्वास ठेवला जाऊ शकतो असा हा मित्र आहे आम्ही लोकशाहीच्या विस्तारासाठी वचनबद्ध आहोत हा व्हायब्रंट शिखर परिषदेचा संदेश आहे.

# शिकवणी क्लासेसवर निर्बंध



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**केंद्र सरकारने शिकवणी वर्गावर निर्बंध आणण्याचा घेतलेला निर्णय स्तुत्य आहे. आता १६ वर्षे वयापर्यंत विद्यार्थ्यांना शिकवणी क्लासेसमध्ये प्रवेश घेता येणार नाही. शिवाय कोचिंग क्लासची फी मर्यादित असली पाहिजे. घेतलेल्या फी ची रीतसर रसीद द्यायला हवी. असे अनेक निर्बंध केंद्र सरकार च्या शिक्षण विभागाने घातली आहे. खरे तर हा निर्णय फार पूर्वी घेणे अपेक्षित होते. कारण गेल्या काही दशकात शिकवणी क्लासेस हा लाखो करोडोचा धंदा झाला आहे. कोटा राजस्थान येथील विद्यार्थ्याच्या मनस्ताप, आत्महत्याच्या कहाण्या मीडियातून वेळोवेळी गाजल्या आहेत.**

कोटा ही तर छळ छावणी झाली आहे. आता तर लहान मोठ्या प्रत्येक शहरात हे शिकवणी क्लासेस चे लोण पसरले आहे. याची सुरवात झाली ती आय आय टी अन् मेडिकल च्या प्रवेश परीक्षेच्या तयारी साठी.कारण या परीक्षा अत्यंत कठीण समजल्या जातात. बारावी चे आपल्या कडे अनेक बोर्ड्स आहेत. प्रत्येक राज्याचे वेगळे बोर्ड. त्या प्रत्येकाचा अभ्यासक्रम वेगवेगळा.काही सोपा तर काही कठीण. त्यामुळे या क्लासेसची गरज निर्माण झाली, वाढली.

अनेक सरकारी खाजगी महाविद्यालयात १० ते १२ वी चे वर्ग रिकामे दिसतील. कारण बहुतेक मुले शाळा सोडून शिकवणीला जातात. दोन्हीकडे हजर राहणे ही तारेवरची कसरतच असते. क्लासेस मध्ये सारख्या टेस्ट,होमवर्क असते.त्यात उत्तम गुण मिळविण्याचे प्रचंड दडपण असते.शिवाय स्पर्धेचा ताण वेगळा.. खरे तर ज्या महाविद्यालयात मुलं शिकतात तिथेच उत्तम शिकवले, छान उजळणी वर्ग घेतले, टेस्ट घेतल्या तर या खाजगी वर्गाची गरजच भासणार नाही. पण मूळ गोम इथेच आहे.इथले शिक्षक ( अपवाद सोडल्यास) नीट शिकवत नाहीत. स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करून घेत नाहीत. पाट्या टाकण्याची त्यांची वृत्ती असते. म्हणूनच मुलांना खाजगी क्लासेस ची गरज भासते. शाळेचा अभ्यास, शिकवणी क्लासेसचे होमवर्क, सारख्या टेस्ट याचे प्रचंड दडपण या मुलावर असते. शिवाय पालक या सर्वासाठी लाखो रुपये खर्च करत असतात. तेही पाल्यावर वेगळे दडपण निर्माण करतात. याचा कोवळ्या वयाच्या मुला मुलींवर विपरीत परिणाम होतो. मानसिक विकार होतात.घरी तणाव वाढतो.अनेक मुले आत्महत्या देखील करतात.

मुलांना अशा कृत्रिम वातावरणात वाढविण्या ऐवजी नैसर्गिक पद्धतीने वाढविणे जास्त संयुक्तिक असते. तणावात केलेला अभ्यास पचनी पडत नाही.आत झिरपत नाही. या मुलांना आय आय टी वगैरे ला प्रवेश मिळाला तरी त्यापैकी काहीना तो अभ्यास जड जातो.म्हणजे तिथेही उच्च शिक्षणात अडचणी येतातच. ही मुले शिक्षण होई पर्यंत सदा सर्वकाळ ताणातच जगतात. अशा वातावरणात शिक्षणाचा मूळ उद्देश डावलला जातो.शिक्षण देताना घेताना आनंद अनुभवायला हवा. देणाऱ्याने अन् घेणाऱ्याने देखील. आपण नवे शैक्षणिक धोरण आणले खरे.त्याचे मूळ उद्देश निश्चितच चांगले आहेत. पण त्याच्या अम्मल बजावणीत विविध राज्यात मतभेद आहेत.गोंधळाचे वातावरण



आहे. संपूर्ण देशात एकवाक्यता नाही.राज्याचे अभ्यासक्रम वेगळे.प्रत्येक विद्यापीठाचे वेगळे. खाजगी,स्वायत्त विद्यापीठाचे स्वातंत्र्य आणिकच वेगळे. असा सावळा गोंधळ आहे. सरकारने क्लासेस वर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला खरा. पण तो कडकपणे अमलात आणण्याची यंत्रणा कोणती? अधिकार कुणाला? निर्णय केंद्र सरकारचा आहे.मग विरोधी पक्षाचे सरकार तो मानतील असे नाही. म्हणजे काही राज्यात हे शिकवणी उद्योग चालूच राहतील.कारण आपण समाजाचे हित कशात आहे हे न बघता, राजकीय पक्षाचा चष्मा घालून सारे काही बघतो. त्यामुळे संपूर्ण देशात शिकवणी वर्गाला आळा बसेल ही अपेक्षा धाडसाची ठरू शकते.आपला भ्रमनिरास होऊ शकतो. तसे पाहिले तर या शिकवणी वर्गांना खत पाणी कुणी घातले? आपणच, म्हणजे आपल्यातील पालक वर्गाने.. हे लोण फक्त दहावी बारावी पर्यंत मर्यादित राहिले नाही.अनेक पालक अगदी प्रायमरी,मध्यमिकच्या मुलांना देखील शिकवणी लावतात. कारण त्यांना त्याच्या बिझी शेड्युल मध्ये मुलाच्या अभ्यासाकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. आई बापाची कमी आता लाखोत असल्याने त्याच्याकडे भरपूर पैसे आहेत हजारोंची फी भरायला. त्यांना अभ्यास घ्यायची कटकट नको आहे.त्यामुळे या शाळेच्या मुलाचे शिकवणी वर्ग बंद करण्याच्या, त्यावर कड्क निर्बंध आणण्याच्या निर्णयाला पालकांनीच विरोध केला,त्यासाठी मोर्चे काढले तर आश्चर्य वाटायला नको. लाखों चे मोर्चे,उपोषणे यापुढे सरकार नमते हे बघण्याची आता आपल्याला सवय झाली आहे! खरे तर पालकांनी, शिक्षण तज्ज्ञांनी या शिकवणी वर्गावर आळा घालण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. सरकारला मदत केली पाहिजे. ड्रग,दारू, सिगारेट सारख्या विळख्यात अडकणारी मुले कोचिंग क्लासच्या चक्कीत देखील पिसली जात आहेत. या कोवळ्या जीवाना वेळीच वाचवायला हवे. ती आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे.

# स्वर्णीम इतिहास...



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**शेकडो वर्षांचा रक्तरंजित आणि संघर्षमय असा इतिहास आज बदलतोय. या देशाच्या अस्मितेचा एक वेगळा इतिहास आज लिहिल्या जातोय. आज दुपारी 12 वाजून 30 मिनिटांनी जेव्हा अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच विधिवत आयोजन होईल तेव्हा, हा स्वर्णीम असा इतिहास या देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदल्या जाईल आणि शेकडो वर्षांपासून असलेली आस, शेकडो वर्षांपासून असलेली निस्सीम श्रद्धा, आणि शेकडो वर्षांपासून मनामनामध्ये तेवत असणारा आशेचा एक किरण आज प्रभु श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठेमुळे सगळेजण आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात हा क्षण आपल्या डोळ्याने साठवून घेणार आहे.**

न केवळ भारतात तर अवघ्या विश्वात आजचा हा क्षण आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात साठवून ठेवण्यासाठी करोडो नव्हे तर, अब्जावधी लोक आतुरतेने वाट पाहत आहेत. आणि आपण खरोखरच भाग्यवान आहोत की , हा स्वर्णीम क्षण आपण स्वतः आपल्या डोळ्यांनी आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात साठवून ठेवणार आहोत. कारण प्रभू श्रीरामचंद्रांच्या या मंदिराच्या निर्मितीसाठी नव्हे , खरंतर प्रभू श्रीराम मंदिराच्या उध्वस्त होण्याच्या आधी सुद्धा या मंदिराच्या रक्षणासाठी लाखो मावळ्यांनी आपलं रक्त सांडवलेल आहे. पराभवाच्या शल्ल्यातून बाबराने अयोध्येतील या मंदिराला उध्वस्त करण्यासाठी आपल्या सैनिकांकरवी कित्येकांचे प्राण घेतले. अयोध्येतील मंदिर पाडून उभारण्यात आलेल्या मशिदीला बाबरच नाव देण्यात आलं त्या मागचा उद्देश हाच होता की या समाजाची मानसिकता दुर्बल व्हावी, तुम्ही नेहमी मार खात आलेले आहात असाच भाव राहिला पाहिजे, तुमचा पराभव कायम तुमच्या नजरेच्या समोर असला पाहिजे हाच उद्देश बाबरी मज्जिद उभारण्याचा होता . कारण इतर कोणत्याही मस्जिदला आजवर कोणाचंही नाव देण्यात आलं नाही. याच ठिकाणी आम्हाला आमच्या प्रभू श्रीरामचंद्रांचे मंदिर उद्ध्वस्त केलं होतं तेच मंदिर पुन्हा बांधावयाचं होतं . कारण हे प्रभू श्रीरामचंद्राचं मंदिर हे आमच्यासाठी केवळ आमचं मंदिर नव्हतं. तर , ती होती आमची श्रद्धा, भक्ती आणि आमची आस्था . आमची अस्मिता . शिवाय बाबरांनी हल्ला करून, आक्रमण करून मंदिर उध्वस्त केलं होतं त्याच ठिकाणी मंदिर उभारणी करायची ही आमची मनोभावे इच्छा होती . कारण हा बहुसंख्य भारतीयांच्या मनामनामधला शेकडो वर्षापासून दबून असलेला राग होता. या ठिकाणी मंदिर बांधावं म्हणून कित्येक वर्ष लढा दिला. हा लढा कारसेवेमध्ये सुद्धा बदलला. एकदा नव्हे तर, दोनदा कार सेवा करण्यात आली. आणि या कारसेवेवर सुद्धा अमानुषपणे लाठीमार करण्यात आला , अश्रू धुळाच्या नळकांड्या फोडण्यात आल्या .एवढेच नव्हे तर , चक्क गोळीबारही करण्यात आला. अस असूनही कारसेवेदरम्यान लाखो कारसेवक ज्या मार्गांनी अयोध्येला पोहोचले त्या मार्गावर इतर धर्मियांची शेकडो धार्मिक स्थळे होती. पण एकाही करसेवकानि कोणत्याही धार्मिक स्थळाला हानी उध्वस्त करणं तर दूरच साधी हानीही पिहिवहाबकी नाही. पण करसेववकांवर झालेल्या गोळीबारात मात्र कित्येक कार सेवकांनी आपले प्राण गमावले , कित्येकांना अपंगत्व आलं, पण राम मंदिराच्या उभारणीचा हा लढा मात्र शांत झाला नव्हता. होणारही नव्हता. आज जेव्हा अयोध्या मध्ये प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला आम्ही आमच्या याची देही याची डोळा पाहतो आहे तेव्हा आमचा उर भरून आला तर आहेच डोळेही पणावले आहेत. पण, आज आम्ही जिंकलो. आमच्या अस्मितेचा हा विजय आहे . आणि म्हणून आमच्यासाठी आजचा हा दिवस एक स्वर्णीम इतिहास आहे. हे आम्ही कधीच विसरणार नाही. आणि भारतावर आक्रमण करणाऱ्या बाबराला दिलेलं हे आजचं उत्तर आहे की, आम्ही आमच्यावर झालेला अन्याय सहन करणार नाही. आमच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या मंदिरांना जर उध्वस्त केल्या जात असेल, आमची ओळख मिटविण्याचा प्रयत्न केला जात असेल तर आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत लढू. परंतु आम्ही आमचा इतिहास हा पुन्हा एकदा नव्याने उभा करू , पुन्हा एकदा नव्याने प्रस्थापित करू. आणि हा इतिहास आता जग पाहिल. हा इतिहास येणारी पिढी पाहील. याच मंदिरातून प्रेरणा घेऊन पुन्हा एकदा आजची पिढी भविष्यात येणाऱ्या आक्रमकांना तितक्याच खंबीरपणे तोंड देण्यासाठी ताकदीने उभी राहील.परंतु दुर्दैव आमचं की, काही राजकीय पक्ष जे याच देशाच्या मातीत वाढले, मोठे झाले तेच आज या प्रभू श्रीरामचंद्रांच्या भव्य मंदिराला तेथे होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाला, सोहळ्याला हा भाजपचा इव्हेंट आहे असं म्हणून विरोध करीत आहे. एवढेच नव्हे तर या मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच आलेल्या आमंत्रणाचा सुद्धा स्वीकार न करता आम्ही तिथे जाणार नाही असे स्पष्ट सांगत आहे. बहुसंख्य असलेल्या याच देशांमध्ये बहुसंख्येने असलेल्या तमाम हिंदू बांधवांचा , हिंदू नागरिकांचा हा खरंतर धडधडीत केलेला अपमान आहे असं मला तरी वाटतं . अल्पसंख्यांकांच्या मतपेटीवर डोळा ठेवून स्वतःची खुर्ची वाचविण्यासाठी , स्वतःची सत्ता टिकविण्यासाठी बहुसंख्येने असलेल्या हिंदूंना कायमच तिरस्काराने पाहणाऱ्या काही राजकीय पक्षांना आज घडत असलेला हा स्वर्णीम इतिहास भविष्यात कधीही माफ करणार नाही हे तेवढेच खरे. खरंतर 2014 नंतर या देशाची वाटचाल एका वेगळ्या दिशेने सुरू झाली. अयोध्येच श्रीराम मंदिर हे एक उदाहरण झालं . जे उदाहरण संपूर्ण जग आज पाहते आहे .असेच एक उदाहरण या देशात 2014 नंतर घडलं. आणि ते म्हणजे कलम 370 हटविण्यात आलं . खरंतर काश्मीर हा या देशाचा अविभाज्य भाग .परंतु या कलम 370 ने काश्मीरला कायमच भारतापासून वेगळं ठेवलं. आणि हे 370 कलम कायम ठेवून काश्मीरला कायमच एक विशेष दर्जा देत भारतापासून तोडून ठेवण्याचाच प्रयत्न करण्यात आला. हे कलम 370 कधीच हटणार नाही. हटविण्याचा प्रयत्न केला तर या देशात पुन्हा दंगे होतील , पुन्हा दंगली उसळतील , पुन्हा रक्तरंजित क्रांती होईल अशी भाषणे करण्यात आली . कायमच 370 ला हात लावायचा नाही हे जणू काही या देशावर सर्वाधिक काळ राज्य करणाऱ्या काँग्रेस पक्षाने ठरवून ठेवले



होते. परंतु 2014 मध्ये सत्तेचा बदल लोकांनी मतपेटीतून व्यक्त केला .आणि पाहता पाहता कलम 370 हटविण्यात याच देशाच्या पंतप्रधानाना यश आलं . आज काश्मीरमध्ये ज्या विरोधी पक्षांच्या नेत्यांनी कलम 370 हटविण्याचा प्रयत्न केला तर दंगे होतील अशी भाषणे केली होती त्यांचेच मुलं आज याच काश्मीर मध्ये जाऊन बर्फ खेळताना चा फोटो तुम्ही आम्ही नव्हे जगातल्या सगळ्या नागरिकांनी पाहिलेले आहेत . आज तिथे शांतता नांदते आहे .तिथल्या युवकांमध्ये या भारताप्रति प्रेम येत आहे , आणि एवढेच नव्हे तर कलम 370 हटल्यानंतर काश्मीरचा ही तितक्याच वेगाने, चांगल्या पद्धतीने विकास होताना आपण पाहतो आहे . हा सुद्धा एक स्वर्णीम असा इतिहास आहे.

आणखीन एका स्वर्णीम इतिहासाची नोंद या देशाने 2014 सालच्या नंतरच बघितलेली आहे. आणि ती नोंद आहे तीन तलाक या कायद्याची. हो , " तलाक तलाक तलाक "असं केवळ तीनदा तलाक म्हटल्यानंतर वैवाहिक जीवनाचीच काडीमोड करणारा मुस्लिम समाज , आणि या एका तलाक मुळे उद्ध्वस्त झालेलं याच समाजातील महिलांचे जीवन म्हणजे अत्यंत क्रूरता होती. या अशा चुकीच्या प्रथेमुळे कित्येक महिलांचं आयुष्य उध्वस्त झालं होतं, कित्येक महिलांनी आपलं आयुष्य संपवलेलं होतं ,कित्येक महिलांच्या वाट्याला नरक यातनेच जीवन आलेलं होतं. परंतु , इतक्या गंभीर विषयाकडे मात्र हा त्यांच्या समाजातला नियम आहे किंवा हा त्यांच्या समाजातला कायदा आहे म्हणून दुर्लक्ष करण्यात आलं होतं . परंतु 2014 नंतर मात्र या कायद्याला सुद्धा रद्द करण्यात आलं . आणि त्याचं स्वागत मुस्लिम समाजातील सर्व महिलांनी तितक्याच आनंदाने केलं. हा सुद्धा भारताच्या इतिहासामध्ये आलेला एक स्वर्णीम इतिहासच आहे. ज्याची दखल आजच्या पिढी सोबतच येणार काळही निश्चितच घेईल यात शंकाच नाही. एका बाजूला हे सगळं होत असतानाच दुसऱ्या बाजूला बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट या दृष्टिकोनातून बांधण्यात आलेला " अटल सेतू " हा सुद्धा येणाऱ्या काळात एक स्वर्णीम इतिहास म्हणून नोंद घेतल्या जाणारा प्रकल्प आहे . देशभरात विविध ठिकाणी सुरू झालेल्या वंदे भारत ट्रेन , दोन तासाचं अंतर वीस मिनिटांवर आणणारा शिवडी न्हावाशेवा हा ' अटल सेतू ' मार्ग हा सुद्धा या देशासाठी एक स्वर्णीम इतिहासच आहे. 21. 80 किलोमीटर लांबीचा 16 . 5 किलोमीटर सागरी अंतर असलेला हा देशातील सगळ्यात लांब आणि जगातील दहाव्या क्रमांकाचा हा सागरी सेतू म्हणजे देश आज कुठे चाललाय याचंच प्रतीक आहे. 2014 नंतर या देशाचं रूपच बदलते आहे असं केवळ भारतीयच नव्हे तर जगातील अनेक राष्ट्र आज मान्य करत आहेत . कोविड काळामध्ये या देशातल्या तब्बल 125 करोड लोकांना मोफत लसीकरण करण्यात हा देश यशस्वी झाला. आणि एवढ्यावरच तो थांबला नाही तर , इतर देशांना सुद्धा ही लस मोफत देण्यात आली आणि या देशाने पुन्हा एकदा स्वर्णीम इतिहासाची नोंद केली. आज जेव्हा या शुभ मुहूर्तावर अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामचंद्रांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होतो आहे तेव्हा होत असलेल्या या स्वर्णीम इतिहासाचे साक्षीदार म्हणून आपण किती भाग्यवान आहोत आणि आपला विकास कोणत्या दिशेने होत चाललाय याचा विचार तुम्ही आम्ही सगळ्यांनी अतिशय शांत डोक्याने, संयमाने करावा आणि , देशाची होणारी वाटचाल पुढील काळात कुठल्या दिशेला होत राहील याचाही विचार आपण सगळ्यांनी करावा यास्तव या स्वर्णीम इतिहासाची नोंद घेणारा हा लेखन प्रपंच.

# राम नाम उच्चारा.. जन्माचे सार्थक करा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**22 जानेवारी रोजी अयोध्या नगरीत रामाच्या मूर्तीची स्थापना होत आहे. त्या दृष्टीने गेल्या काही दिवसापासून घरोघरी कार्यक्रमाची पत्रिका, मंदिराचा फोटो, आणि अक्षदा पोहोचवल्या गेलेल्या आहेत. २२ जानेवारी रोजी घरोघरी उत्सव साजरा करायचा आहे . बारा वाजून वीस मिनिटांनी अयोध्याला मूर्तीची स्थापना होणार आहे. आपल्याकडे आपल्या अक्षदा रामाला वहायच्या आहे. राम नामाचा जप करायचा आहे.रामरक्षा स्तोत्र पठण करायचे आहे. दिवे लावायचे आहे.रोषणाई करायची आहे.पंजीरीचा,पेढ्याचा नैवेद्य दाखवा.( पंजीरी म्हणजे, गुळ,धनेपावडर,सुंठ, खडीसाखर, खोबरे. एकत्रित पावडर.) दिवाळी साजरी करायची आहे. राम नामाचा झेंडा हाती घेतलेला प्रत्येकाने फोटो काढायचा आहे. एकूणच सर्वदूर राममय वातावरण झालेले आहे.**

अनेक ठिकाणी अनेक विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले आहे .काही ठिकाणी गेल्या चार-पाच दिवसांपासून एकत्रित जप रामरक्षा स्तोत्र पठण सुरू आहे. शाळांमधून रामरक्षा स्तोत्र म्हटले जात आहे. रामरक्षा स्तोत्र पठणाचे महत्त्व खूप मोठे आहे. त्या दृष्टीने गावोगावी ते सुरू आहेत. जेणेकरून सकारात्मक वातावरण निर्माण होऊन त्या स्तोत्र आणि मंत्राच्या लहरी आजूबाजूला निर्माण होत आहेत. पुणे,( स.प कॉलेजच्या मैदानावर) नाशिक, जळगाव, अशा अनेक ठिकाणी रामरक्षा स्तोत्र, राम नामाचा जप, सामुदायिक केला गेला. अनेक कॉंलन्या,अपार्टमेंट मध्ये रोज जप. स्तोत्र पठण उत्साहात होतेय.

"रामरक्षा" हे अतिशय प्रभावी स्तोत्र आहे. स्तोत्र म्हणजे ज्यामध्ये स्तुती केली जाते ते स्तोत्र होय. रामरक्षेच्या सुरवातीलाच, "अस्य श्रीरामरक्षा स्तोत्र मन्त्रस्य" असे म्हटले आहे. रामरक्षा हे स्तोत्र तर आहेच पण ते मंत्र सुद्धा आहे. रामरक्षा हे स्तोत्र विश्वामित्रांच्या कुळातील बुधकौशिक ऋषी यांनी लिहिले. त्यांना हे मंत्र स्वप्नात भगवान शंकरांनी त्यांना सांगितले.( आदिष्टवान यथा स्वप्ने रामरक्षा मिमां हरः) एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम्. या स्तोत्रामधील एक एक अक्षर महापातकाचा नाश करते – कारण ह्या मंत्राचे आराध्य दैवत कोण आहेत तर श्री प्रभू रामचंद्र हे परमात्मा होय. ह्या स्तोत्रामधील फार महत्त्वाची गोष्ट इथे सांगितली आहे. गुढीपाडवा ते रामनवमी ह्या काळात दररोज १३ वेळा रामरक्षा स्तोत्र व एकवेळ मारुती स्तोत्र श्रद्धापूर्वक म्हटल्यावर ते सिद्ध होते.रामरक्षेत प्रत्येक अवयवांचे साठी स्वतंत्र श्लोक आहे.त्यामुळे त्या त्या अवयवांचे विकार बरे होतात..

राम रक्षा पठेत् प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरो मे राघवः पातु भालं दशरथित्मजः ।।
कौसल्येयो दृशौपातु विश्वामित्रप्रियः श्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ।
जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितनः ।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ।।
करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजितः ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभि जाम्बवदाश्रयः ।।
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
उरु रघुत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ।।
जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखान्तकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोSखिलं वपुः ।।

असे कवच या रामरक्षा स्तोत्रात आलेले आहे. कवच म्हणजे आपल्या प्रत्येक अवयवाचे रक्षण करण्यासाठी मंत्र धारण करणे. रामाने आपले रक्षण करावे, यासाठी रामरक्षेच्या चौथ्या श्लोकापासून आपल्या शरीराच्या एकेक अवयवाचे रक्षण रामाने कसे करावे, याबद्दल वर्णन केले आहे. माझ्या शिराचे रक्षण करावे, कपाळाचे रक्षण करावे. माझ्या डोळ्याचे रक्षण करावे.माझ्या कानाचे रक्षण करावे. माझ्या नाकाचे आणि मुखाचे म्हणजे केवळ ऐकणे बोलणे नसून संपूर्ण चेहेरा. आपले व्यक्तिमत्व आपल्या चेहेऱ्यावर अवलंबून असते, त्याचे रक्षणरामाने करावे. जिव्हा, हा महत्वाचा अवयव. आपण काय बोलतो आणि काय खातो यावर नियंत्रणासाठी जिभेचे अनन्य साधारण महत्व आहे. तिचे रक्षण सर्व विद्या धारण करणाऱ्या श्रीरामाने करावे. रामने माझ्या कंठाचे रक्षण करावे. रामाने माझ्या दोन्ही खांद्यांचे रक्षण करावे. माझ्या दोन्ही बाहूंचे रक्षण करावे. रामाने माझ्या हातांचे रक्षण करावे. रामाने माझ्या हृदयाचे रक्षण करावे. शरीराचा मध्यभाग म्हणजे उदर किंवा जठराग्नी ज्याचे कार्य समान वायूवर अवलंबून



असते त्या माझ्या शरीराच्या मध्यभागाचं रक्षण रामाने करावे. जाम्बुवन्तांनी ज्याचा आश्रय घेतला त्या श्रीरामाने माझ्या नाभिचे म्हणजेच बेंबीचे रक्षण करावे. सुग्रीवाचा स्वामी रामाने माझ्या कमरेचे रक्षण करावे. रामचंद्रांनी माझ्या दोन्ही जांघांचे रक्षण करावे. रामाने माझ्या दोन्ही मांड्यांचे रक्षण करावे. माझ्या दोन्ही गुडघ्यांचे रक्षण करावे. रामाने माझ्या दोन्ही पायांच्या पोटऱ्यांचे रक्षण करावे. माझ्या दोन्ही पावलांचे रक्षण करावे. प्रभू श्रीरामाने माझ्या सर्व शरीराचे रक्षण करावे.

एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत्।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ॥

याप्रमाणे रामाच्या सामर्थ्याने युक्त असलेल्या या रामरक्षेचे जो मनुष्य पठण करेल तो दीर्घायुषी होईल. तो सुखी होईल. तो पुत्रवान होईल आणि सर्व कार्यात विजय मिळवणारा म्हणजेच यशस्वी होईल. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एवढे सगळे मिळून सुद्धा तो विनयसंपन्न अर्थात तो नम्र राहील.ज्यांना आपदा म्हणजेच संकट नको असेल त्यांनी रामरक्षेचे पठण नियमित करावे. ते श्रद्धेनं करणे गरजेचे आहे. कारण, श्रद्धावान लभते ज्ञानं, असे म्हटले आहे. जय जय रघुवीर समर्थ. रामदास स्वामींनी खूप खडसर तपश्चर्या केली आणि आत्मसाक्षात्कार करून घेऊन रामनामाचा प्रचार आणि प्रसार केला. समर्थ रामदास स्वामी घरून निघाले ते पायी चालत चालत पंचवटीस येऊन रामदासांनी रामाचे दर्शन घेतले, आणि टाकळीस दीर्घ तपश्चर्या केली. वयाच्या १२ व्या वर्षी नाशिकला आलेले समर्थ १२ वर्षे तपश्चर्या करीत होते. नाशिकमधील टाकळी येथे ते इ.स. १६२१ ते १६३३ असे १२ वर्षे राहिले. दोन तास गायत्री मंत्राचा तर चार तास श्री राम जय राम जय जय राम या त्रयोदशाक्षरी राम मंत्राचा जप करीत. रामदासांनी रामनामाचे १३ कोटी वेळा नामस्मरण करून झाल्यावर कार्याला आरंभ केला. साक्षात प्रभु श्रीराम हेच त्यांचे सद्‌गुरू झाले. समर्थ दुपारी केवळ ५ घरी भिक्षा मागून तिचा श्रीरामाला नैवेद्य दाखवत असत. त्यातील काही भाग पशुपक्ष्यांना ठेवून उरलेला भाग ग्रहण करत असत. समर्थ दुपारी दोन तास मंदिरात श्रवण साधना करीत आणि नंतर दोन तास ग्रंथांचा अभ्यास करीत. याच काळात त्यांनी वेद, उपनिषदे, सर्व प्राचीन ग्रंथ व विविध शास्त्रे यांचा सखोल अभ्यास केला, त्यांच्या या साधकावस्थेमध्ये त्यांनी आर्ततेने श्रीरामाची प्रार्थना केली तीच 'करुणाष्टके' होत. व्यायाम, उपासना आणि अध्ययन या तीनही गोष्टींना समर्थांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्या जीवनातील ही १२ वर्षे अत्यंत कडकडीत उपासनेमध्ये व्यतीत झाली. १२ वर्षाच्या या तीव्र तपश्चर्येनंतर यांना आत्मसाक्षात्कार झाला, असे म्हणतात. त्यावेळी समर्थांचे वय २४ वर्षाचे होते. समर्थांनी नाशिक येथे टाकळीला हनुमंताची मूर्ती स्थापन केली. हनुमान ही शक्तीची आणि बुद्धीची देवता आहे त्यामुळे तिची उपासना केली पाहिजे असा समर्थांचा यामागे विचार होता. आपल्या मनाच्या श्लोकामध्ये समर्थ म्हणतात प्रभाते मनी राम चिंतीत जावा पुढे वैखरी राम आधी वदावा. "जेथें रामनाम तेथे माझे प्राण". असे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज नेहमीच सांगायचे. नाम परमेश्वरप्राप्तीचे कर्म-योग-ज्ञान या मार्गांपेक्षा श्रेष्ठ आहे.

भगवंताची अनेक रूपे नाहीशी झाली, तरी त्याचे नाम देशकालातीत असते. नाम श्रेष्ठ आहे. गोंदवलेकर महाराज हे तुकारामचैतन्यांकडे( तुकामाई) गेले. तेथे नऊ महिने राहून त्यांनी एकनिष्ठेनें गुरूसेवा केली, आणि ते देहबुद्धिविरहित व पूर्ण ज्ञानी झाले. तुकारामचैतन्यांनी त्यांचे 'ब्रह्मचैतन्य' असे नांव ठेवलें, आणि गृहस्थाश्रमी राहून लोकांना भक्तिमार्गाला लावण्याची आज्ञा केली. सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाणे गोंदवलेकरांनी हजारों लोकांना रामभक्तीला लावलें. त्यांचे शिष्य-प्रशिष्य विशेषतः मध्यमवर्गीय असून ते महाराष्ट्र व कर्नाटकांत बहुसंख्य असून उत्तर हिंदुस्थानांतही आहेत. त्यांची प्रथम पत्नी वारल्यानंतर त्यांनी जन्मांध मुलीशी लग्न केले. त्यांनी आपल्या घरीं आणि इतरत्र अनेक ठिकाणीं रामाची देवळे उभारून उपासनेची केंद्रें निर्माण केली. गोंदवलेकर महाराजांनी असंख्य लोकांची व्यसनें, दुराचरण, दुरभिमान, संसारचिंता यांपासून सोडविले. कौटुंबिक कलह मिटवून अनेकांचे संसार सुखाचे केले.

# सामाजिक प्रहावात आणणारी पहिली पायरी : माझी शाळा



भारत जमधडे
छत्रपती संभाजीनगर
संपर्क क्र. ९०४९५९१७४७

आधुनिक केसरी

**प्रत्येकजण आपल्या आयुष्यात सुखी-समाधानी होण्यासाठी अधिकाधिक भौतिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करून सामाजिक स्तरावर सुसंस्कृतपणे स्वत:ची प्रतिमा जपण्यासाठी प्रयत्नवादी असतो. हे सर्व सार्थकी लागण्यासाठी आपल्याला शिक्षण घेणे फार महत्त्वाचे असते. कारण शिक्षण हे ज्ञान, कौशल्य, नैतिक मूल्ये आणि विकास इत्यादी प्राप्तीची निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आपण स्वत:ला घडवित असतो. स्वत:ला घडविण्याचे हे काम ज्ञानाचे आणि सर्वांगीण विकासाचे कार्य शाळेतून होत असते. अशा अनेक शाळा आहेत की, त्यांच्या प्रतिबिंबाचे आस्तित्व पिढ्यानपिढ्या कायम असते.**

मग यासाठी आपल्या भारत देशाच्या स्वातंत्र्यापूर्वी स्थापन झालेली अन् देशभर प्रसिद्ध असलेल्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती द्वारा संचालित असलेली आमची श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालय ही शाळा अपवाद कशी असू शकेल. आम्हाला प्रत्यक्षात शिकवले नसले तरी शाळेचे मुख्य नेतृत्व सांभाळून अप्रत्यक्षपणे आम्हाला त्यावेळी मार्गदर्शन करणारे आमचे मुख्याध्यापक मा. मुरलीधर भोंडे सर आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेल्या आमच्या शिक्षकांच्या सहज-सोप्या पद्धतीने शिकवण्यामुळे तसेच अमूल्य अशा मार्गदर्शनामुळे मी आणि माझ्यासारखे अनेक विद्यार्थी घडले. आम्हाला घडविणाऱ्या या शिक्षकांपैकी आमचे वर्गशिक्षक आणि आताचे मुख्याध्यापक माननीय विवेक मोहोड सरांनी अंकगणिताबरोबरच आयुष्याच्या ध्येयपूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची बेरीज-वजाबाकी तसेच भागाकार-गुणाकार करण्याचे कौशल्याचे धडे कायम आमच्या स्मरणात राहतील अशा पद्धतीने दिले. तसेच भाषा आणि सामाजिक शास्त्रे विषयाच्या शिक्षकांमुळे आमच्यातील सामाजिक आंतरक्रिया जागृत होऊन समाजात एकमेकांशी आपुलकीने एकनिष्ठतेचा स्नेहरूपी संवाद आजही सुरू असल्यामुळे आमचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव आणि संस्कृतीचे अस्तित्व समाजात टिकून आहे.



मुख्याध्यापक
मा. विवेक मोहोड

आम्हाला समजिक स्नेहाची शिकवण देणाऱ्या शिक्षकांपैकी इंग्रजीचे मा. गोपाल खैरकर सर, संस्कृतच्या मा.मंजूषा निपाणकर मॅडम, मराठीचे मा. सुभाष गोव्हाड सर, मा. अनघा देशपांडे मॅडम, क्रीडा शिक्षक मा. डॉ. सुभाष गावंडे सर, मा. प्रभाकर पाटील सर ,हिंदीचे स्व. तिवारी सर, स्व. कल्याण राऊत सर आदी शिक्षक मंडळीची नावे प्रामुख्याने आठवतात. याचबरोबर वैज्ञानिक अन् स्पर्धेच्या युगात स्वतःमधील सामर्थ्याचा शोध आपण स्वतःच घेऊन भौतिक सुखसोईचे वैज्ञानिक दृष्टीने समायोजन करण्याचे नवीन-नवीन प्रयोग आपल्या आयुष्यात कसे करावेत यासाठी विज्ञान विषयाचे मा.दिलीप वऱ्हेकर सर, मा.दिलीप ठाकरे सर, स्व. जानराव मनोवाळ सर, स्व शरदराव देशमुख सर, स्व.रवींद्र जोशी सर आदी शिक्षकांची नावे विसरणे शक्य नाही.

अशा पद्धतीने बदलत्या सामाजिक तसेच अभावात्मक आणि संकटकालीन काळातही आव्हानात्मक बाबींचा गुंता सोडवून सामाजिक प्रवाहामध्ये सक्षम होण्यासाठी अमूल्य असे दिशादिग्दर्शकरूपी मार्गदर्शन आणि आशीर्वादाने आमचे बौद्धिक पालनपोषण करणाऱ्या आमच्या श्री. रामकृष्ण क्रीडा




विद्यालयातील शिक्षकांमुळेच तर आमच्यातील काही मित्र-मैत्रिणी प्रशासकीय सेवेत उत्कृष्टरीत्या कार्यरत असून काहीजण सोने- चांदी, प्रकाशन संस्था, खाजगी शिकवणी, खाजगी नोकरी, प्रॉपर्टी ब्रोकर, संगीत, उत्तम शेतकरी, क्रीडा, जलतरण , बांधकाम व्यवसाय , आदींसह विविध कौशल्यावर आधारित तसेच दैनंदिन गरजेच्या सेवा पुरविण्यासंबंधित छोठे-मोठे उद्योग / व्यवसाय अगदी कुशल पद्धतीने सांभाळत आहेत. तर काहीजण शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून आपले योगदान देत आहेत. तर काही भगिणी आपले गृहव्यवस्थापन उत्तमरीत्या सांभाळून आयुष्यातील आनंद मनसोक्तपणे अनुभवत आहेत. यात विशेष आनंदाची बाब म्हणजे आमचा वर्गमित्र योगेश वेरूळकर हा आम्ही शिकलेल्या शाळेतच कार्यरत असून विद्यार्थ्यांना गणित विषयाचे धडे देत आहे. या माध्यमातून योगेश वेरूळकर हा एक प्रकारे आमचे आदरणीय शिक्षक माननीय विवेक मोहोड सर शिकवत असलेल्या गणित विषयाचा वारसाच पुढे नेत असल्याचे वाटते.

विविध क्षेत्रांत कार्यरत असून जगण्याचा मनमुराद आनंद घेणारी आमची ही मित्रमंडळी मुंबई, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), पुणे, नागपूर, भिलवाडा ( राजस्थान ) , अमरावती , वर्धा आदी शहरांसह अकोला, यवतमाळ इत्यादी जिल्ह्यांतील विविध ठिकाणी, ठिकाणी स्थिरस्थावर झालेली असली तरीही वर्गमित्रांमधील मैत्रीचे नाते मात्र सर्वांनी कायम जपलेले आहे. आमच्या शाळेतील शिक्षकांकडून मिळालेल्या ज्ञानामुळे आमच्यातील प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने स्वतःचे आयुष्य सुख-समृद्धीने जगत असून पुढील पिढीला उत्कृष्ठ शिक्षण देण्याच्या ध्यासाने झपाटलेले असल्याचे त्यांच्या प्रत्यक्ष संवाद आणि भ्रमणध्वनीवरील संभाषणातून जाणवले.

एकूणच काय तर प्रत्येकजण सामाजिक / मैत्रीपूर्ण बांधीलकी जपत आपले कुटुंब सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सक्षम बनवत आहे. आपले कुटुंब जर सक्षम असेल तर आजच्या पिढीतील आपली मुले चांगले शिक्षण घेऊन उद्या आदर्श नागरिक बनून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देतीलच .

ज्या आदरणीय शिक्षकांमुळे हे सर्व सार्थकी होऊन आमच्या जीवनाचे आनंदवन झाले, त्या सर्व शिक्षकांना कायम स्मरणात ठेवून शालेय आठवणींना उजाळा मिळावा आणि आमच्या मित्रांपैकी सध्या कोण काय करते ही माहिती घेऊन व्यक्त होण्याच्या उदांत हेतूने जास्तीत जास्त मित्र-मैत्रिणींचे व्हाट्सअँप, फेसबुक आदी समाज माध्यमातून मित्रांच्या मदतीने माहिती घेण्यासाठी मागील चार-पाच वर्षांपासून प्रयत्न करून ते पूर्णत्वास आल्यावर ५१ पैकी ४० मित्र-मैत्रिणींचे फोन नंबर मिळाल्यावर तीस वर्षांपूर्वी म्हणजेच १९९४ मध्ये १० व्या 'अ' वर्गात एकत्र शिकलेल्या मित्र-मैत्रिणींपैकी सध्या कोण काय करते या प्रश्नांची उकल झाली आणि आनंदोत्सवाने दाटलेल्या स्नेहरूपी भावना येथे मोकळ्या झाल्या अन् विविध शाळेत होणाऱ्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याप्रमाणे आपणही माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यासंदर्भात काही मित्रांसोबत चर्चा केल्यावर सर्वांनुमते ते मान्य होऊन सर्वांनी आपापल्या पध्दतीने प्रयत्न करून तसा योग म्हणजे माजी विद्यार्थी मेळावा आज रविवार, २१ जानेवारी २०२४ रोजी संपन्न होत आहे. या आनंदोत्सवात सुनील काळे,अमोल बुल,अनिता गुल्हाने, अर्चना बावने आदी वर्गमित्र-मैत्रिणी या जगात नसल्यामुळे आज कार्यक्रमास उपस्थित राहू शकत नसल्याचीही अंत्यत खंत वाटते.

***पिढी घडवणाऱ्या आदर्श गुरुंचा गौरव***

*आदरणीय सर्व गुरुवर्यांना सानंद सविनय दंडवत...*
*आपल्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला आयुष्यभर पुरेल अशा प्रकारचे शाश्वत असे विद्यादानाचे कार्य आपण आपल्या शैक्षणिक सेवा कार्यकाळात करत असून बदललेल्या सामाजिक तसेच अभावग्रस्त आणि संकटकालीन परिस्थितीतही आपले ज्ञानदानाचे कार्य अवितरपणे सुरूच आहे.*
*भावी उन्नत राष्ट्राच्या निर्मितीसाठी आपले अमूल्य योगदान अप्रत्यक्षपणे आपल्यातील आदर्श शिक्षक रुपाने होत असल्याची कृतज्ञतापूर्वक जाणीव आम्हाला आहे. आपल्या कर्तृत्ववान कार्य शैलीतून सामाजिक अन् शैक्षणिक शृंखलेचा विकास, प्रचार-प्रसार आपल्या कल्याणकारी कार्यातून तसेच निर्मळ भावनेतून होत असल्याचे मागील तीस वर्षांपासून आम्ही फक्त पहातच नाही तर अनुभवतोय सुद्धा.*
*आजपर्यंतच्या आपल्या संपूर्ण सेवाकाळातील अमूल्य तसेच सामाजिक पातळीवर अनुकरणीय योगदानाप्रती आम्हा सर्वच विद्यार्थ्यांसाठी ही बाब कृतज्ञतापूर्वक अशीच आहे. एक आदर्श शिक्षक म्हणून आपण आमच्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांचे जीवन अधिकाधिक प्रगत अन् प्रगल्भ करण्यासाठी आपले बहुमोल असलेले मार्गदर्शन आम्हा सर्वांसाठी अविस्मरणीय असून सुसंस्कृतपणाचा अमूल्य ठेवा आहे.*
*आम्ही आपले विद्यार्थी असणे याशिवाय दुसरे कोणतेच भाग्य आमच्यासाठी मोठे नसून त्याचा आम्हाला अत्यानंदच आहे.*
*आपण शैक्षणिक क्षेत्रातील उत्मम कामगिरीसह वर्तमान अन् भविष्यकालीन आव्हाने स्वीकारणारे निर्भय तरूण, सजग नागरिक घडविण्याचे मौल्यवान कार्य देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी नक्कीच सकारात्मक परिणाम करणारे असून ते देश विकासातील आपले योगदान निश्चितच महत्त्वाचे आहे.*
*आपल्या दिशा दिग्दर्शकाच्या भूमिकेने आणि मार्गदर्शनामुळे आज आम्ही भौतिक सुखाचे मानकरी होऊन सामाजिक स्तरावर प्रतिभावंत व्यक्तिमत्व म्हणून पात्र ठरलोत ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.*
*आमच्या आयुष्यातील सर्व घडामोडींचे उत्तम नियोजन करण्याची जिद्द निर्माण होऊन त्यासाठी धाडसी नेतृत्व प्राप्त होण्यासाठी प्रत्येक आव्हानांचे शांत-संयमाने समायोजन करण्याची शक्ती आणि युक्ती म्हणजे आपल्या शिकवणुकीतून मिळालेले सर्वांगीण विकासाचे प्रेरणास्त्रोत होय.*
*आपल्या या दिशा दिग्दर्शक मार्गदर्शन आणि आशीर्वादाबद्दल मी आपल्याप्रती आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करुन आपण सर्वांना माझा मानाचा मुजरा.*
*या सर्व गोष्टीचे प्रतिक म्हणून आपल्या सन्मानार्थ आपण सर्वांना हे सन्मानपत्र श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालय , अमरावती , वर्ग १० वा 'अ' मध्ये ( १९९४ ) शिकवणाऱ्या सर्व सहाध्यायी वर्गमित्र-मैत्रिणींकडून कृतज्ञतापूर्वक अर्पण.*
***भारत जमधडे,** छत्रपती संभाजीनगर, संपर्क ९०४९५९१७४७*

# डॉ.अनिल मापारी यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार व संजीवनी दर्पण पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुका पत्रकार संघाचे मार्गदर्शक तथा बुलढाणा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सचिव तथा लोणार न.प.नगरसेवक डॉ. अनिल मापारी यांना जयहिंद सेवाभावी संस्था आयोजित २०२४ महाराष्ट्र गौरव पुरस्कार व संजीवनी सेवाभावी परिवार डोणगांव संजीवनी दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जयहिंद सेवाभावी संस्था आयोजित २०२ ४ चे महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांची निवड करण्यात आली आहे या पुरस्काराचे वितरण परभणी येथे येथे १० फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सत्तार इनामदार यांनी दिली आहे.जयहिंद सेवाभावी शिक्षण संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील व्यक्तींना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी डॉ.अनिल जनार्दन मापारी यांची निवड करण्यात आली. 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' ह्या त्रिदवाक्याचे ध्येय समोर ठेवून सेवावतीचे अतुलनीय कार्य करणारे संजीवनी सेवाभावी परिवार डोणगाव यांच्या वर्धापनदिना निमित्त सामाजिक, शैक्षणिक, कृषी, धार्मिक, व पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या काही व्यक्तिमत्त्वाचा मान्यवरांचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.आपणास या समाजाचे काहीतरी देणे लागतो. या उद्देशाने निस्वार्थ कर्म करण्यासाठी परिवर्तनाचा ध्यास घेऊन, संजीवनी सेवाभावी परिवाराचे कार्य चालू आहे. गेल्या चौविस वर्षांपासून या संजीवनी परिवाराने सेवावृत्तीचे बीज पेरले गेले आहे. म्हणून आज सेवाव्रतीच्या "बांधिलकीतून नवचैतन्यानी संजीवनी सेवाभावी परिवाराचा मळा बहरलेला फुलला आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून न्याय देण्याची सैदव भुमिका पार पाडणारे लोणार येथील ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनिल मापारी यांना डॉ.जगदिश बिडवई स्मृती प्रित्यर्थ संजीवनी दर्पण पुरस्कार दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.



# मराठी भाषेची गौरवशाली परंपरा अमृताहूनही गोड : डॉ.सुनील पवार

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मराठी भाषेनेच अनेक लेखक, कवी, कलावंत घडविले आहेत. मराठी भाषिक नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने आज जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. कारण मराठी भाषेची गौरवशाली परंपरा अमृताहुनी गोड आहे. असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी सुनील पवार यांनी केले.

राजे छत्रपती कला महाविद्यालय धामणगाव बढे येथे नुकताच मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मराठी विभागातर्फे साजरा करण्यात आला. यानिमित्त 'माय मराठी आणि माझी कविता' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश मेश्राम तर प्रमुख अतिथी म्हणून बालसाहित्यिक सुभाष किन्होळकर, कवी डॉ. गोविंद गायकी होते.




यात्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. पवार यांनी भाषेचे महत्त्व सांगून, यमकांचे नृत्य म्हणजे कविता नसते तर आपणच आपल्याला भेटत जाणे म्हणजे कविता असते हे सांगून अनेक दर्जेदार कवितांचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच डॉ. भगवान गरुडे, डॉ. गजानन वानखेडे, नितीन जाधव , डॉ विजय मोरे, डॉ.शाहेदा नसरीन यांचा शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गोविंद गायकी यांनी केले. सूत्रसंचालन कु. सरिता बढे,तर आभार प्रदर्शन कु. वैष्णवी मोदी हिने केले.

# सावळदबारा गावात श्रीराम मंदिर उद्घाटननिमित्त मटन, चिकन व दारूबंदीचा घेतला ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा गावात अयोध्या येथे श्रीराम मंदिर उद्घाटन मोठा सोहळा दि.२२ जानेवारी २०२४ ला संपन्न होत आहे.या निमित्ताने मटन, चिकन,मच्छी व दारु कोणी विकणार नाही याची खबरदारी घ्यावी असे आवाहन सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे यांनी केले आहे विकल्यास त्यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा गंभीर इशारा उपसरपंच मो आरिफ मो आरिफ यांनी दिला आहे. ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभा बोलावून गाव व परिसरात यापुढे थेंबभरदेखील दारू विकली जाणार नाही, असा दारूबंदीचा ठराव मंजूर केला आहे. आषाढी वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांनीही ग्रामसभेत सहभाग घेऊन दारूबंदी ठरावाला पूर्ण पाठिंबा दिला. यावेळी महिला वर्गाने मटन, चिकन, मच्छी व दारूबंदीचा ठराव मांडला. या ठरावावर ग्रामसभेत सविस्तर चर्चा होऊन एकमुखाने दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला. असे सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे यांनी जाहीर केले. यावेळी उपसरपंच मो आरिफ मो लुखमान, ग्रामसेवक सुधीर भालेराव, ग्रामपंचायत सदस्य मोहन सुरडकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, महिला, युवक, वारकरी उपस्थित होते.

# सत्य सत्यें देतें फळ । नाहीं लागत चि बळ ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**ज्याप्रमाणे घरात थंडी येऊ नये म्हणून आपण घराचे दरवाजे लगेच बंद करतो त्याच न्यायाने उन्हाळ्यात झळा आणि पावसाळ्यात पाउस दरवाज्यातून येऊ नये म्हणून आपण सारखाच प्रतिबंध करतो. याचा अर्थ थंडी, ऊन किंवा पाऊस आपल्याला नको असते असे नाही. ह्या तिन्ही बाबी सृष्टीच्या जिवंतपणाच्या द्योतक असूनही त्यांचा घरात शिरकाव रोखण्यासाठी आपण अट्टाहास करतो, तसे आपल्या भोवताल अनंत बाबी आहेत त्या रोखण्यासाठी अथवा स्वीकारण्यासाठी आपण प्रयत्न करत असतोच! उन्हाळ्यात थंडी आणि पाऊस शरीराला हवाहवासा वाटतो तर हिवाळ्यात ऊन पाहिजे असतं! माणसाचं मन मोठं मजेशीर आहे! ते सतत काहीतरी हव्यासापोटी काहीतरी अपेक्षा करत असतं! त्याला काहीही आणि कितीही द्या, पोट भरलेल्या शेळी सारखं कुठं तरी तोंड खुपसल्याशिवाय रहात नाही. ते नित्य अतृप्त असतं. या अतृप्त, धावाधाव करणाऱ्या मनाला प्रतिबंध घालणे जरी कठीण असले तरी त्याला थोडेफार नियंत्रण घालण्यासाठी आपल्याला विचार, आचार, लेखन, वाचन, चिंतन, ध्यान, व्याख्यान किंवा प्रार्थना आदि बाबींची नितांत आवश्यकता भासते.**

ती गरज आपण कोणत्यातरी पद्धतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतोच आणि त्यापैकी एक कृतीशील कार्य म्हणजे भूतकाळातील अनुभवी लोकांनी लिहिलेल्यावाङ्मय-विचारांचे वाचन करून त्याचा पाईक होण्याचा प्रयत्न करणे. त्यापैकीच हाती लागलेला अनुभव संपन्न सृजनत्वाचा हा खजाना म्हणजे संत तुकाराम महाराजांचा गाथा! त्यात

**सत्य सत्यें देतें फळ । नाहीं लागत चि बळ ॥१॥**
**ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ॥ध्रु.॥**
**करावीच चिंता। नाहीं लागती तत्वता ॥२॥**
**तुका ह्मणे भावें । शरण ह्मणवितां बरवें ॥३॥ (१२१३)**

असे एकेक अनमोल विचारांची रत्ने सांपडत जातात. एका एका शब्दांच्या जोडीला दुसरा तसाच पण नवा, वेगळा विचार व्यक्त करणारा शब्द भेटतो आणि आपल्या नव्या विचारांची शृंखला पुन्हा सुरु होते. नाही तरी जीवन म्हणजे काय? नवनव्या विचारांची नितांत सुंदर मालिका म्हणजे जीवन! विविधांगी अनुभवांच्या विविधरंगी मनमोहक फुलांनी सजलेली ही माला आपल्याला नेहमीच एका उच्च विचारांच्या उंचीवर नेऊन ठेवते. हि बाब मोठी मजेशीर आणि गमतीशीर आहे. आपण एक विचार करावा आणि त्याच्या जोडीला नितळशार पाण्यात एका माशामागून अनेक माशांचा समूह अलगद पोहत समोरून जावा तसं होतं! त्याला आवर घालता घालता आपल्या मनाची मोठी कसरत होते. त्या विचार मालिकेतील अनेक नितीदर्शक जीवन विचार आणि त्याच्या जोडीने तुकोबांच्या जीवनातील आचार आपल्याला नवनवे जगण्याचे आयाम खुले करून जातात. त्यातीलच हा एक अभंग. माणसाला जीवन जगायला जसा अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा लगतातच त्याच्या जोडीने या गरजांचा मनसोक्त उपभोग घ्यायचा असेल तर जोडीला शांत, निर्मळ, आनंदी मनाची नितांत आवश्यकता असते. असे मन हवे असेल तर तुकोबांच्या या अभंगात त्याचे काही मोलाचे मार्ग सांगितले आहेत.

आपल्याला सत्याच्या जोडीने केवळ सत्यच फलित होत असते. अनेक विचारवंत, लेखक, कवींनी सत्य किती मोलाचे आणि महत्वपूर्ण आहे हे सांगितले आहे. त्यासाठीश्रीमद् भगवद्गीता म्हणते

**सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्, न ब्रूयात् सत्यम् अप्रियम्।**
**प्रियं च नानृतम् ब्रूयात्, एष धर्मः सनातनः॥**

बोलायचे असेल तर सत्य आणि प्रियच बोला, अन्यथा असत्य, अप्रिय बोलू नका. याचे कारण म्हणजे असत्य कोणत्याही धर्माला कधीही आणि केंव्हाही मान्य असणार नाही. माणसाने नेहमी सत्य बोलून सत्याचीच बाजू घेतली पाहिजे. धम्म पदात महात्मा गौतम बुद्ध तर अतिसुंदर सांगतात. महात्मा बुद्ध म्हणतात, "तुम्ही ऐकलं म्हणून विश्वास ठेवू नका. अनेक पिढीपासून आलेल्या




परंपरांवर अवलंबून राहू नका. मोठ्यांनी सांगितले म्हणून त्यावर विश्वास ठेवू नका. तुमचा विवेक आणि सत्याच्या कसोटीवर ती गोष्ट तपासून पहा. ती तुम्हाला पटली तरच स्वीकारा." (बुद्ध, अनुगुत्तरा निकाया, पुस्तक १, पान १८८-१९३) याशिवाय जगप्रसिद्ध इंग्रजी कवी जॉन किट्स आपल्या ओड ऑन ए ग्रेसिअन अर्न या एका सुप्रसिद्ध कवितेत "ब्युटी इज ट्रुथ, ट्रुथ ब्युटी!" अशी ओळ लिहून भारताच्या सत्यम् शिवम् सुंदरम् या घोष वाक्याशी साधर्म्य साधतांना दिसतो. याशिवाय रोखठोक संत कबीर सत्याच्या बाबतीत

**साँच बराबरी तप नही, झुठ बराबर पाप ।**
**जाके हिरदे साँच है, ताके हृदय आप ॥**

ह्या जगप्रसिद्ध ओळी लिहून सत्याविषयी आपली भूमिका उजागर करतांना कुणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. त्यामुळेच ते

**सच सुनिये सच बोलिये सच की करे आस।**
**सत्य नाम का जप करो जग से रहो उदास॥**

अशी सत्याविषयी आपली भूमिका वारंवार उजागर करतांना दिसतात. याच न्यायाने जगद्गुरू संत तुकाराम महाराज सुद्धा 'माणसाला केवळ सत्य आणि सत्यच फळ देते. त्याशिवाय आनंदी, निरोगी, निस्पृह जीवन जगण्यासाठी अन्य कोनतेही बळ वापरण्याची गरज नाही. याची अनेक उदाहरणे इतिहासात आणि विविध धर्म ग्रंथात सापडतील. पाच पांडव शंभर कौरवांना भारी पडले. निशस्त्र बुद्ध शस्त्रधारी अंगुलीमालाला आपला अनुयायी बनवू शकले ते ही केवळ आणि केवळ सत्याच्या आधारेच! त्यामुळे सत्य हेच जगाच्या चलन वलणाचे इंगित आहे असे म्हणणे वावगे ठरू नये! याला जोडून तुकोबाराय माणसाने ईश्वराच्या पायाचे म्हणजेच मुलभूत शक्तीचे ध्यान करावे. त्याच्या जोडीला माणसाकडे धीर म्हणजेच संयम असणे अत्यावश्यक आहे. जो माणूस आनंदात आणि दुःखात धीरोदात्तपणे समोरच्या परिस्थितीला सामोरे जातो त्याचीच नौका वादळात टिकते! त्यामुळे ज्याच्याकडे सत्य, ईश्वर स्मरण आणि त्याच्या जोडीला संयम म्हणजेच धीर आहे त्यालाच जीवनात कोणत्याही गोष्टीची चिंता करण्याची अजिबात आवश्यकता नाही. शांत, विनम्र, विनीत माणसेच कोणत्याही काळात समाजाची खरी दिशादर्शक व्यक्तिमत्वे असतात. अभंगाच्या शेवटी माणसाने आपली शरणांगता कायम हृदयात ठेवली पाहिजे असे प्रतिपादन करून तुकोबा आनंदी, निरोगी जगण्याचे आणखी एक सोपे सूत्र सांगून जातात. शरणांगता माणसाला महान बनवते. शरणांगता म्हणजेच विनम्रता! एखाद्याकडे कोणतेही उच्च पदवीचे ज्ञान नसेल पण त्याच्याकडे शरणांगता, विनम्रता, सत्य, धार, संयम, शांतता इत्यादी मूलगामी गोष्टी असतील तर त्याच्याकडे एकही पदवीची आवश्यकता नाही. तोच व्यक्ती सर्वकाळ सर्वांचा मार्गदर्शक असू शकतो.

संत तुकाराम महाराजांचा गाथा हा सर्वकाळ मानवी दैनंदिन जीवनाला दिशा देणारे महाऔषध आहे. तुकोबांच्या गाथ्यातील एका एका वचनात पावलोपावली जीवन नीती सापडते आहे. त्यासाठी त्यांच्या अभंगांचे केवळ कोणत्याही एका अंगाने विश्लेषण न करता ते अभंग म्हणजे फार मोठे नितीदर्शक तत्वे आहेत! त्यांच्या आधारे आपल्याला जीवनातील सर्वच अडचणी, समस्यांना तोंड देता येते. तुकोबांची अभंग नीती तत्वे आजही आपल्याला रोजच्या जीवनात दिशा देतात. सत्य, धीर-संयम, शांती, चिंतामुक्त जीवन आणि शरणांगता आपल्याला नेहमीच कामाला येते. त्यासाठी आजसुद्धा आपण सर्वांनी या वैश्विक मुल्यांचा आपल्या जीवनात अंगीकार करून आपले आणि आपल्या भोवतालचे जीवन आनंदी करावे. आपण स्वतः आनंदी, निरोगी, स्वस्थ राहून आपले घर, परिसर आणि सहकारी आनंदी, निरोगी करावे. त्यासाठी आज तुकोबांच्या अभंगांचे सामुहिक वाचन होणे काळाची गरज बनली आहे. एकीकडे वाचन संस्कृती लोप पावत असतांना दुसरीकडे 'माणसाला ग्रंथाशिवाय पर्याय नाही' हा महामंत्र देण्याची महत्वपूर्ण वेळ येऊन ठेपली आहे. तेंव्हा, माय बाप वाचकांना माझे नम्र आवाहन आहे की; आपण आपल्यासह आपल्या भोवताल वाचन-लेखन संस्कृती रुजवून काही वेळ तरी मोबाईलच्या विळख्यातून सुटून तुकाराम गाथा वाचन करावे. त्याचे अवलोकन करण्याचा विचार करावा. असे झाल्यास आजही कठीण काळात तुकोबा आपल्या मदतीला धावून आल्याशिवाय राहणार नाहीत! जय तुकोबाराय!

# बासमती तांदळाला जागतिक स्तरावर सर्वोत्तम स्थान



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**भारतीय बासमती तांदळाची मागणी जागतिक स्तरावर सातत्याने होताना दिसत आहे. मागील ४ महिन्यात बासमती तांदळाचे भाव हि १५ ते १८ टक्के ने वाढले आहेत. टेस्ट एटलस ही संस्था जी पारंपारिक अन्न, पाककृती आणि संशोधनाचे पुनरावलोकन करते त्यांनी जगातील ६ सर्वश्रेष्ठ तांदळाची सूची जाहीर केली आहे. त्यात भारतीय बासमती तांदळाला सर्वोत्तम स्थान मिळाले आहे. बासमती तांदूळ स्वाद, वास आणि ग्लूटेन फ्री असल्याने चांगली पसंती मिळत आहे.**

**साखर उत्पादन :** नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लिमिटेड ने जारी केलेल्या आकडेवारीनुसार दि.१५ जानेवारी पर्यंत देशभरातील ५११ साखर कारखान्यांमध्ये २०२३-२४ हंगामासाठी एकूण १५६३ लाख टन ऊसाचे गाळप तर १४८.७० लाख टन साखर उत्पादन झाले. महाराष्ट्रात १९७ साखर कारखान्यांमध्ये ५४८.३९ लाख टन ऊसाचे गाळप करून ५१ लाख टन साखर उत्पादन घेतले आहे. या वर्षी सर्वाधिक म्हणजे नोव्हें अखेर २७५ लाख टन उत्पादन घेत यंदाच्या हंगामात ४०० लाख टनांचा टप्पा ओलांडला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर उत्पादनात ३५ टक्के वाढ झाली आहे. नोव्हेंबर अखेर ब्राझीलने २७५ लाख टन साखर निर्यात केली आहे.

**तेलबिया :** अमेरिकेच्या कृषी विभागाने जागतिक स्तरावर तेलबियांचे उत्पादन ६,६०१ लाख टन होण्याची शक्यता वर्तविली आहे. हे मागील अंदाजापेक्षा ८ लाख टनाने कमी आहे. या अहवालानुसार अर्जेंटीना, अमेरिका, रशिया आणि चीनमध्ये सोयाबिनचे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. तर ब्राझिल मधील उत्पादन घटण्याची शक्यता आहे. सूर्यफूलचेही उत्पादन वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हे सर्व पाहता साठा अधिक असल्याकारणाने जागतिक स्तरांवर तेल आणि तेलबियांचे भाव दबावाखालीच राहतील. ब्राझीलमध्ये सोयाबीनचे उत्पादन २०२२-२०२३ हंगामामध्ये १६१० लाख टन इतके होते. पण यावर्षी सोयाबीनचे उत्पादन हे २५ लाख टनाने घटून १५८५ लाख टनापर्यंत खाली घसरण्याची शक्यता आहे. ब्राझीलमध्ये सोयाबीनचे लागण क्षेत्र ३ टक्के ने वाढले. केंद्र सरकारने खाद्यतेल आयात शुल्कात केलेली कपात आणखी एका वर्षासाठी कायम ठेवली आहे. त्यामुळे आणखी एक वर्ष कच्चे सोयातेल, पामतेल आणि सूर्यफुल तेलावर ५.५० टक्के आणि रिफाईंड तेलावर १३.७५ टक्के आयात शुल्क असेल. यामुळे पुढील वर्षभर देशात स्वस्त खाद्यतेल आयातीचा लोंढा येऊन देशातील तेलबिया बाजारावर याचा परिणाम दिसू शकतो.



आंतरराष्ट्रीय स्तरावर सोयाबीनच्या भावात सातत्याने घसरण होताना दिसत आहे. चीनकडून सोयाबीनची खरेदी कमी झाली तर ब्राझीलमध्ये नुकत्याच झालेल्या पावसामुळे सोयाबीनचे उत्पादन वाढण्याचे अंदाज वर्तविले आहेत. त्यातच तेलाची खपत कमी झाल्यामुळे सोयाबीनचे भाव मागील दोन वर्षात निच्चांकी स्तरावर पोहोचले आहेत. अमेरिका आणि अर्जेंटिनामध्ये सोयाचा साठा कमी असतानाही फक्त मागणी घटल्यामुळे सोयाबीनचे भाव दबावाखाली आहेत. आता थोड्याच दिवसात ब्राझिलमधून सोयाबीनची आवक वाढू लागेल त्यामुळे नजीकच्या काळात सोयाबीनच्या भावात वाढ होण्याची शक्यता कमी आहे.

हळदीच्या भावात ५ टक्के वाढ :- बाजारपेठेत नव्या हळदीची आवक हळूहळू वाढत असून व्यापाऱ्यांकडून चांगली पसंती मिळत आहे. मागील आठवड्यात हळदीच्या भावात ५ टक्के वाढ झाली. फेब्रुवारीच्या सुरुवातीपासून निर्यातदारांच्याकडूनही मागणी वाढेल त्यामुळे हळदीचे भाव १४,५०० रुपये प्रति क्विंटल पर्यंत वाढू शकतात.

**तुरीची खरेदी लवकरच सुरु :** सरकारचे भारत डाळ अंतर्गत डाळ वितरण करण्याचे उद्दिष्ट असल्याने केंद्रसरकार बाजारभावाप्रमाणे तुरीची खरेदी लवकरच सुरु करेल असे वाटते. १० ते ११ लाख टन तुरीची खरेदी सरकार करू शकते. सध्या तुरीला ८००० रुपये पर्यंत भाव मिळत असून भावात २००० ते २५०० रुपयांची वाढ होऊ शकते पण खूप मोठ्या तेजीची शक्यता नाही.

**मोलॅसिसवर ५० टक्के निर्यात शुल्क :** दि.१५ जानेवारी रोजी जारी करण्यात आलेल्या सरकारी अधिसूचनेनुसार, केंद्राने मोलॅसिसवर ५० टक्के निर्यात शुल्क लादले आहे. दि.१८ जानेवारीपासून ही ड्युटी लागू झाली. इथेनॉल मिश्रित पेट्रोलचे भारताने लक्ष्य साध्य करण्यासाठी पुरवठा वाढविण्यासाठी सरकार मोलॅसिसच्या निर्यातीवर शुल्क लावण्याचा विचार करत आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा मोलॅसिस निर्यातदार देश आहे आणि जागतिक व्यापारात सुमारे २५ टक्के योगदान आहे.

**कपाशीचे उत्पादन :** जागतिक स्तरावर कपाशीचे उत्पादन २ लाख ६० हजारने वाढून १,१३२ लाख टन होण्याची शक्यता अमेरिकेच्या कृषी खात्याने वर्तविली आहे. चीन आणि अर्जेंटिनामध्ये कपाशीचे उत्पादन वाढण्याची शक्यता तर भारतातील कपाशीचे उत्पादन घटण्याचे अंदाज वर्तविण्यात आले आहे. कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने प्रसारित केलेल्या माहितीच्या अनुसार २९४ लाख गाठीचे उत्पादन होण्याची शक्यता होती पण अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अंदाजानुसार २५० लाख गाठींचे उत्पादन होण्याचे अंदाज वर्तविले आहेत. उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता वर्तविण्यात आल्याने जागतिक स्तरावर कपाशीच्या भावावर दबाव टिकुन राहील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

**निर्यात आणि दरडोई उत्पन्न :** गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू या चार राज्यांचा भारताच्या निर्यातीत ६५ टक्के वाटा आहे आणि त्यांचे दरडोई उत्पन्नही उच्च आहे. देशातील ७६० पैकी फक्त ६२ जिल्हे भारताच्या निर्यातीत ८० टक्के योगदान देतात. म्हणून निर्यात उपक्रमांमध्ये अधिकाधिक जिल्ह्यांचा समावेश करण्याची गरज आहे. निर्यात आणि दरडोई उत्पन्नातील वाढ यांचा अतिशय सकारात्मक संबंध आहे. याचा फायदा केवळ निर्यातदारांनाच मिळत नाही तर निर्यातीशी संबंधित संपूर्ण मूल्य साखळीला फायदा होतो.

**अन्नधान्याचे उत्पादन :** भारतीय कृषी मंत्रालयाने अलनिनो मुळे अनियमित पाऊस झालेला असतानाही अन्नधान्याचे उत्पादन २ टक्के ने वाढण्याची शक्यता वर्तविली आहे. सन २०२१-२२ हंगामात ३४७० लाख टन उत्पादन झाले होते. मात्र सन २०२२-२३ हंगामात ३५५० लाख टन उत्पादन होण्याचे अंदाज आहे. यामध्ये बागायती कृषी उत्पादनाची वाढ २.३२ टक्के ने दर्शविली आहे. मागील वर्षी फळांचे उत्पादन १०७५ लाख टन झाले होते ते यंदा १०९५ लाख टन होण्याची शक्यता आहे. भाजीपाल्याचे मागील हंगामात फक्त १०९ लाख टन उत्पादन झाले होते ते यंदा २८८ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता आहे.

**कांदा :** कांद्याचे बाजारभाव या आठवड्यात सातत्याने घसरताना दिसत आहेत. मागील पंधरवाड्यात सरासरी १८०० रुपये प्रतिक्विंटल पर्यंत कांद्याला भाव मिळत होते ते १३०० रुपये पर्यंत खाली घसरले आहेत. मोठ्या प्रमाणात आवक होत असल्याचा परिणाम भावावर होताना दिसत आहेत. पोळ कांद्याची आवक अधिकच राहील. नजीकच्या काळात कांद्याच्या भावात सुधारणा होण्याची शक्यता नाही.

**कृषी मंत्रालयाचा २१ हजार १३ कोटी रुपये निधी परत :** केंद्रीय कृषी मंत्रालयाने २१ हजार कोटींचा निधी न वापरताच परत केल्याची धक्कादायक माहिती कृषी मंत्रालयाच्या २०२२-२०२३ च्या अहवालातून समोर आली आहे. अकाऊंट ॲट अ ग्लान्स फॉर द इयर २०२२-२३ अहवालानुसार, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने गेल्या आर्थिक वर्षात १.२४ लाख कोटी रुपयांपैकी २१ हजार १३ कोटी रुपये निधी न वापरताच परत पाठवला आहे.

# स्वच्छता परमो धर्म: फक्त जाहिरातीवरच

## सरकार आणि प्रशासन यांच्यात ताळमेळाचा अभाव

आधुनिक केसरी न्यूज



**सचिन कोरडे**

**धाराशिव :** महाराष्ट्र राज्यातील प्रशासनाला राज्य सरकारने स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजना ही प्रभावीपणे राबविण्यासाठी सपशेल अपयश येत आहे. सध्याच्या परिस्थितीवरून असेच चित्रं दिसत आहे. राज्य शासनाकडून वाढत्या प्रदूषणाबाबत गंभीर दखल घेत पुन्हा एकदा जाहिरातीवर प्रचंड खर्च करतं "स्वच्छ महाराष्ट्र अभियान" राबविण्यात येत आहे. याच जाहिरातीमधून राज्य सरकार जैन सामान्यांना स्वच्छता हाच पुरंदरम आहे सर्वांगीण स्वच्छता ही सर्वांची एकत्रित जबाबदारी आहे. अस्वच्छता व कचरा यामुळे रोगराई दुर्गंधी प्रदूषणयुक्त वातावरणाची निर्मिती होते व याचाच परिणाम आपल्या आरोग्य व सामाजिक जीवनावर होतो.

असे जाहिरातीमधून राज्य सरकार ठणकावून सांगत आहे.

स्वच्छतेचा संदेश देताना सामान्य जनतेला महाराष्ट्र सरकार ओला व सुका कचरा वेगळ्या करण्याचे आवाहन करत आहे. सामान्य जनता ही त्यांच्या या"स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला" भरभरून प्रतिसाद देऊन ओल्या व सुक्या कचरा वेगळ्या प्रकारे ठेवून महाराष्ट्र सरकारच्या उपक्रमाला प्राधान्य देत आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये मात्र "स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला"चक्क केराची टोपलीच ठेवल्याचं चित्र दिसत आहे. आज घराघरातून ओलावा सुका असा वेगवेगळ्या पद्धतीने गोळा केलेला कचरा ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत व नगर परिषद या संस्थांकडून या कचऱ्याचे विल्हेवाट ही चक्क कचरा पेटवून देऊन लावण्यात येत आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी राज्यमार्ग,महामार्गाच्या कडेला तसेच वनक्षेत्राच्या परिसरात सर्रासपणे हा कचरा जाळला जातो आहे धाराशिवरांसाठी अतिशय निंदनीय बाब आहे. तिकडे महाराष्ट्र सरकार स्वच्छतेला नाही पर्याय, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण हाच एक उपाय!

अशा जाहिराती विविध वर्तमानपत्रातून प्रदर्शित करत आहे. इकडे जिल्ह्यातील ह्या संस्था ओल्या व सुक्या कचऱ्यासोबत महाराष्ट्र शासनाच्या जाहिरातीची होळी करत आहे. आज वायू प्रदूषणामुळे भारतात दरवर्षी सुमारे २१.८ लाख मृत्यू होत असल्याचा धक्कादायक दावा 'द बीएमजी' नियतकालिकात प्रकाशित केलेल्या एका अभ्यासात करण्यात आला आहे. प्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतातील सर्वात जास्त प्रदूषण हे दिल्लीमध्ये आहे. त्या पाठोपाठच मुंबई व पुण्यात वाढते प्रदूषण हे धोकादायक ठरत आहे. ग्रामीण भागातही वायु प्रदूषण हळूहळू डोके वर करत आहे.

यासाठीच राज्य सरकार स्वच्छ महाराष्ट्र अभियान हे प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न करत आहे. सामान्य नागरिकांच्या दारासमोर नियमित येणारी घंटागाडी स्वच्छ भारत अभियानाचे गाणे गात ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करत डम्पिंग करताना मात्र एकाच ठिकाणी डम्पिंग करून त्याला पेटवून देत,शासनाच्या "स्वच्छ भारत अभियानालाचा" काडी लावण्याचे काम प्रशासनाकडून होत असेल तर प्रदूषण मुक्त भारत पुढची पिढी कशी पाहणार पेटवलेल्या कचरा कडे पाहून हाच प्रश्न जागरूक नागरिकांच्या मनाला भिडत आहे.

# प्रभू रामचंद्रांच्या आगमन प्रीत्यर्थ वैजापूरनगरी सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेले श्री, प्रभू रामचंद्रजी यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा अयोध्येतील भव्य दिव्य मंदिराच्या गर्भगृहात वैदिक विधिनुसार२२जानेवारी, रोजी अभिजित मुहूर्तावर होत आहे, काशीचे गणेशेश्वर शास्त्री यांनी काढलेल्या मुहूर्तामध्ये २२जानेवारी ला दुपारी१२-४५ या वेळात प्रभू रामचंद्र विराजमान होतील,या पार्श्वभूमीवर वैजापूर ही विविध मंदिरात रामरक्षा पठण,हनुमान चालीसा, आरती व महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार आहेत ,मोंढा मार्केट येथील प्रभ श्री रामचंद्र यांच्या मंदिरात विद्युत रोषणाई करण्यात आली असून या मंदिरात २२जानेवारी रोजी सकाळी११-००वाजता रामरक्षा पठण,११-३०वाजता हनुमान चालीसा व प्रभू रामचंद्र यांची आरती,व लगेच महाप्रसाद वाटप होणार असल्याचे विश्वस्त सुरेश तांबे,व मंदिर पुरोहित अशोक जनार्दन पैठणे यांनी सांगितले या समयी सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, किरण अर्जुन थोट, प्रतीक नारळे, मोनाली पैठणे उपस्थित होते संकट मोचन मंदिरात पुरोहित चंद्रकांत कुलकर्णी यांनी सांगितले की,दुपार१२-२०ला आरती होईल, तर वैद्यनाथ मंदिर( मोठे महादेव मंदिर )येथे ही आरती व सायंकाळी दीपोत्सव होणार आहे असे पुरोहित हरिष लालसरे यानी सांगितले,शहरातील मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आलेली असून,मुख्य रस्त्यावर भगवे ध्वज लावून शहर भगवेमय झालेले आहे,शहरात घरोघरी सडा शिंकडून दीपोत्सव करण्यात येणार आहे,संपूर्ण वैजापूर वाशी मोठ्या उत्सुकतेने प्रभू रामचंद्र यांच्या अयोध्येतील मूर्ती प्राणप्रतिष्ठाउत्सव साजरा करण्यासाठी सज्ज झालेले आहेत.





# भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव प्रशांत मेंगे यांनी घेतला जिल्ह्याचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** भाजपाच्या वतीने होणाऱ्या नमो चषक व नमो नव मतदाता संमेलनाच्या अनुषंगाने शुक्रवार, १९ जानेवारी रोजी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा प्रदेश सचिव प्रशांत मेंगे यांनी जिल्हयातील विधानसभा निहाय रिसोड, वाशिम, कारंजा या ठिकाणच्या भागाला भेटी देवून कार्यक्रम स्थळाची पाहणी केली. या अनुषंगाने स्थानिक जिल्हा पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. प्रारंभी मालेगाव येथे ना.ना. मुंडा विद्यालयात पाहणी करण्यात आली. त्यानंतर रिसोड येथे भेट देण्यात आली. तसेच महालेश्वर मंदिर येथे स्वच्छता करण्यात आली. या पाहणीमध्ये त्यांच्यासोबत कार्यकारणी सदस्य सारंग निर्भण, भाजयुमो जिल्हाध्यक्ष अमोल भुतेकर, भाजयुमो महामंत्री डॉ. उमेश तारे, गिरीश शर्मा, अमोल गढवाले, जिल्हा उपाध्यक्ष धीरज लहाने, राम घुगे, मोहसीन पठाण, मनोज अनसिंगकर, भैय्या देशमुख, राहुल शिंदे, गोलू पाटील काळे, सचिन शर्मा, राहुल निर्बाण, रिसोड तालुका अध्यक्ष रविराज खराटे, रिसोड शहराध्यक्ष सागर डांगे, मालेगाव शहराध्यक्ष अभिषेक अढाव, वाशीम शहर अध्यक्ष वैभव उल्हामाले सहित सर्व तालुक्यातील सरचिटणीस, उपाध्यक्ष, सचिव सदस्य उपस्थित होते.

# जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवणे काळाची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गोळेगाव येथे आज दि. २० रोजी उत्तम कापूस निर्मिती कार्यक्रम,कॉटन कॉनेट आणि संजीवनी सक्षमीकरन विकास संस्था औरंगाबाद गट प्रमुख शेतकरी यांच्या कापूस शेतकऱ्यांचे अभ्यास दौरा आणि पुनरुत्पादक शेती पद्धतींचे प्रशिक्षण वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कॉटन कॉनेट जिल्हा संनव्यक जयदीप शेटे याचे प्रतिपादन आज मितीस शेतकरी आपल्या शेत जमिनीतील सेंद्रिय कर्ब जोपासना आणि वाढी बाबत जागरूक होणे हि काळजी गरज आहे. म्हणून शेतकरी वर्गाने बायोचार पद्धती अबलंबून आपल्या शेतीत यांचा योग्य वेळी योग्य रीतीने वापर करावा. बायोचार पद्धती समजावून सांगता संजीवनी सक्षमीकरन विकास संस्था औरंगाबाद तालुका समनव्यक नागसेन घोडेराव यांनी बायोचार प्रात्यक्षिक समजावून सांगिलते. १ एकर क्षेत्रासाठी प्रात्यक्षिकसाठी त्रिकोणी आकाराचा गड्डा २मी.लांबी,१. मी खोली,कापसाची वाळलेल्या काड्या १००० किलो कापसाच्या वाळलेल्या पराठ्या जाळून बायोचार बनवणे . बायोचार तसेच शेतात टाकू नये. त्याचे कंपोस्टिंग करावे. कॅपोस्टिंगसाठी ७ फूट लांबी ४फूट रुंदी ३ फूट उंची चा डिगार बनवावा. ज्या मध्ये बायोचार,जंगल माती,ओला पाला,वाळलेला पाला,गांडूळ खत,जीवामृत,असे सहा थर द्यावेत आणि वरील बाजूला माती टाकून त्यामध्ये चवळीची लागवड करावी हे कंपोस्ट खत दोन महिन्यात तयार होईल. त्याचा वापर प्रति एकरी ३ टन म्हणजेच बायोचार १. ५ टन आणि सेंद्रिय पदार्थ १. ५ दिल्यास ०. १ टक्के सेंद्रिय कर्ब वाढतो. यानंतर अनिल चव्हाण आणि ज्ञानेश्वर जाधव, अरुण जाधव यांनी उत्तम कापूस दिनदर्शिका मधील शेतकरी यांना दर माहिन्याला करायची कामे कोणती आहे याची सविस्तर माहिती दिली. यावेळी गदाना बोरवाडी ग्रुप ग्रामपंचात सरपंच पोपटराव चव्हाण उपसरपंच कैलास चव्हाण गोळेगाव ग्रामपंचात सरपंच ताराबाई कारभारी औटे तर पंचक्रोशीत गट प्रमुख शेतकरी उपस्थिती होते. कार्यक्रम पार पाडण्यासाठी रामधन कडुबा बोडके,पवन बबन औटे, सचिन हरिदास महालकर, निर्मला खरे,अर्चना जाधव,पूजा जाधव,सागर निकम,संतोष कामठे,अनिल भागडे,बाळू शिंदे,मीना शिंदे,सुनील खरे यांनी मोलाचे सहकार्य केले.



# महावीर झेरॉक्स व तनुजा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त निबंध स्पर्धेचे आयोजन

## निबंधाचा विषय छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन कार्य

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** प्रथमच महावीर झेरॉक्स रिसोड व तनुजा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेसाठी लाखो रुपयांचे बक्षीसही ठेवण्यात आले आहे या स्पर्धेमध्ये दोन गट ठेवण्यात आले असून प्रथम पाचवी ते दहावी असून दुसरा गट हा अकरावी पासून तर वर्गासाठी खुला प्रवर्गासाठी आहे यामध्ये पाचवी ते दहावी गटाखाली प्रथम क्रमांकाचे बक्षीस 51 हजार रुपये द्वितीय बक्षीस 21 हजार रुपये तृतीय बक्षीस11 हजार रुपये चौथे बक्षीस 5 हजार पाचवे बक्षीस 2 हजार रुपये तर खुला वर्गासाठी प्रथम बक्षीस 1 लाख रुपये द्वितीय बक्षीस 51 हजार द्वितीय बक्षीस 21 हजार चौथे बक्षीस 11 हजार पाचवे बक्षीस 5 हजार असून स्पर्धकांनी स्पर्धेमध्ये भाग घेऊन सहकार्य करावे.



शिवभक्तांनी 10 फेब्रुवारी पर्यंत महावीर झेरॉक्स पंचायत समिती समोर रिसोड या ठिकाणी कुरियर किंवा स्वतः निबंध आणून द्यावे लिहिलेल्या निबंधाची एक झेरॉक्स व हस्तलिखित निबंध जमा करावा असे आव्हान केले आहे अधिक माहिती अधिक खालील नंबर वर संपर्क करू शकता 9420352121 9960292121

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**



सेक्स आणि आहार (भाग 2) : मागील भागात आपण कोणत्या आहाराचा लैंगिक जीवनावर कसा परिणाम होतो हे पाहिले. आज याचा दुसरा भाग...

पाईन नट्स (चिलगोजा) - यामध्ये 'झिंक' असून त्यामुळे भावना उत्तेजित होते. यामध्ये 'मॅग्नेशिअयम' असते, ज्यामुळे टेस्टोस्टेरॉन व शुक्राणू वाढतात. चेरीज - यामध्ये 'अन्थोसायनीन' नावाची वनस्पतिजन्य औषधी असते, जी रक्तवाहिन्यांमधील गाठी कमी करते आणि त्यामुळे कंबरेखालील रक्तपुरवठा वाढतो. वाईन - रेड वाईनमुळे टेस्टेस्टेरॉन वाढते 'क्युअर सेटीन' हे टेस्टेस्टेरॉन तयार होण्यास अडथळा असलेल्या संप्रेरकाला विरोध करते. त्यामुळे 'टेस्टेस्टेरॉन' वाढते. हे अँटिऑक्सिडंट असून नायट्रिक ऑक्साईड ॲसिड वाढवते. कतुबा (CATUABA) - ही वनस्पती ब्राझीलमध्ये आढळते. हे प्रामुख्याने उतेजना वाढवणे आणि नपुंसकता घालवणे यासाठी वापरतात. कुतुबीन हे ब्रेनमधील सेक्स सेंटरवर काम करतात. सॅलमन (SALMAN)- हा एक तैलीय कोल्ड वॉटर फिश आहे. ज्यामध्ये ओमेगा -३, फॅटी ॲसिड असतात. यामुळे 'डोपॅमीन'चा स्तर वाढतो. लव मॉल्युकल, मोअर सेक्स मोअर फन. ब्राझील नटस् - यामध्ये सेलेनियम असते. पुरुष नपुंसकतेमध्ये याचा उपयोग होतो. याच्या सेवनामुळे स्पर्म मोटिलिटी वाढते. पोटॅटोज - (बटाटा) बटाट्यामध्ये पोटॅशियअम असतं. ज्यामुळे रक्ताभिसरण वाढतं. मका (CORN)- यामुळे उत्तेजना वाढते, स्टॅमिना, जननक्षमता वाढते. हे ॲन्टिडीप्रेसन्टमुळे आलेले इरेक्टाईल डिसफंक्शन कमी करते. कॅरेट (गाजर) - शुक्राणूंची संख्या व हालचाल वाढते. सिरॅनो चिल्लिज (ढोबळी मिरची) - कॅपसिसीनमुळे टेस्टोस्टेरॉन वाढते. सरॅनो पिपर व क्युअर सेटीन शरीरातील टेस्टोस्टेरॉन वाढवते. यामुळे नाडीची गती वाढते जे उत्तेजनेचे लक्षण आहे. पम्पकिन सीड्स (भोपळा) यामध्ये झिंक आणि मॅग्नेशियम असते. तसेच पॉली अनसॅच्युरेटेड फॅटी ॲसिड असते जे प्रोस्टाग्लॅडीनसारखे संप्रेरक तयार करतात. ज्यामुळे सेक्स वाढतो. चिकन ब्रेस्ट - यामध्ये अरजीनीन आणि व्हिटॅमीन बी असते. सिलेरी (CELERY)- यामध्ये अण्ड्रोस्टेरॉन हे मेल सेक्स हार्मोन असते, जे घामातून बाहेर पडते व स्त्रियांमध्ये उत्तेजना देते. लिव्हर (कलेजी) - यामध्ये झिंक टेस्टेस्टेरोनला इस्ट्रोजेन मध्ये बदलू देत नाही. बीफ लिव्हरमध्ये व्हिटॅमीन बी १२ असते जे कमी असल्यास 'इरेक्टाइल डिसफंक्शन' होते. EGGS (अंडी) - या मध्ये' कोलीन' असते. हे फॅट बर्न करते. यामुळे नायट्रिक ऑक्साईड तयार होते. ACH ॲसिटील कोलीन यामुळे जास्त उत्तेजना येते. यामध्ये व्हिटॅमीन बी५ आणि व्हिटॅमीन बी६ असतात, यामुळे संप्रेरक संतुलन आणि स्ट्रेस कमी होतो. हनी (मध) - यामध्ये 'क्युयरसेटीन' असते. ज्यामुळे कठोरता येते आणि स्ट्रेस कमी होतो. यामुळे ब्लड, शुगर यावर परिणाम होत नाही आणि त्यामुळे फॅट्स कमी होतात. यामुळे दुपारचा चहा किंवा ओटमीलमध्ये मधाचा वापर करावा. शिताके मशरूम (SHIITAKE MUSHROOMS) यामुळे भावना वाढण्यास मदत होते. यात सर्वाच जास्त कोलीनचं प्रमाण असतं. यामध्ये झिंक, व्हिटॅमीन डी असते जे टेस्टोस्टेरॉन वाढवते. ग्रास फीड बीफ - यामुळे शरीर पीळदार बनते. फॅट्स कमी होतात. यामध्ये व्हिटॅमीन बी १२ असते, जे 'इरेक्टाइल डिसफंक्शन' मध्ये कमी येते. मुईरा पुआमा (MUIRA PUAMA) - हे एक ब्राझिलियन श्रब (झुडूप) आहे. हे उत्तेजना वाढवण्यासाठी मदत करते.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट, अँड्रॉलॉजिस्ट अँड सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

# राममंदिर ट्रस्टला शरद पवारांचे उत्तर



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**शिल्लक राहिलेल्या राष्ट्रवादी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांनी उद्याच्या 22 रोजी आयोध्येत होत असलेल्या प्रभु राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे ट्रस्टकडून आलेले पत्र स्विकारून दिलेल्या उत्तरात त्यांनी राम विश्वव्यापी असल्याचे म्हणत मंदिर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर येणार असल्याचे प्रतिउत्तर दिले. स्वभावी नास्तिक असलेल्या पवारांनी 84 वर्षाच्या वयात राम विश्वव्यापी आहे असं म्हणत अस्तित्व मान्य केलं हेच खया अर्थाने सनातन हिंदु धर्मासाठी फार मोठे यश म्हणावे लागेल.**

मंदिर बांधकाम पुर्ण झाले का नाही?याचे उत्तर पवारांना काँग्रेसवाले देवु शकतील पण प्राणप्रतिष्ठा गाभायात शंभर टक्के बांधकाम पुर्ण झाले असुन रंगरंगोटी चालणे म्हणजे अर्धवट बांधकाम म्हणता येणार नाही. खरं तर पवारांना देवदर्शनाची संधी चालुन आली होती पण केवळ मताच्या लाचारीसाठी मी रामाचा नाही हे दाखवण्याचा त्यांचा खटाटोप यातुन दिसतो.

उद्याच्या 22 रोजी आयोध्येत रामलल्ला मुर्ती प्राणप्रतिष्ठापना होत असुन मंदिर ट्रस्टने देशातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रणे पाठवताना वेगवेगळ्या राजकिय पक्ष नेत्यांना देखील येण्यासाठी पत्र पाठवले. जसं की काँग्रेसमध्ये सोनिया गांधीसह मल्लिकार्जुन खरगे एवढेच नव्हे तर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, लालुप्रसाद यादवासह देशातील सर्व मुख्यमंत्री, मंत्रीगणाला निमंत्रणे पाठवली. उद्देश हाच आहे की, ज्या भारतवासियांनी साडे चारशे वर्षाचा राम जन्मभुमीसाठी दिलेला लढा, अधुनमधुन केलेली कारसेवा आणि राम आयोध्येतच जन्मला पुराव्यासहित दाखल केल्यानंतर अखेर न्यायदेवतेलासुद्धा मान्य करावे लागले. कितीतरी वर्षाचे स्वप्न देशवासियांचे साकार होताना ज्यांनी संघर्षाचे साक्षीदार म्हणुन काम केले ते रामभक्त खया अर्थाने स्वर्गातुनसुद्धा उद्याच्या 22 रोजी सोहळ्याचे साक्षीदार झाल्याशिवाय रहाणार नाहीत. प्रभु रामचंद्र एका दुसयाचे नव्हते किंवा जातीपातीच्या राजकारणातले नव्हते सर्वव्यापी चराचर विश्वाचा माय-बाप म्हणुन त्यांच्याकडे पाहिल्या जाते. क्षत्रीय कुळातील राजा राम असं देखील त्यांना म्हणता येईल. एक गोष्ट खरी आहे की, मुघलांनी भारतीय हिंदु समाजाची मानांकन नष्ट करताना अस्मिता कायम पुसुन टाकण्यासाठी साधारणतः 1500 मध्ये मंदिर उद्धवस्त करून बाबरी मशिद बांधली होती. तदनंतर अखंडित लढा हिंदु बांधवांनी लढला. उद्याचा 22 जानेवारी येवु घातलेला दिवस पुन्हा एकदा देशात नव्हे तर जगाच्या पाठीवर दिपावली उत्सव साजरा करण्यासारखाच होय. आपण सारे असे भाग्यवान आहोत की वर्षातुन दुसयांदा दिवाळी साजरी करण्याचा योग रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेमुळे येताना दिसतो.



खरं तर स्वातंत्र्यानंतर रामलल्ला जन्मस्थळाचा प्रश्न मार्गी लावायला हवा होता पण तत्कालीन काळात काँग्रेस व्यवस्थेने हा प्रश्न लोंबकळत ठेवला. केवळ मताच्या लाचारीसाठी ज्याचे साक्षीदार स्वतः शरदचंद्रजी पवार जे की महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणात मागच्या पन्नास वर्षापासुन काम करताना दिसतात. राम नव्हताच अशा प्रकारची भुमिका अधुनमधुन काँग्रेसवाल्यांनी घेतली त्यात पवारसुद्धा मागे नाहीत. मध्यंतरी नाशकात एका जाहिर कार्यक्रमात शरद पवार म्हणाले होते की, राम आमच्यासाठी श्रद्धेचा विषय नसुन इतर प्रश्न महत्वाचे वाटतात. स्वतः पवार साहेब नास्तिक म्हणुन ओळखले जातात ज्यांनी कधीच हिंदु देव धर्माला नतमस्तक होवुन लोटांगण घेतल्याचे जाणवत नाही. धर्मनिरपेक्ष, पुरोगामी विचारप्रणालीचा अवलंब करताना सनातन धर्म आणि हिंदु धर्माचा द्वेष नेहमीच पवारांनी उघडपणे केल्याचे सत्य लपुन राहिलं नाही. वर्तमान स्थितीत शरदचंद्रजी पवार हे शिल्लक राहिलेल्या राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष म्हणुन काम पहातात. वास्तविक पहाता राष्ट्रीय पातळीवर त्यांच्या पक्षाची मान्यता निवडणुक आयोगाने काढून घेतली तो भाग वेगळा. कार्यक्रमाचा औपचारिक भाग म्हणुन राम मंदिर ट्रस्ट आयोध्या यांनी पवार साहेबांना प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला येण्यासाठी निमंत्रण दिले होते. खरं तर आयोध्येचे पत्र म्हणजे खया अर्थाने आपल्या जीवनातील भाग्याचा क्षण समजायलाच हवा. पण अधर्म आणि दुराचार जेव्हा विचारप्रणालीत असतो त्यावेळी स्वतःला देवापेक्षाही श्रेष्ठ माणुस समजुन घेतो. कदाचित हाच आविर्भाव त्यांच्या एकुण बॉडी लँग्वेजमध्ये असावा. मात्र पवारांनी मंदिर ट्रस्टला उत्तर देताना एक सत्य सहज का होईना? त्यांच्या पेनातील शाईमधुन बाहेर पडले. ते म्हणाले, राम विश्वव्यापी होता आणि मंदिराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मी दर्शनासाठी येईल. बरं झालं पवार साहेबांनी प्रभु रामचंद्राचं अस्तित्व वयाच्या 84 वर्षात असताना मान्य केलं हे कमी नव्हे. विश्वव्यापी म्हणजे जगाच्या पाठीवर असलेल्या चराचर जीवामध्ये परमेश्वराचा अंश असतो हेच कदाचित पवार साहेबांनी मान्य केलं. पण प्रभु रामचंद्राच्या वतीने जेव्हा पत्र येतं त्याला उत्तर देताना हे म्हणतात की, मंदिर बांधकाम झाल्यानंतर मी येईल. अर्थात अध्यात्मिक व्यासपीठावर देखील लिखित राजकारण पुढारी कसे करतात याचे उत्तम उदाहरण होय. म्हणजे रात्रंदिवस एक होवुन आयोध्येत प्रभु रामचंद्राचं मंदिर अल्पकाळात उभा राहिलं. मंदिराचा गाभारा असेल किंवा सभागृह कळसाचे देखील काम पुर्ण झाले असुन केवळ रंगरंगोटी चाललेली आहे. पण ज्या मंदिर बांधकामावर नेहमीप्रमाणे काँग्रेसवाल्यांनी अर्धवट बांधकाम झाल्याचा आक्षेप घेवुन राजकारण करण्याचा प्रयत्न केला त्याच्यात सुरात सुर पवार मिसळतात म्हणजे या लोकांना रामाचं अस्तित्व मान्य असुन देखील रामाच्या प्रश्नावर राजकारण केल्याशिवाय करमत नाही हे यातुन स्पष्ट होते. सनातन हिंदु धर्मात धार्मिक अनुष्ठान आणि पुण्यकर्म श्रेष्ठ मानल्या जाते, मानवी जीवन जगताना पुण्यकर्माचं संचित पुण्य संकटकाळात कामी येतं असं म्हणतात. मात्र उभ्या आयुष्यात हिंदु धर्माची चेष्टा करून नास्तिक म्हणुन केवळ मताची लाचारी करत राहणाया पवार साहेबांना आज पक्षांतर्गत किंवा राज्य आणि देशाच्या पातळीवर वयाच्या अंतिम टप्पात त्यांच्या मिरिट राजकारणाची झालेली घसरण कदाचित कर्माची फळे म्हणावी लागतील. कारण या मंडळींनी देवाधिकांना कधी जवळ जावुन नमस्कार घातला नाही. तो केवळ इतर वर्ग समुदायाला दाखवण्यासाठी. बाकी काही असलं तरी 84 वय असताना प्रभु रामचंद्र विश्वव्यापी होता असं म्हणत त्यांनी रामाचं अस्तित्व मान्य केलं हे नसे थोडके. खरं तर त्यांना मंदिर बांधकामाबाबत असलेला संभ्रम याचं उत्तर काँग्रेसवालेच देवु शकतील. कारण प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावरून राज्य आणि देश पातळीवर काँग्रेसवाल्यांनी ज्या प्रकारचे घाणेरडे राजकारण सु डिग्री केले त्यावरून प्रभु रामचंद्राचा वनवास आजही कलियुगात सु डिग्री आहे की काय? असे लक्षात येतं. रावणी प्रवृत्तीचे लोक या साया उपक्रमावर अधुनमधुन गरळ ओकताना दिसतात. खरं तर पवार साहेबांनी निमंत्रणाचा स्विकार करून उद्याच्या 22 ला आयोध्या गाठली असती तर रामभक्तांनी त्यांच्या भुमिकेचे स्वागत केले असतं. पण एकदा वासे फिरले की जळीस्थळी वासे फिरतात. परिणामी सकारात्मक मार्ग शोधता शोधता सापडत नाही. असो. पवारांच्या दृष्टीने ज्यावेळी मंदिर बांधकाम पुर्ण होईल त्यानंतर स्वतः जाणार असतील तर आपण वाट पहात राहु. आभारी यासाठी की तुम्ही प्रभु रामचंद्राचं अस्तित्व मान्य केलं हे नसे थोडके.

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424

आधुनिक केसरी

सध्या पालेभाज्या खूप छान ताज्या येत आहेत. त्यातल्या त्यात मेथी ही सर्वांनचीच खूप लाडकी भाजी. तिचा स्वाद पाहूनच किती खाऊ असे होते. भाजी विविध प्रकारांनी बनवली जातेच पण तिच्यापासून आणखीही खूप पदार्थ बनवतात. सर्व एकापेक्षा एक सुरेख बनतात. चला तर मग, आज आपण मेथीची लच्छेदार मठरी बनवू .

**साहित्य :** 2 वाट्या निवडून स्वच्छ केलेली धुवून घेतलेली मेथी , तूप , 1 चमचा तिखट,अर्धा चमचा हळद ,पाव चमचा हिंग , 2 चमचे तीळ , 1 चमचा धने.. जिरेपूड , दीड वाटी कणिक ,अर्धी वाटी बारीक रवा , 3 चमचे कॉर्न फ्लोअर, चवी नुसार मिठ, तळण्यासाठी तेल.

**कृती :** प्रथम सर्व देठे व्यवस्थित काढून स्वच्छ केलेली मेथी घ्यावी .एका कढईत 1 चमचा तूप घालून त्यावर ही मेथी छान कोरडी होईपर्यंत परतून घ्यावी . आता एका मोठ्या बाऊल मध्ये कणिक , रवा घेऊन त्यात हळद ,हिंग ,तिखट ,मिठ, ओवा ,धनेजिरे पावडर , घालून त्यात 2 चमचे तेलाचे किंवा तुपाचे मोहन घालावे .मग मेथी घालून छान मिक्स करून पाणी घालून पुरीच्या पिठाप्रमाणे मळून 15 मिनिटे घट्ट झाकून ठेवावे .म्हणजे रवा फुगून पीठ मठरी करण्यास मस्त तयार होईल . देठे पूर्ण काढून टाकुन परतल्यामुळे तिचा कडवटपणा पूर्ण जातो .

मधल्या वेळात एका बाऊलमध्ये कॉर्नफ्लोअर घेऊन त्यात तूप घालून भरपूर अगदी हलके होईपर्यंत फेटावे .साटा बनवून ठेवावा .

15 मिनिटांनंतर पीठ पुन्हा तेलाचा हात लावून व्यवस्थित मळून घ्यावे व त्याचे सारखे 3 भाग करावेत .प्रत्येक गोळ्याच्या पातळ पोळ्या लाटाव्यात . मग प्रत्येक पोळीला साटा लावून त्यावर थोडेसे पीठ भुरभूरावे व त्यावर दुसरी पोळी ठेवून त्याला साटा लावून पुन्हा पीठ भुरभुरून त्यावर तिसरी पोळी ठेवून पुन्हा तसेंच करावे .मग त्याचा सावकाश रोल बनवावा घट्ट गुंडाळी करून त्याचे सुरीने काप करावेत. आता एकेक काप घेऊन त्याला गोल चपटा भाग वरती ठेवून हाताने हलकेच दाबावा व नंतर हलकेच लाटून ठेवावेत. सर्व रोल लाटून तयार झाले की मग कढईत तेल छान गरम करून गॅस बारीक करून मंद आचे

वर खुसखुशीत होईपर्यंत मस्त तळून मठ्या बनवाव्यात. तेल व्यवस्थित निथळून चाळणीत काढाव्यात. नंतर सर्व्हिंग डिश मध्ये काढून खाण्यास द्याव्यात.

**वैशिष्टय :** या मठ्या गरम किंवा थंड आवडी प्रमाणे खाव्यात .कशाही खाल्ल्या तरी सुरेखच लागतात. खमंग, खुसखुशीत आणि मेथीच्या अप्रतिम स्वादामुळे चवदार अशी ही मठरी भरपूर दिवस छान टिकते .त्यामुळे प्रवासात नेण्यासाठी , कोणाकडे देण्यासाठी उत्तम असा खाद्यपदार्थ आहे .ओवा व भरपूर तिळामुळे जास्तच खमंग व टेस्टी लागतात.



# सरकारकडून शेतकरी, शेतमजुरांत भांडणे लावण्याचे काम

## राजू शेट्टी : आत्मक्लेश परिवर्तन यात्रेत हजारो शेतकरी, मंजूर, महिला सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** शेतकरी आणि शेतमजुराचं नातं हे गाय आणि वासरासारख आहे. यामध्ये गाय हा शेतकरी आहे तर वासरू म्हणजे शेतमजूर आहे गाईची तब्येत सुदृढ असली तर ती वासरासाठी जास्त दूध देते, तसेच शेतकरी हा सक्षम असला.. तर तो त्याचा मजुराला परतावा जास्त देतो. ह्या संत्रा उत्पादक शेतकऱ्याला तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्याला जास्त भाव मिळतो म्हणून त्या परिसरातील मजुराला तो सहाशे ते सातशे रुपये मजुरी देऊ शकतो, परंतु सोयाबीन कापूसपट्ट्यातील शेतकऱ्याला नगण्य बाजार भाव मिळतो,त्यामुळे तो मजुराला कमी रोजनदारी देतो. सन २०००साली सोयाबीनचे भाव प्रतिक्विंटल ४०००/-रु. होते, आता पंचवीस वर्षाने फक्त त्यात पाचशे रुपयांची वाढ झाली.

गाय आणि वासरू सुखाने जगावं अशी केंद्र आणि राज्य शासनाची इच्छाच नाही ,म्हणून हे सरकार गाय आणि वासरामध्ये भांडण लावण्याचे एकमेव काम करीत आहे. गायीचा प्रश्न सुटला तरच वासराचा प्रश्न सुटेल म्हणून शेतकरी, शेतमजुरांचा प्रश्न सुटण्यासाठी गोपीनाथ मुंडे ऊस कामगार कल्याण मंडळाच्या धर्तीवर शेतमजूर कल्याण मंडळाची शासनाने स्थापना करावी आणि शेतकऱ्याला पेन्शन द्यावी", अशी मागणी



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजु शेट्टी यांनी केली. ते दिनांक १९ जानेवारी रोजी जळगाव जामोद येथे आयोजित आत्मक्लेष यात्रेच्या समारोप प्रसंगी आयोजित संवाद मिळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. गेल्या तीन जानेवारीपासून प्रशांत डेक्कर यांच्या नेतृत्वात निघालेल्या आत्मक्लेष पायी यात्रेचा समारोप आज दिनांक १९ जानेवारी रोजी उपविभागीय कार्यालयासमोर झाला उपस्थित जनदत्त समुदायासमोर ते बोलत होते.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा विदर्भ प्रदेशाध्यक्ष प्रशांत डेक्कर यांच्या नेतृत्वात आयोजन करण्यात आले होते. शेतकरी शेतमजुरांसमोर बोलताना राजू शेट्टी पुढे म्हणाले की" आज देशामध्ये आपण सरकारला काही मदत मागतो म्हणजे भिक मागतो असं होत नाही. मागतो तो आपला अधिकार आहे. आपण भिकारी नाही. सरकार जवळ पैसा गोळा होतो त्यातील ६०% कर हा ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर भरतो. देशांमध्ये दरमहा एक लाख सत्तर हजार कोटी रुपये जीएसटी च्या माध्यमातून गोळा होतात. त्यातील 60 टक्के रक्कम म्हणजे सुमारे १००० कोटी रुपये ही ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर कर रूपाने भरतात. मोठमोठे उद्योजक कच्चामालापासून पक्का माल तयार करणारे, प्रक्रिया कारखानदार, व्यापारी यांना काही प्रमाणात तरी जीएसटीचा परतावा मिळतो, परंतु शेतकरी, शेतमजुराला जीएसटीचा कसलाही परतावा मिळत नाही. आपण पुस्तक,वही, ब्रेड आणि इतर वस्तूच्या माध्यमातून १२ ते२८% टक्के जीएसटी सरकारच्या खात्यात जमा करतो.

सामान्य माणसाकडून प्रत्येक माणसाकडून दरमहा किमान दोन हजार रुपये तरी कर शासनाच्या नरड्यात आपण घालतो .परंतु त्याचा कवडीचाही परतावा आपल्याला मिळत नाही.ही बाप लोकशाहीला मारक असल्याचेही ते म्हणाले. स्वाभिमानी युवा विदर्भ प्रदेशाध्यक्ष प्रशांत डीक्कर यांनी केंद्र आणि राज्य शासनावर आसूड ओढले, शेकडो कोटी रुपयांच्या जमिनी खरडून गेल्या, गोरगरिबांची घरे उध्वस्त झाली, गुरेढोरे वाहून गेली. या सर्वांना मदत मिळाली नाही,परंतु स्वतःच्या स्वार्थासाठी ह्या विभागाचे आमदार डॉक्टर संजय कुटे यांनी ज्या शासकीय इमारती तुटल्या, ज्या स्मशानभूमी वाहून गेल्या, रस्ते नाले वाहून गेले, त्यासाठी कोट्यावधी रुपये आणले. शासकीय कामासाठी कोट्यावधी रुपये आणणाऱ्या ह्या शेतकरी द्वेषी आमदाराने मात्र शेतकरी शेतमजुरांसाठी काहीही केले नाही. त्यामुळे येणाऱ्या दिवसात त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना धडा शिकवावा असे आवाहन यावेळी प्रशांत डीक्कर यांनी केले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मुलुख मैदानी तोफ गजानन बंगाळे पाटील, कोल्हापूरचे जिल्हाध्यक्ष रवींद्र इंगळे, अमर कदम, तसेच प्रकाश तात्या बालवडकर यांनी सुद्धा राज्य आणि केंद्र सरकार विरोधात आपले प्रखर मत व्यक्त केले. ह्यावेळी दोन्ही तालुक्यातून महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.



# निरेत 'त्या' बेघर झालेल्या लोकांनी जगायचं कसं ?

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** निरा ता.पुरंदर येथील बेघर झालेल्या "त्या" विविध समाज घटकातील लोकांना ज्या आधाराची गरज आहे.तो आधार बेघर झाल्यापासून अद्याप ही शासन प्रशासनाकडून मिळत नसल्याने आता आम्ही जगायचं कसं असे ह्या घटकांकडून म्हटले जाऊ लागले आहे.रेल्वे प्रशासनाने रेल्वे परिसरात राहत असलेल्या विविध समाज घटकातील लोकांची घरे पाडली होती.ही घरे रेल्वेच्या हद्दीत बांधली गेल्याचे कारण रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आले होते.तसेच घरे खाली करण्याच्या सूचना देखील नोटिसा द्वारे देण्यात आल्या होत्या. त्यानुसार रेल्वे प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली.परंतू कारवाई नंतर आज तागायत त्यांच्या राहण्याचा प्रश्न सोडविता न आल्याने समाज घटकातील बेघर झालेल्या व घरांपासून वंचित राहिलेल्या घटकांनी इथल्या ग्राम प्रशासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.चार भिंतीतील संसार रस्त्यावर आला. भाड्याच्या खोल्यांमध्ये राहण्यासाठी परवडत नाही. सांगा बेघर झालेल्या आमच्या लोकांनी जगायचं कसं? असा प्रश्न डोंबारी, गारुडी, काडीवाले वंचित समाज घटक विचारू लागले आहेत.घरे पाडली जातात.परंतु त्यांना बांधून देण्यासाठी कोणतीही मानसिकता दाखविली जात नसल्याने ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, सदस्य प्रमोद काकडे,सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे, आरपीआय (आंबेडकर) पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे,संतोष मोहिते आदींनी बेघरांच्या व्यथा व्यक्त करत मोठा रोष व्यक्त केला आहे.

ग्रामपंचायतीचे सदस्य अनिल चव्हाण म्हणाले की,ह्या कुटूंबांना कोरोना पासून एकतर कामधंदा रोजगार नाही. खोल्या पाडल्यानंतर त्यांनी राहण्यासाठी भाडोत्री खोल्या घेणं. दोन तीन हजाराचं भाडं आहे.ह्यांनी स्वतःचा प्रपंच चालवायचा की त्यांनी भाड्याने खोल्या घेत भाडं द्यायचं? काही लोकं हा समाज थोडासा मागास असल्याने खोल्या देण्यास ही टाळाटाळ करत आहेत.सर्वच गोष्टींना सामोरे जावे लागत आहे. या सर्वांना आधार देणं आपल्या सर्वांचे काम आहे.आम्हांला कुठे तरी जागा द्या,आम्हाला भाडं परवडत नाही हे रडगाणं ह्याचं खरच आहे.ग्रामपंचायती मध्ये आम्ही अनेक वेळा यांचे पुनर्वसन व्हावे,शासकीय घरकुल योजनेतून घरे व्हावेत म्हणून ग्रामपंचायतीमध्ये ठराव घेतले.परंतु ग्रामपंचायत टाळाटाळ करत आहे.आता ग्रामपंचायत समोर उपोषण करण्या शिवाय पर्याय नाही.ग्रामपंचायत सदस्य प्रमोद काकडे यांनी म्हटले की,रेल्वे प्रशासन कुठल्याही सातबाऱ्यावर नाही.रेल्वे पड त्यांची ३४ गटामध्ये नाही. साधारण १९६७ मध्ये मीटर गेजचं ब्रॉडगेज झालं.त्या काळात ३४ अ गटा मधील साधारण ३ गुंठे क्षेत्र हे रेल्वेने प्राप्त केलेले आहे.हा पुर्वीचा जो जुना गट आहे. तो रेल्वेच्या लगत ३४ गटातील ३ नंबरचा गट आहे.रेल्वेच्या गाव नकाशामध्ये रेल्वेची हद्द आणि आता रेल्वेची व्यापलेली जागा दाखवत आहे. रेल्वेने जी एका नवनियुक्त एजन्सीला जे पुरावे देऊन जी जागा ताब्यात घेतलेली आहे ते आम्हांला मान्य नाही.रेल्वेने ह्या जागा रेकॉर्डली ताब्यात मिळविल्या आहेत तर रेल्वे सातबाऱ्यावर आली का नाही? तीस वर्ष ही लोकं राहत होती तर त्यावेळी ही रेल्वे आली नाही? जर तुम्हाला हिकडे डेव्हलपमेंटच करायचं नव्हतं पश्चिमेलाच डेव्हलपमेंट करायचं होतं.तर ह्या गरिबांची घरं काढली का? श्रीमंताला न्याय कुणीही देतं,गरिबांना न्याय देण्यासाठी गावातील सर्वानीच एकत्रित आलं पाहिजे.सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांनी भावना व्यक्त करताना म्हटले की ज्या ज्या वेळी ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभा झाल्या.त्या त्या वेळी बेघर झालेल्या लोकांचा मुद्दा मांडला. त्यांना गावांत कुठेतरी जागा दिली पाहिजे.

संविधानाने प्रत्येकाला जगण्याचा आणि राहण्याचा अधिकार दिलेला आहे.जरी केंद्र सरकारने ह्या जागा ताब्यात घेतल्या असल्या तरी गावच्या नकाशा मध्ये हे आमचं क्षेत्र आहे.गेल्या वेळी कागदपत्रांचा आधार नसल्यामुळे रेल्वेने आमच्यावर दादागिरी केली आणि या गोर गरीब जनतेला उठवलं.परंतु जो आपल्याकडे आरसा आहे. त्याआधारे आम्ही त्यांच्या केंद्रालाच नाहीतर कुणाच्याच बापाला आता भिणार नाही.परंतु ही वस्ती इथेच बसविणार.एवढाच शब्द देतो. ह्यांना सुद्धा जगण्याचा अधिकार आहे.

आरपीआय (आंबेडकर) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे म्हणाले की,आमचं मतदान घेतलं जातं तर आम्हाला राहण्याचा अधिकार सुद्धा मिळवून दिला पाहिजे.आमची राहायची सोय केली पाहिजे.६ करोड ४५ लाख रुपयाचं या गरीब माणसाचं नुकसान झालेलं आहे.आरपीआई स्टाईल ने आम्ही कायम ह्यांच्या बरोबर आहे.आम्ही या गोर गरीबांच्या बाजूने आहे.घरे उद्धवस्त झालेल्या लोकांना शेड उभारून द्यावे. ग्रामपंचायतीने सर्व खर्च घ्यावा.शेड बांधून द्यावे.यावेळी बेघर झालेले समाज बांधव उपस्थित होते.

# मकर संक्रांतीचा सण गेला व संदेशही आले, मात्र अद्याप लाभार्थींना रेशन नाही मिळाले

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील रेशनिंग दुकानदार आपल्या विविध मागण्या साठी एक तारखेपासून संपावर गेले होते त्यांनी यादरम्यान आंदोलन करुन निवेदन दिले मात्र त्यासंदर्भात वरिष्ठस्तरी काय तोडगा निघला की आश्वासन पुर्ती झाली पण प्रशासनाकडून रेशनिंग कार्ड लाभार्थींना रेशनमाल पोहोचला असा संदेश प्राप्त झाला प्रत्यक्षात मात्र रेशन दुकानावर माल उपलब्ध मिळाले नाही गोरगरीब दुकानावर हेलपाटे लावत असल्याचे चित्र आहे.

रेशनिंग दुकानदारांनी आपल्या विविध मागण्या साठी एक तारखे पासून बेमुदत संप पुकारला होता.१५-१६दिवस संप सुरु होता. वरिष्ठस्तरी प्रशासन व सरकार व रेशनिंग दुकानदार पदाधिकारी यांच्यांत काय ठरलं नाही माहीत.यात मकरसंक्रांतीचा सण येवून गेला तर प्रशासनाकडून रेशनिंग कार्ड लाभार्थींना रेशनमाल साठी संदेश प्राप्त झाले की रेशनिंग दुकानांवर रेशन पोहोचले परंतु प्रत्यक्षात रेशनमाल अद्याप पोहोचले नाही गोरगरीब , अपंग, दारिद्रय रेषेखालील कुटुंब, प्राधान्य कुटुंब रेशनिंग लाभार्थी रेशनिंग दुकानदाराकडे हेलपाटे लावत आहे मात्र तेथे दुकानावर मालच पोहचला नसल्याने गोरगरीब कार्ड लाभार्थ्यात नाराजी पसरली आहे.त्यांच्या खाण्यापिण्याचा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आहे.वरिष्ठांनी यांकडे जातीने लक्ष घालून गोरगरीबांचा पोटाचा प्रश्न मार्गी लावावे असी मागणी रेशनिंग कार्ड लाभार्थी नागरिकांतून होत आहे.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# महायुती सरकारची राज्यात गेलेली पत सुधारण्यासाठी मोदींचे दौरे

## काँग्रेसचे विभागीय मेळावे कार्यकर्त्यांना बळ देणारे ठरतील : वडेट्टीवार यांनी व्यक्त केला विश्वास

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** महायुती सरकार राज्यात सर्व आघाड्यांवर अपयशी झाले आहे.त्यामुळे गेलेली पत सुधारण्यासाठी पंतप्रधान मोदींना वारंवार राज्यात दौरा करावा लागत असल्याची टीका विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे. वडेट्टीवार यांनी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात महायुती सरकारची कामगिरी वादग्रस्त, भ्रष्टाचाराने बरबटलेली व स्वहितासाठी सुरू आहे. सत्ताधाऱ्यांचे लक्ष राज्याच्या विकासाकडे नाही तर स्वतःचे खिसे भरण्याकडे आहे. म्हणूनच सरकारची गेलेली पत सुधारण्यासाठी मोदींना वारंवार राज्यात दौरा करावा लागत आहे.

दुर्गम गडचिरोलीत काँग्रेसची विभागीय बैठक घेण्यात यावी असा विचार मांडला त्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली त्यानुसार गडचिरोलीत वीस तारखेला विभागीय मेळावा होत आहे. हा मेळावा कार्यकर्त्यांना बळ देणारा ठरेल असा विश्वास वडेट्टीवार यांनी यावेळी व्यक्त केला. १६ वर्षाच्या आतील कोणत्याही विद्यार्थ्याला यापुढे कोचिंग क्लासेसमध्ये जाता येणार नाही. या मुद्यावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात आणि देशात शिक्षकांच्या अनेक जागा रिक्त आहेत. त्या भरल्या जात नाहीत त्यामुळे आधीच अनेकजण बेरोजगार झाले आहेत. नोकरीच्या प्रतीक्षेत असलेले बेरोजगार कोचिंग क्लासेस घेऊन आपलं कुटुंब चालवतात मात्र या निर्णयामुळे बेरोजगारांना रस्त्यावर भिक मागत ठेवण्याचा हेतू दिसतो. हे सरकार बेरोजगारांना भिकेला लावत असून यातून केंद्राची शिक्षणाप्रती अनास्था दिसून येते असे वडेट्टीवार म्हणाले.

# श्रीराम मंदिरधाम कमानीचे सोमवारी उद्घाटन; धार्मिक वैभवात भर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील आग्रारोडला आता एक नवीन धार्मिक ओळख मिळणार आहे. अग्रवंशी ग्रुप आणि मंडोरे प्रतिष्ठान संस्थांच्या माध्यमातून सुमारे पावणेदोनशे वर्षे जुन्या श्रीराम मंदिरापासून अगदी जवळ असलेल्या गोपाल टीनजीक श्रीराम मंदिर धामची भव्य कमान उभारली गेली आहे. कमानीची शुक्रवारी दि. 19 जानेवारीला भाजपाचे विधानसभा क्षेत्रप्रमुख अनुप अग्रवाल यांनी पाहणी करून पत्रकारांना माहिती दिली. कमानीमुळे धुळ्याच्या वैभवात भर पडेल. पाच संतांच्या हस्ते 22 जानेवारीला सायंकाळी पाचला कमानीचे उद्घाटन होईल. आग्रारोडवरील सुमारे पावणेदोनशे वर्षे पुरातन श्रीराम मंदिर आहे. मंदिरात प्रभू श्रीराम, सीता माता आणि लक्ष्मणच्या मूर्ती विराजमान आहेत. प्रभू श्रीरामाच्या मांडीवर माता सीता बैठावस्थेत असलेले हे देशातील एकमेव मंदिर आहे. भारतात रेल्वेसेवा सुरू होऊन काही वर्षे झालेली असताना रेल्वेने या मंदिरासाठी दगड आणले होते. नंतर भुसावळ येथून ट्रकने धुळ्यापर्यंत हे दगड आणण्यात आले. प्रभू श्रीराम मंदिराची महती संपूर्ण खानदेशाला आहे. मंदिरानजीकच श्रीराम मंदिर धाम नावाची कमान उभारली गेल्याबद्दल मंदिराचे अध्यक्ष अभय नाशिककर यांनी चेतन मंडोरे यांच्या मंडोरे प्रतिष्ठान आणि अग्रवंशी ग्रुपचे पत्रकार परिषदेत आभार मानले. अनुप अग्रवाल म्हणाले, की मंडोरे प्रतिष्ठान आणि अग्रवंशी ग्रुपच्या सहकार्याने कमानीमुळे शहराच्या सौदर्यांत भर पडली आहे. महापालिकेसह संबंधित विभागांची परवानगी घेऊन ही कमान उभय संस्थांनी स्वखर्चाने उभारली आहे. कमानीचे उद्घाटन अयोध्येतील रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेच्या दिवशी 22 जानेवारीला सायंकाळी 5 वाजता पाच संतांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अग्रवाल यांनी केले. मंडोरे प्रतिष्ठानचे प्रमुख चेतन मंडोरे, सुनील अग्रवाल, पवन अग्रवाल, श्याम अग्रवाल, निनाद पाटील, नगरसेवक विजय जाधव, प्रशांत बागूल, पंकज मुंदडा, अतुल पेडवाल, विनोद पटवारी, पंकज अग्रवाल, श्रीकांत अग्रवाल, बाळू गुरुजी आदी उपस्थित होते.



# जिल्हा सामान्य रुग्णालयातील अव्यवस्थेवर आ. जोरगेवारांचा संताप

## शासकिय वैद्यकीय महाविद्यालय येथे आढावा बैठक : अधिकाऱ्यांना दिले निर्देश

आधुनिक केसरी न्यूज




**चंद्रपूर :** शासकीय वैदयकीय महाविद्यालय येथील अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. सोनोग्राफी करणे आवश्यक असलेल्या रुग्णांना सोनोग्राफीसाठी आठ ते पंधरा दिवस ताटकाळत ठेवणे योग्य नाही. हा गंभिर असुन हे प्रकार खपवून घेतले जाणार नाही. रुग्णांची सोनोग्राफी वेळीच करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा असे निर्देश आमदार किशोर जोरगेवार यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता मिलिंद कांबळे यांना दिले आहे.

शुक्रवारी शासकीय वैद्यकीय रुग्णालय येथे आमदार किशोर जोरगेवार यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या प्रसंगी येथील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली असुन यावर तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी संबधित अधिका-यांना दिले आहे. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता मिलींद कांबळे, विभाग प्रमुख डॉ. प्रशांत उईके, अतिरिक्त निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. जिवने, समाजसेवा अधिक्षक उमेश आडे, यंग चांदा ब्रिगेडच्या बंगाली समाज महिला प्रमुख सविता दंढारे, आशा देशमुख, यंग चांदा ब्रिगेडच्या आरोग्य सेविका, वैशाली मेश्राम वंदना हजारे, एमआयएमचे अमान अहमद आदींची उपस्थिती होती.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार घेण्यासाठी चंद्रपूर जिल्हासह लगतच्या जिल्ह्यातील रुग्ण येत असतात. त्यामुळे आरोग्य व्यवस्थेची मोठी जबाबदारी या रुग्णालयावर आहे. आपण अतिशय जबाबदारीच्या ठिकाणी आहात त्यामुळे आपण उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशा सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी अधिका-यांना केल्या आहे. येणा-या रुग्णांशी रुग्णालयातील कर्मचा-यांची वागणूक योग्य नसल्याचे प्रकार वारंवार समोर येत आहे. आपल्यावरील कामाच्या ताणाची जाण आम्हाला आहे. मात्र आपण रुग्णांशी सौजण्यपुर्ण वागल पाहिजे, रुग्णालयात स्वच्छतेची विशेष काळजी आपण घेतली पाहीजे असे ते यावेळी म्हणाले. नियमीत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था येथे असली पाहिजे, वार्डातील लाईट व पंखे बंद असल्यास ते तात्काळ दुरुस्त करावे, रुग्णांचा येथे परिपुर्ण उपचार करावा, वैद्यकीय उपकरणे नादुरुस्त अवस्थेत असतील तर त्याची देखभाल दुरुस्ती तत्काळ करावी, उपकरणे बंद आहेत म्हणून रुग्णांना जाणिवपूर्वक बाहेरुन तपासणी करण्यास बाध्य करण्याचे प्रकार खपविले जाणार नाही असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी बैठकीत अधिकार्यांना सांगितले आहे.

डॉक्टर वेळेत कर्तव्यावर हजर होत नाही. रात्रपाळीत डॉक्टर उपस्थित नसते अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहे. अशा प्रकाराला आळा घालण्यात यावा, रुग्णालयाच्या बाहेरुन औषधे विकत आणायला लावण्याचे प्रकार बंद करा, रुग्णालयात अनेक उपकरणांची कमी आहे. या संदर्भात तत्काळ वैद्यकीय शिक्षण विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा, रुग्णांना रक्त त्वरित उपलब्ध होईल यासाठी उपाययोजना करण्यात यावी, रक्तदात्यांच्या नावाची यादी येथे लावण्यात यावी अशा अनेक सुचना सदर बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. या बैठकीला संबधित डॉक्टरासह यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांची उपस्थिती होती.

# हिट अँड रन कायदा बंद झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही : संजय हाळनोर

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** केंद्र सरकारने नव्याने देशभरात लागू केलेला हिट अँड रन हा कायदा वाहन चालकांसाठी अन्यायकारक असून वाहन चालवने ही एक कला आहे. त्या व्यक्तीवर त्याचा परिवार अवलंबून असतो थोड्याशा तुटपुंज्या मानधनावर चालकलोकं काम करतात चुकन अपघात झाल्यास त्या व्यक्तीने सात लाख रुपये दंड कसा भरायचा आणि त्याच व्यक्तीला दहा वर्षांचा कारावास हा हुकूमशाही कायदा आम्हाला मान्य नाही. सरकारने हा कायदा त्वरीत बंद करावा अन्यथा जय संघर्ष संघटना स्वस्थ बसणार नाही. असे प्रतिपादन जय संघर्ष संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय हाळनोर यांनी जांभोरा येथे संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष संजय हाळनोर. हे होते, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक काकडे रोडलाईन्सचे संचालक रामदास काकडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून बबन खरात सरपंच जांभोरा रमेश खरात तंटामुक्त अध्यक्ष जांभोरा हे होते. प्रमुख अतिथी संस्थापक उपाध्यक्ष संतोष काळवणे, सोमनाथ गायकवाड, भाऊसाहेब येळवे, संतोष गडवे ,अब्बाशभाईस खान, लक्ष्मण शेंडगे,रवींद्र सुरडकर ,आकाश इंगळे, आयुबभाई, बापू गाडेकर, नितीन तुपे, नविन ठोंबरे, ममतेश सरकटे, मंगेश सकट हे होते. यावेळी प्रास्ताविक करताना बबन खरात सरपंच यांनी चालक हा दळणवळणचा मुख्य कणा आहे. सरकारने परवाना धारक चालकांच्या परिवाराला मदतीचा हात दिला पाहिजे. असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रमुख मार्गदर्शक रामदास काकडे हे मार्गदर्शन करताना म्हणाले चालकांनी संघटीत व्हायला हवे, संघटन नसल्याने चालक हा आयुष्यभर नोकर म्हणून करतो, आपण काम करताना कायद्याच्या चौकटीत राहून काम केले पाहिजे, नशा पान करु नका तुमचा परिवार तुमची वाट पाहत असतो आपण हे विसरता कामा नये. असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात हाळनोर पुढे बोलताना म्हणाले सरकार सर्व सामान्यांसोबत दुजाभाव करत आहे. महागड्या वाहनांना समोरील वाहनांसाठी त्रासदायक ठरणारे जास्तीचे लाईटस आहेत, त्यामुळे समोरच्या वाहन चालक अडथळा निर्माण होतो, मात्र हे सरकार त्यांच्यावर कुठलीच कारवाई करत नाही मात्र सर्वसामान्य व्यक्तीने गाडीला जास्तीचे काही लावल्यास कायद्याच्या धमक्या दिल्या जातात. अपघातावेळी अँबूलंस वेळेवर पोहचत नाही. कितीतरी लोकांचे प्राण केवळ अँबूलंसच्या हलगर्जीपणा मुळे गेले आहेत. सरकारने याकडे लक्ष करीत नाही. जो पर्यंत हिट अँड रन हा कायदा बंद होत नाही तोपर्यंत मी कोणत्याही राजकीय पक्षाच्या सभेसाठी, प्रचारासाठी, किंवा राजकीय पक्षाच्या कोणत्याही कामासाठी मी किंवा माझे वाहन जाणार नाही. अशी उपस्थित असलेल्या चालक मालक यांना सामुहिक शपथ श्री हाळनोर यांनी यावेळी दिली. तालुकाध्यक्ष संदीप काकडे, उपाध्यक्ष उत्तम शेळके, सचिव योगेश शिंदे, सहसचिव बाळासाहेब वायाळ, कार्याध्यक्ष विजय खरात, प्रसिद्धी प्रमुख रामप्रसाद काकडे , संपर्क प्रमुख कैलास खरात, सल्लागार अनिल वाघमारे , खजिनदार गजानन वाघमारे, सदस्य संदेश चव्हाण, ज्ञानेश्वर जायभाये.



# आ. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील मौजे आळंद येथे आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या शुभहस्ते आठ कोटी आठ्ठवण लक्ष रुपयाच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन लोकार्पण संपन्न झाले. या कामात मोजे आळंद ते शेवता या रस्त्याचे डांबरीकरण करणे, आश्रमात मंदिरास भक्त निवास करणे, गावांतर्गत सिमेंट रस्ता व इतर विविध विकास कामाचा शुभारंभ तर मुस्लिम वस्तीतील सिमेंट रस्ता, तापेश्वर मंदिरास जाणारा सिमेंट रस्ता, पशुवैद्यकीय दवाखाना, तलाठी मंडळ अधिकारी भवन, कचरा व्यवस्थापनासाठी घंटागाडी अशा पूर्ण झालेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण आळंद येथे आमदार हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या वेळी आमदार हरिभाऊ बागडे यांचा धनगर



समाजाच्या वतीने हातावर विणलेली घोंगडी भेट देत सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती अनुराधाताई चव्हाण भाजप तालुका अध्यक्ष सांडू पाटील जाधव, नुकतेच उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झालेले अमरावती येथील प्रमोद लक्ष्मण खंबाट, पंचायत समिती माजी सभापती सर्जेराव पाटील मेटे, सोमनाथ पाटील कोलते, माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण पाटील तायडे, जातव्याचे सरपंच रवींद्र बनकर, तानाजी पाटील पवार, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे तालुका अध्यक्ष कलीम पटेल, भाजपा युवा मोर्चा माजी तालुका अध्यक्ष विकास पाटील गायकवाड,हौसाताई काटकर, आळंद चे सरपंच कैलास गायके, उपसरपंच रामेश्वर चोपडे, फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जगन दाढे, माजी सरपंच सुनील तायडे, उमरावतीचे उपसरपंच हणमंत खंबाट, नवनाथ खिल्लारे, योगेश खिल्लारे, सचिन तायडे, पंढरीनाथ देवरे, कौतिक शिंदे, यांच्या सह मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ व पंचक्रोशीतील मंडळी उपस्थित होती.

# ग्रामीण भागात बालविवाह रोखणे आवश्यक

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** येथील कला व विज्ञान महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यामाने सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या आजच्या तिसऱ्या दिवशी गणेशपूर येथे सकाळच्या श्रमदान सत्रात गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळेस विद्यार्थ्यांनी झाडू, टोपले, पावडे, हातात घेऊन गावातील समाज मंदिर परिसर, गणेश मंदिर परिसर तसेच गावातील मोकळ्या जागेत प्रत्यक्ष स्वच्छतेमध्ये भाग घेतला तसेच गावांमधून रॅली काढून बालविवाह रोखण्याची आवाहन गावकऱ्यांना विविध घोषणा देऊन केले.

त्यानंतर दुपारच्या बौद्धिक सतरामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. योगेश भाले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आजही ग्रामीण भागामध्ये बालविवाहाचे प्रमाण जास्त दिसून येते ते रोखण्याचे काम विद्यार्थ्यांनी आपआपल्या गावामध्ये करणे आवश्यक आहे.

यात्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या गृहशास्त्र विभागप्रमुख प्राध्यापिका डॉ. वंदना बनकर ह्या होत्या त्यांनी आपला अध्यक्षीय समारोप करताना म्हणाल्या की, ज्याप्रमाणे बालविवाह रोखणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुलींची भ्रूणहत्याही रोखणे आवश्यक आहे. या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी बालविवाह या विषयावर पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत 15 विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. योगेश भाले होते. डॉ. वंदना बनकर यांनी काम केले. आजच्या कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन मोरया ग्रुपकडे होते. सूत्रसंचालन कु.काजल कवाळ यांनी केले तर आभार प्रीतम अंभोरे यांनी मानले. यात्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय मगर, डॉ. प्रतिभा आघार्डे, डॉ. संजय वाकळे तसेच महाविद्यालयातील डॉ. उमाकांत गायकवाड डॉ. विक्रमसिंह पवार , डॉ. सुनील काळे, डॉ. यशवंत गाढे, डॉ. रामेश्वर राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# शांताबाई नखाते विद्यालयात रस्ता सुरक्षा विषयक शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर** : दि.19 रोजी शांताबाई नखाते विद्यालय, देवगाव फाटा येथे रस्ता सुरक्षा विषयी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे उप मुख्याध्यापक विश्वनाथ राऊत हे होते तर प्रमुख मार्गदर्शक विनायकराव जाधव हामार्ग सा.पोलीसनिरीकक्षक जिंतूर, सा.पो.उपनिरीक्षक श्री मदन मेहते, जमादार सय्यद शाकेर, गजानन मोरे हे होते. यावेळी श्रीविनायकराव जाधव व सय्यद शाकेर यांनी विद्यार्थ्यांना विविध वाहतुकीच्या नियमां बद्दल अवगत केले. विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा विषयक जागृती निर्माण केली आणि रस्ता सुरक्षिततेची शपथ विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री मुक्तीराम वाव्हळे यांनी केले, तर सूत्रसंचालन शिवप्रसाद आहेर व आभार प्रदर्शन बालाजी पडोळे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

# शेतकरी नेते तुपकर यांची अटक बेकायदेशीर

## तुपकर यांच्या अटकेचे जिल्ह्यातील पडसाद !

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्याचे नेते रविकांत तुपकर कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा त्यांच्या मालाला भाव मिळावा म्हणून त्यांनी मलकापूर रेल्वे स्थानकावर रेल्वे रोको चा इशारा दिला होता ,त्यानंतर राज्य सरकारची झोप उडाली त्याचबरोबर पोलीस सतर्क होऊन तुपकर यांना पोलिसांनी दि, १८ जानेवारी रोजी राजुर घाटामध्ये मलकापूर येथे जात असताना अटक केली ,त्यानंतर तुपकर यांनी पोलिसांना समजावून सांगितली की मी अगोदर कुठल्याही गुन्हा केलं नाही तरी तुम्ही मला बेकायदेशीर रित्या अटक करत आहेत,परंतु तुपकर यांचे म्हणणे पोलिसांनी ऐकले नाही,पोलिसांनी त्यांना अगोदर बुलढाणा येथे आणले त्यानंतर त्यांना मेहकर येथे वैद्यकीय तपासणीच्या नावाखाली नेण्यात आले ,इथूनच सर्व जिल्ह्यांमध्ये पडसाद उमटायला सुरुवात झाली,रविकांत तुपकर यांना अटक करून मेहकरला कशासाठी नेले यावरून बुलढाणा जिल्ह्यामध्ये उग्र आंदोलन सुरू झाले, उमरद,सिनखेडराजा मोताळा मेहकर जळगाव जामोद अशा विविध तालुक्यांमध्ये आंदोलनाला सुरुवात झाली,

त्यानंतर त्यांच्या पत्नी एडवोकेट शर्वरीताई तुपकर यांच्या नेतृत्वाखाली 300 शेतकऱ्यांचा जमाव मेहकर पोलीस स्टेशन मध्ये आला,व प्रचंड पोलीस स्टेशनमध्ये घोषणाबाजी सुरू झाली रविकांत तुपकर यांना मेहकरला आणण्याचे कारण काय याचे उत्तर पोलिसांनी द्यावे अशी कार्यकर्त्यांची मागणी होती ? कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून परत पोलिसांनी तुपकर यांना बुलढाणा येथील कारागृहात आणले, दि . १९ जानेवारीला तुपकर यांना सकाळी ११ बुलढाणा जिल्हा



व सत्र न्यायालयामध्ये आणण्यात आले,त्यानंतर पोलिसांचे कुठलेही म्हणणे ऐकून न घेता न्यायालयाने रविकांत तुपकर यांना केलेली अटकच बेकायदेशीर ठरवत तुपकर यांना जामीन मंजूर करून त्यांची सुटका केली.

त्यानंतर कार्यकर्त्यांनी कारागृह बाहेर एकच जल्लोष केला, त्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला.

ते म्हणाले की माझ्या सभांना मिळणारा प्रतिसाद ही राज्य सरकारच्या पायाखालची आता वाळू सरकू लागली आहे, शेतकऱ्यांची मुलं ही भगतसिंगाचा अवतार घेऊन नक्कीच या दडपशाही सरकारचा माज उतरेल,

सभांना मिळणारा प्रचंड प्रतिसाद हे अनेकांना बघवत नाही, माझा कुठलाही प्रकारचा गुन्हा नसताना आंदोलन दडपून टाकण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे खोट्या गुन्ह्याखाली अडकवण्याचा प्रयत्न आहे.

कुणाच्या सांगण्यावरून पोलिसांनी मला मेहकरला नेले याचे उत्तर सुद्धा पोलिसांनी द्यावे, असे सुद्धा तुपकर यांनी सांगितले, यानंतरचे आंदोलन हे सरकारची झोप उडवणारे असेल व यानंतरचे आंदोलने सरकारला सांगून नाही तर कधीही होईल असा इशारा सुद्धा तुपकर यांनी सरकारला दिला आहे.



# मकर संक्रांतनिमित्त हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर** : मकर संक्रांत निमित्त छत्रपती संभाजीनगरातील सिडको एन 2 कामगार चौक येथील सौ.सुनिता संजय लताड यांचे निवासस्थानी हळदीकुंकवांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला हळदी कुंकवाला महिला आनंदी वातावरण व दक्षिण भारतीय वेशभुषा साडीत एकत्र येऊन मोठा प्रतिसाद दिला या कार्यक्रमात हळदीकुंकू व सोबत नाश्ता आल्पोपहार कार्यक्रम घेण्यात आला . महिलांसोबत आलेल्या पुरुषांनी देखील आंध्रातील वेशभूषा व सजावट करून काहींनी लुंगी डांस केला.

यात्रसंगी सौ.सुनिता लताड, सौ.सुवर्णा लताड, सौ.वर्षाताई लताड, सौ.वनिताताई लताड सौ.नलिनीताई लताड, सौ.रचनाताई लताड ,सौ.अश्विनी लताड, सौ. दिपाली लताड, सौ. रूपाली पाटणकर, सौ.स्वाती रामपूरकर, सौ. विद्या रामपूरकर सौ.मोनिका बोरुळकर, सौ.अमृता लताड ,आदी महिलांनी या कार्यक्रमात भाग घेतला शेवटी सौ. सुनीता लताड यांनी सर्वांचे आभार मानले.

# सुलतानपूर येथे अक्षता वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** श्रीरामचंद्राची जन्मभूमी अयोध्या येथे २२ जानेवारी रोजी नवीन भव्य मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार आहे. या दिवशी देशभरात दिवाळीसारखा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने रामभक्तांकडून गावोगावी अक्षता वाटप करण्यात येत आहेत. सुलतानपूर येथे श्रीरामचा जयघोष करत घराघरात अक्षता वाटप करण्यात आले. भव्यदिव्य असा हा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे, अयोध्या येथे जोरदार तयारी सुरू आहे. या अनुषंगाने सुलतानपूर येथे अक्षता वाटप करण्यात आले ग्रामस्थांनी सोमवार च्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात केले आहे. ते पुढील प्रमाणे असेल सोमवार पहाटे काकड आरती, भजन गावामध्ये नगर प्रदीक्षणा (दिंडी ) काढण्यात येणार आहे.

दरम्यान जयस्वाल परिवारा यांच्यावतीने २२ जानेवारी रोजी श्री राम मंदिराजवळ महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे, परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन सुलतानपूर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# गंधेश्वर गाव रस्त्यांचे झाले मजबुतीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे गंधेश्वर येथे लोणी -चिकलठाणा कन्नड मुख्य रस्ता रा.मा.२१९ते गंधेश्वर गाव तीन किलोमीटर रस्ता खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम पुर्ण झाल्यानें ग्रामस्थ नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.मुख्यमंत्री सडक योजनेतून १३४.१६ लक्ष रुपयांचे काम यात पुल खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण रस्ता काम नियोजित मंजुर करण्यात आले होते.कामाची सुरुवात वर्ष प्रारंभ ०८/०६/२०२१ व पुर्णत्वाची दि.०७/१२/२०२२ असताना हे आता आता करण्यात आले.या मुख्यमंत्री सडक योजनेला एशियन डेव्हलपमेंट बॅंक व महाराष्ट्र शासन अर्थ साहिय्यीत रस्ता आहे.यास पाच वर्ष देखभाल दुरुस्ती हमीचे करार ही यात आहे.अशात एक वर्ष तर निघून गेले. वर्ष २०२२ ऐवजी वर्ष २०२३ मधे यंत्रणा तथा ठेकेदाराने काम केले आहे.

मात्र मुख्य रस्ता रा मा २१९ ते गंधेश्वर तीन किलोमीटर रस्ता अतिशय नादुरुस्त खराब झाल्याने प्रवासी नागरिक शेतकरी आदिना मोठा त्रास सहन करावे लागत होते.परंतु मुख्यमंत्री सडक योजनेतून तीन किलोमीटर रस्ता काम खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम पुर्ण झाल्यानें ग्रामस्थ व नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. रस्ता चकचकीत चोपडे झाल्याने स्त्यांवरुन अतिशय वेगाने वाहतुक सुरु आहे.

# पॉवर ग्रीडने योग्य मूल्यांकन करून शेतकऱ्यांना मोबदला द्यावा

## आ. अमित झनक यांची आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** वाशिम जिल्ह्यातून पॉवर ग्रीड कंपनीची उच्च दाबाची विद्युत वाहणी गेलेली आहे. सदर कामात रिसोड, मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी बाधीत झालेल्या आहेत. मात्र २०१७ पासून हे प्रकरण प्रलंबीत आहे. त्याअनुषंगाने रिसोडचे आ. अमित झनक यांनी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा यासाठी उपविभागीय अधिकारी वाशिम यांच्या दालनात आढावा बैठक घेतली आहे.

पॉवर ग्रीड ही सरकारची भागीदारी असलेली एक मोठी कंपनी आहे. सदर कंपनीची उच्च दाबाचा विद्युत प्रवाह वाहून नेणारी वाहिनी रिसोड मालेगाव तालुक्यातून गेलेली आहे. या कामासाठी मोठ मोठे टॉवर पोल उभे करण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बाधीत झालेल्या आहेत.तर उच्च दाबाच्या वीज वाहिनिमुळे किरणोत्साराचा प्रादुर्भाव होऊन बाधीत जमिनी बंजर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिणामी संबंधीत शेतकऱ्यांच्या जमिनीचे कायमस्वरूपी नुकसान होत आहे. त्याअनुषंगाने सदर नुकसानीचे योग्य मूल्यांकन करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मोबदला द्यावा..! यासंदर्भात आ. अमित झनक यांनी काल उपविभागीय अधिकारी वाशिम यांच्या दालनात आढावा बैठक घेतली आहे. सदर बैठकीत शेतकऱ्यांच्या संदर्भातील विवीध मुद्यावर चर्चा करण्यात आली



उच्च दाबाची विद्युत प्रवाह वाहून नेणारी लाईन असल्यामूळे मोठ मोठ्या टॉवर पोल साठी शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत. शिवाय उच्च दाबामुळे किरणोत्सार होऊन केवळ जमिनीवरच नव्हे; तर बाधीत क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याचा धोका आहे. या गंभीर बाबीकडे सरकार आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज आढावा बैठक घेतली आहे..!

**आ .अमित झनक, ( आमदार, रिसोड मालेगाव )**

असून शेतकऱ्यांना तात्काळ आथिर्क मोबदला द्यावा यासाठी आ. अमित झनक यांनी शासनाकडे पाठपुरावा केला आहे.दरम्यान उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्यासह रिसोड मालेगाव तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उच्च दाबाच्या वाहिनी साठी शेतकऱ्यांच्या शेतात उभारण्यात आलेल्या टॉवर पोलची रुंदी ८९ मीटर ( २९१.९२ ) फूट आहे. मात्र कंपनीने प्रत्यक्ष मोजणीच्या वेळी फक्त २०० फूट लिहून क्षेत्रफळ कायम केले असल्याचा आरोप नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून होत आहे. यात ९१.९२ फुटाची जी तफावत आहे ती दूर करुन शेतकऱ्यांना योग्य न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.



# नगराध्यक्ष यांचे बंधू व माजी उपाध्यक्षांत वाद होऊन परस्परांविरोधात गुन्हे दाखल !

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नगरपरिषदेचे नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांचे बंधू सचिन सुर्यवंशी व नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष सोनू संगेवार यांच्यात बस स्थानक मध्ये शुल्लक कारणावरून वाद होवून त्यांचं पर्यावसान मारामारीत झाल्याने परस्परा विरोधात लोहा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल झाले आहेत. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की फिर्यादी पांडुरंग भागवत राठकर वय ५१ वर्ष राहणार देऊळ गल्ली लोहा बस स्थानकामध्ये पेपर विक्रीचे काम करतो आणि तो आपले १८ जानेवारी २०२४ रोजी रात्री साडेआठचे सुमारास आपले दुकान बंद करत असताना आरोपी माझे उपनगराध्यक्ष सोनू संगेवार हातात बेल्ट घेऊन मला व माझ्या वडिलांना मारहाण केली व अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याची तक्रार लोहा पोलीस स्टेशन मध्ये दिली त्यावरून लोहा पोलिस स्थानकात सोनू संगेवार यांच्याविरुद्ध भादवि कलम ३४१, २९४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार यांचे चुलत बंधू गणेश श्रीराम संगेवार राहणार शिवकल्याण नगर लोहा यांनी देखील लोहा पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दिली की, मी व संतोष संगेवार दोघे भाऊ असून, सोनू संगेवार हा माझा चुलत भाऊ आहे. दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी रात्री साडेआठच्या दरम्यान लोहा बस स्थानक येथे आम्ही असताना माझे चुलत भाऊ सोनू संगेवार हा पेपर विक्रेते पांडुरंग रहाटकर यांना बोलत असताना अचानक सचिन सूर्यवंशी यांनी गजानन सूर्यवंशी यांच्या सांगण्यावरून सोबत दहा ते पंधरा साथीदारासह आला व सर्वांनी माझ्या भावाला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. यावरून आरोपी सचिन सूर्यवंशी आणि त्याच्यासोबतचे दहा ते पंधरा साक्षीदार यांच्यावर लोहा पोलिसांनी कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६, ३२७, ३४१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चन्ना व पोलीस उपनिरीक्षक हापसे हे अधिक तपास करीत आहेत.

# वाहून गेलेल्या मुलाचा अखेर मृतदेहच गवसला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पतंग पकडण्याच्या नादात कालव्यात वाहून गेलेल्या आठ वर्षीय मुलाचा मृतदेहच आढळला. अग्निशमन दल आणि कोराडी पोलिसांनी दोन दिवस सलग मृतदेहाचा शोध घेतला. अखेर जगदीश खरे यांच्या मदतीने मृतदेह शोधण्यात यश आले. दयाशंकर अवधेश प्रजापती (८, कोराडी) असे मृत मुलाचे नाव आहे.अवधेत प्रजापती हे मोलमजुरी करतात. त्यांना दयाशंकर (८) आणि कैलास (१२) अशी दोन मुले आहेत. बुधवारी दुपारी ते पतंग उडवायला घराबाहेर पडले. दोघेही महादुलाजवळील मैदानावर गेले. त्यांची पतंग कुणीतरी कापली. त्यामुळे ते कालव्याच्या शेजारी बसले होते. काही वेळात एक कापलेली पतंग खाली येत होती. ती पतंग पकडण्यासाठी दया आणि कैलास हे दोघेही पळायला लागले.

मात्र, पतंगाच्या नादात दोघेही कालव्याच्या पाण्यात पडले. काही नागरिकांना ते पाण्यात गटांगळ्या खाताना दिसले. नागरिकांनी मदतीस धाव घेईपर्यंत दयाशंकर वाहून गेला. नागरिकांनी कैलासला वाचवले. माहिती मिळताच कोराडी पोलिसांचे पथक पोहचले. एसीपी संतोष खांडेकर यांच्या नेतृत्वातील पथक वाहून गेलेल्या मुलाचा शोध घेत होते.



# पुरवठा विभागातील दलालांचा सुळसुळाट काही थांबेना

## लोहा तहसीलदारांच्या खुर्चीसमोरच ठाण माडलेले ग्रहण काही सुटेना

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तहसीलच्या पुरवठा विभागाचा कारभार जणू आंधळ दळतंय अन् कुत्रं पीठ खातय असाच झाला आहे. गेली दोन महिन्यांपासून पुरवठा विभागात दलालाने कहर केला असून गोदामपाला सह वरिष्ठ हे पुरवठा विभागातून एका दोन अक्षरी नाव व दोन अक्षरी आडनाव असलेल्या राजकीय दलालाला जणू कुरण मोकळे केले असल्याप्रमाणे दाखवून देत आहेत.नेहमीच पायघड्या घालणारा दलाल नियमितपणे गोदामपाल,नायब तहसीलदार व तहसीलदारांच्या खुर्चीसमोरच ठाण मांडून बसले असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावत आहेत.

निर्ढावलेली शासकीय यंत्रणा, भ्रष्ट राजकारणी व राजकारण्यांच्या अंगाखांद्याशी खेळणारे मुजोर दलालांनी अमाप मायापूंजी जमवली असली तरी "पुर्वी चे लाल दुचाकीवरील दिवस विसरून जाऊ नये,विनाकारण पुरवठा विभागात तोंड खपसू नये" अशी चर्चा जोरदार पणे होतांना दिसुन येत आहे. एका मोठ्या राजकीय धेंडाच्या ओटीत बसून सर्वस्व अर्पण करून त्यांच्या नावाचा गैरवापर करून लोहा तालुक्यातील चार अक्षरी गावाच्या दोन अक्षरी नाव व आडनावाच्या महाशयाने प्रतिनिधी असल्याच्या नावाखाली दलाली करत अधिकारी वर्गाच्या खुर्चीला जणू गृहणच लावल्याचा व पुरवठा विभागाला नेहमीच चुना लावल्याचा प्रकार अनेक जण उघड्या डोळ्यांनी पाहत डोळेझाक करत आहेत.परंतू सर्व सामान्य लाभधारक दबक्या आवाजात जोरदार पणे म्हणत आहेत की,पुरवठा विभागात नियमितपणेच दलालाचा सुळसुळाट काही थांबेना; लोहा तहसीलदारांच्या खुर्चीसमोरच ठाण माडलेलं ग्रहण काही सुटेना अशी जोरदार पणे चर्चा करत आहेत.

# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजारसांगी येथील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल बाजार सावंगी .तालुका खुलताबाद, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे स्नेहसंमेलन उद्घाटन सोहळा संपन्न दिनांक 19 जानेवारी 2024 वार शुक्रवार रोजी सकाळी 11. वाजता स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला .याप्रसंगी ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय श्री विजय द्वारकुंडे साहेब व ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव तथा लोकविकास नागरी सहकारी बँकेचे संचालक माननीय श्री. भाऊसाहेब काळे साहेब व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले ज्युनियर भाऊ कदम माननीय सिद्धार्थ सोनवणे यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून वेगवेगळ्या ,अभिनेते ,व राजकीय नेते, मुख्यमंत्री ,पंतप्रधान ,यांचे हुबेहूब आवाज काढून विद्यार्थ्यांची मनी जिंकली. तसेच दुसरे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले सिने कलाकार अभिनेते माननीय श्री. अरुण गवळी व अंकुश सोनवणे या दोन कलाकारांनी आपल्या कलेच्या माध्यमातून दोन पात्री नाटक करून प्रेक्षकांना अतिशय छान प्रकारे मनोरंजन केले याप्रसंगी बाजार सावंगी चे सरपंच आप्पाराव पाटील नलावडे व सकाळ समूहाचे पत्रकार श्रीधर पाटील सर व दैनिक आधुनिक केसरी ग्रामीण जिल्हा प्रतिनिधी सुधाकर जेठे व विनोद नलावडे व इतर गावकऱ्यांची उपस्थिती होती. यांच्या उपस्थितीमध्ये ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या बाल चिमुकल्यांनी वेगवेगळ्या नृत्य कला व नाटक सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी नलावडे व ऋतुजा राऊत या विद्यार्थिनींनी केले तर आभार प्रदर्शन राणे सरांनी केली.याप्रसंगी महाविद्यालयाचे कर्मचारी योगेश झिंजुर्के, मनोज राणे, योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड , वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण,अविनाश गाडेकर,योगेश सुरडकर,श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव,पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव , धुमाळ बाबा, यांची उपस्थिती होती.






# २२ जानेवारीला मांस विक्री बंद ठेवा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** 22 जानेवारी रोजी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा श्री क्षेत्र अयोध्या येथे होत आहे .हा उत्सव दिपोत्सव करून मोठ्या हर्ष उल्हासात साजरा करण्यासाठी शासकीय सुट्टी जाहीर केले असून अशा पवित्र दिवशी धर्माबाद शहरात धार्मिक सोहळे होणार आहे.शहरातील नगर परिषद हद्दीत मद्य व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याची मागणी निवेदनाद्वारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा पवार गट)शहर अध्यक्ष नरेश रेड्डी आरकलवाड यांच्या नेतृत्वाखाली मा.मुख्याधिकारी साहेब, मा.पोलीस निरिक्षक साहेब यांच्या कडे करण्यात आली. यावेळी तालुका सरचिटणीस सतिष पाटिल शिंदे, कार्याध्यक्ष नारायण पाटील पवार,जिल्हा चिटणीस किरण पाटील बेंद्रे, मराठवाडा संयोजन साईनाथ शिरपुरे,सामजिक न्याय विभागाचे तालुका अध्यक्ष गंगाधर धडेकर,सोनू पाटिल बनाळीकर, बिरपा मदनुरकर , किशोर वाघमारे, गंगाधर गोणारकर, सुनिल पुजरोड, नागनाथ माळगे, संजय झगडे, राजेश सोनकांबळे,यांच्या सह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

> श्री प्रभू राम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठान सोहळा निमित्त ( ता .22 ) जानेवारी रोजी धर्माबादच्या सर्व मांस विक्री व्यापारी, चिकन, मठण, मासे,धाबा या सर्वांनी धर्माबाद वशियांनी एक दिवसीय बंध करण्यात यावे .
> धर्माबाद हे तालुका सर्व धर्म एकनिष्ठेने प्रत्येक उत्सव साजरे करणारे म्हणून जे वळक आहे . तेच परंपरा जपावे . **नरेश रेड्डी, शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अजितदादा गट**

# सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेला उपक्रमशील सामाजिक संस्था पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सु-लक्ष्मी सेवाभावी संस्था संभाजीनगर हि गेल्या अनेक दिवसांपासून विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येते त्यामध्ये रुग्णसेवा बेवारस निराधार मनोरुग्ण वृध्दांचा सांभाळ करणे गरजु रुग्णांना रुग्णालयात मदत करणे असे अनेक उपक्रम संस्थेच्या माध्यमातून समाजसेवक सुमित पंडित व समाजसेविका पुजा पंडित हे रंजल्या गांजल्यांची सेवा करीत आहे त्याच्या सामाजिक कार्याची दखल घेत ते करीत असलेल्या रजंल्या गांजल्याची सेवा खरचं समाजापुढे वाखाडण्याजोगी आहे.

रस्तावर फिरणाऱ्या मनोरुग्णांची दाढी केस कापून स्वच्छ अंघोळ घालुन त्यांना मनोविकृती रुग्णालयात दाखल करतात,गरजु रुग्णांना अर्ध्या रात्री मेडिकल साहित्य, भोजन,रक्त, पुरविण्यात ही जोडी देवदुतासारखी मदतीला धावुन जाते, बेवारसांचे अत्यंविधी सुध्दा हे दापत्य माणुसकी समुहाच्या माध्यमातून पुजा पंडीत सध्या संभाजीनर येथे वृध्दाश्रम चालवतात,येथे माणुसकी वृध्द सेवालय देखील वृध्दाच्या सेवेसाठी मदतकार्य करते,सर्व दांपत्याच्या दानातुन हे कार्य चालु आहे म्हणूनच त्यांच्या सु-लक्ष्मी बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या या सामाजिक कार्याची दखल घेत,सन्मानित करण्यात



येणार आहे, सर्व मान्मानिय सत्कार मुर्ती ना कळवण्यात आनंद होत आहे.देवकाई प्रतिष्ठान व मिताली फॉऊंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा मानाचा ज्ञानवंत पुरस्कार महा ग्लोबल राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२४ यांच्यातर्फे हा सोहळा जळगाव येथे दिनांक २१-०१-२०२४ रवीवार रोजी आयोजीत करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश दाते माजी वायुसेना अधिकारी,राजुमामा भोळे आमदार जळगाव, जयश्रीताई महाजन माजी महापौर जळगाव उपस्थित राहणार आहे या कार्यक्रमाचे आयोजक.अध्यक्ष मिताली फाऊंडेशन,सुनील दाभाडे अध्यक्ष देवकाई प्रतिष्ठान जनमत प्रतिष्ठान अध्यक्ष पंकज नाले यांनी पुरस्कार जाहीर झाल्याचे निवड समितीतर्फे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

ह्या पुरस्कारामुळे समाजात सु-लक्ष्मी सेवाभावी संस्था व सुमित पंडीत व सौ पुजा सुमित पंडीत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# अयोध्येसाठी अमरावतीहून विशेष रेल्वे

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** अयोध्या येथे २२ जानेवारीपासून प्रभू श्रीरामाचे मंदिर भाविकांसाठी खुले होणार आहे. रामभक्तांना रामलल्लांचे दर्शन घेता यावे, यासाठी नवी अमरावती रेल्वेस्थानकावरून विशेष रेल्वेगाडीच्या दोन फेऱ्या सोडण्यात येणार आहेत.मध्य रेल्वेने नवी अमरावती (अकोली) रेल्वेस्थानकावरून ७ व २५ फेब्रुवारीला दर्शन नगर अयोध्या आस्था रेल्वेची सोय केली आहे. ही रेल्वे ९ व २७ फेब्रुवारीला अयोध्येहून परत निघेल. त्यामुळे कोणत्याही अडचणीशिवाय अमरावतीकर प्रवाशांना थेट शहरातून अयोध्येला जाणे व दर्शन घेतल्यानंतर परत येणे शक्य होणार आहे. जास्तीत जास्त भाविकांनी रामलल्लांचे दर्शन घेण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यांच्या सूचनेवरून रेल्वेने देशभरातील विविध ठिकाणांहून अयोध्येसाठी आस्था विशेष रेल्वेगाड्या सुरू केल्या आहेत. अमरावतीतूनही अयोध्येसाठी रेल्वे गाडी सोडावी, अशी मागणी खासदार नवनीत राणा यांनी रेल्वेमंत्री, रेल्वे राज्य मंत्र्यांकडे केली. त्यानंतर अमरावतीला आस्था रेल्वेच्या दोन फेऱ्या मिळाल्या आहेत. या गाडीचे बुकिंग फक्त आयआरसीटीसी मार्फतच होणार आहे. तसेच भाविकांना रेल्वेत शाकाहारी जेवण दिले जाणार आहे.